CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह




**आजचा सामना**

गुजरात टायटन्स वि. राजस्थान रॉयल्स

वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद

सोलापूर | बुधवार, ९ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १५१ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



जर एक मजबूत, संघटित शक्तिशाली हिंदू समाज, जो संपूर्ण समाजाला स्नेह, आत्मीयता आणि आदर्शवादाच्या नियंत्रणाखाली सोबत घेऊन गेल्यास, तो एकजूट होऊन एक राष्ट्रव्यापी अस्तित्व बनला, तर राजकीय सत्ता नियंत्रणात राहील. सत्तेत कोणताही पक्ष असो, समाजाची निःस्वार्थ सेवा जिथे दाखवली गेली आहे, त्या ठिकाणी प्रत्येकाला नतमस्तक व्हावेच लागते. आपल्याला अशी परिस्थिती निर्माण करावी लागेल.

-श्रीगुरुजी
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

# मुद्रा योजनेतून कोट्यवधी लोकांची स्वप्ने साकार


### पंतप्रधान मोदींनी साधला लाभार्थींशी संवाद

◆ **नवी दिल्ली, ८ एप्रिल**

पीएम मुद्रा योजनेमुळे मागील दहा वर्षांत कोट्यवधी लोकांचे जीवन बदलले, त्यांची स्वप्ने साकार झाली. ज्यांना पूर्वी दुर्लक्षित केले गेले, त्यांना आर्थिक मदत देऊन सक्षम करण्यात आले. लघु उद्योजक, छोटे दुकानदार यांना पूर्वी कर्ज मिळविण्यासाठी बँकाचे उंबरठे झिजवावे लागायचे; परंतु आमच्या सरकारने मुद्रा योजनेतून गेल्या दहा वर्षांत ५२ कोटी ३३ लाख लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून आधार दिले, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

पीएम मुद्रा योजनेला १० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी या योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. आपल्या संबोधनात मोदी म्हणाले, आपण मुद्रा योजनेची १० वर्षे साजरी करीत असताना, या योजनेमुळे ज्यांचे जीवन बदलले, त्या सर्वांचे मी अभिनंदन करू इच्छितो. गेल्या दशकात मुद्रा योजनेने अनेकांची स्वप्ने प्रत्यक्षात आली. या योजनेमुळे काहीही अशक्य नाही, हे आम्ही दाखवून दिले. केंद्र सरकारने बँकांच्या माध्यमातून ५२ कोटींहून अधिक लाभार्थ्यांना ३३ लाख कोटी रुपयांहून अधिक तारणमुक्त कर्जे वितरित करण्यात आली. यात ७० टक्के लाभार्थी महिला आणि अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय समुदायातील आहेत. या योजनेमुळे अनेकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मदत झाली आणि तळागाळातील लोकांना सक्षम करण्यात आले. (वृत्तसंस्था

**१० वर्षांत ५२ कोटी ३३ लाख व्यावसायिकांना मिळाले कर्ज**



### विकासाच्या नवीन युगाची सुरुवात

मोदी म्हणाले, उद्योजकांना सक्षम करणे हा पीएम मुद्रा योजनेचा मुख्य उद्देश आहे आणि यातील लाभार्थ्यांची संख्या पाहता सरकारने निश्चित केलेले उद्दिष्ट यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. या योजनेमुळे स्वावलंबी आणि विकासाच्या नवीन युगाची सुरुवात झाली. मुद्रा योजनेसाठी अर्ज करणाऱ्या बहुतांश महिला आहेत आणि त्यांचाच सर्वांत जलद कर्ज फेडणाऱ्यांमध्ये समावेश आहे.

### हमीशिवाय मिळाले ३३ लाख कोटी

देशातील अधिकाधिक तरुणांनी व्यवसाय सुरू करावे अशी माझी इच्छा आहे. सरकार व्यवसायिकांनी सर्वतोपरी मदत करण्यासाठी तयार आहे. केवळ मुद्रा योजनेतून देशातील जनतेला हमीशिवाय ३३ लाख कोटी रुपये देण्यात आले. यातून देशात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती झाली. रोजगार उपलब्ध करून या योजनेच्या लाभार्थ्यांनी अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी मदत केली आहे आणि हीच खरी देशसेवा असल्याचे मोदी यावेळी म्हणाले.

# यंदा वरुणराजा सरासरीच्या १०३ टक्के बरसणार

### मान्सून सामान्य राहणार : स्कायमेटचा अंदाज

◆ **नवी दिल्ली, ८ एप्रिल**

यंदा वरुणराजा सरासरीच्या १०३ टक्के बरसणार तसेच यंदाचा मान्सून सामान्य राहील, असा अंदाज भारतातील आघाडीची हवामानविषयक संस्था स्कायमेटने मंगळवारी वर्तवला आहे.

जून ते सप्टेंबर या कालावधीत मान्सूनचा पाऊस सरासरीच्या १०३ टक्के होईल. यात ५ टक्क्यांची वाढ किंवा घट होऊ शकते. जून ते सप्टेंबर या कालावधीत दीर्घकालीन सरासरी ८६८.६ मिमी पाऊस पडेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

स्कायमेटचे जतिनसिंह यांच्या मते, 'ला-निना' या हंगामात कमकुवत आणि संक्षिप्त असेल. 'ला निना'चे चिन्ह आता धुसर होत आहे. मान्सूनवर विपरीत परिणाम करणाऱ्या 'अल-निनो'ची शक्यता नाकारण्यात आली आहे. 'अल-निनो' दक्षिणी दोलन फार तटस्थ राहणार असल्याने भारतात मान्सूनच्या पावसावेळी तो प्रभावी घटक ठरणार आहे. 'ला निना' कमकुवत असणे आणि 'अल-निनो' प्रभावी नसल्याने मान्सूनचा पाऊस चांगला होऊ शकतो. हिंदी महासागरातील स्थिती 'अल-निनो' प्रभावी न होण्यासाठी उपयोगी ठरू शकते. त्यामुळे मान्सूनचा पाऊस चांगला राहू शकतो.

### जूनमध्ये सरासरीच्या ९६ टक्के

जून महिन्यात सरासरीच्या ९६ टक्के म्हणजे सामान्य पाऊस राहू शकतो. या महिन्यात १६५.३ मिमी पावसाची नोंद होईल. जुलै महिन्यात १०२.३ टक्के पाऊस होईल, असा अंदाज स्कायमेटने वर्तवला आहे. ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा अधिक म्हणजे १०८ टक्के पाऊस होऊ शकतो. सप्टेंबर महिन्यात सरासरीच्या १०४ टक्के पावसाची नोंद होऊ शकते, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

### महाराष्ट्रात पुरेसा पाऊस होणार

स्कायमेटच्या अंदाजानुसार, पश्चिम आणि दक्षिण भारतात चांगला पाऊस होईल. मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रात पुरेसा पाऊस होईल. पश्चिम घाटात प्रामुख्याने केरळ, कर्नाटकचा किनारपट्टीचा भाग आणि गोव्यात अधिक पाऊस होईल. उत्तरेकडील राज्य आणि पर्वतीय भागात सरासरीच्या पेक्षा कमी पाऊस होईल. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### बाजाराने भरून काढले अर्धे नुकसान

**मुंबई** : डोनाल्ड ट्रम्प यांच्या टेरिफच्या भीतीमुळे सोमवारी झालेल्या नुकसानापैकी अर्धी भरपाई शेअर बाजारात मंगळवारी झाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक १,०८९ अंकांच्या वाढीसह ७४,२२७ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३७४ अंकांनी वाढून २२,५३५ वर स्थिरावला.



निफ्टी कंझ्युमर ड्युरेबल्स २.५ टक्के वाढला. कॅपिटल गुड्स, एफएमसीजी, ऑईल अ‍ॅण्ड गॅस, पीएसयू, रियल्टी, टेलिकॉमदेखील वधारले. बीएसई मिडकॅप १.८ टक्के आणि स्मॉलकॅप २.१ टक्के वाढला. आजच्या तेजीमुळे बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ७.४ लाख कोटींनी वाढून ३९६.७१ लाख कोटींवर पोहोचले. अमेरिकेने शुल्कावरून घेतलेली आक्रमक भूमिका काही प्रमाणात सौम्य होण्याची गुंतवणूकदारांना आशा आहे.

**२०13 मधील हैदराबाद बॉम्बस्फोट प्रकरण**

# पाच दहशतवाद्यांच्या फाशीचा निर्णय कायम

◆ **हैदराबाद, ८ एप्रिल**

हैदराबाद येथे २०१३ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात दोषी ठरवण्यात आलेल्या इंडियन मुजाहिदीनच्या पाच दहशतवाद्यांना मृत्युदंड ठोठावण्याचा देण्यात आलेला निर्णय तेलंगणा उच्च न्यायालयाने मंगळवारी कायम ठेवला.

न्या. के. लक्ष्मण आणि न्या. पी. श्री. सुधा यांच्या खंडपीठाने एनआयए न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत इंडियन मुजाहिदीनच्या अतिरेक्यांनी दाखल केलेली फौजदारी पुनर्विचार याचिका फेटाळली. सत्र न्यायालयाने दिलेल्या कठोर निकालाची पुष्टी करीत आहे, असे खंडपीठाने म्हटले.

१३ डिसेंबर २०१६ रोजी एनआयए न्यायालयाने इंडियन मुजाहिदीनचा सहसंस्थापक मोहम्मद अहमद सिदीबापा उर्फ यासिन भटकळ, पाकिस्तानी नागरिक झिया-उर-रहमान उर्फ वकास, असदुल्ला अख्तर उर्फ हड्डी, तहसीन अख्तर उर्फ मोनू आणि अजाज शाईसह पाच जणांना दोषी ठरवले होते. (वृत्तसंस्था

# राज्याचे नवे वाळू धोरण जाहीर

### डेपोऐवजी लिलाव पद्धतीने विक्री; मंत्रिमंडळाचा निर्णय

◆ **मुंबई, ८ एप्रिल**

विविध योजनांमधील राज्यातील घरकूल लाभार्थ्यांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू उपलब्ध करून देण्याच्या निर्णयासह राज्याच्या वाळू-रेती निर्गती धोरणास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यापुढे नदी, खाडीपात्रातील वाळू, रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन विक्री (डेपो पद्धती) ऐवजी लिलाव पद्धतीद्वारे करण्यात येणार आहे.

नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुडवडा विचारात घेता कृत्रिम वाळूस प्रोत्साहन देण्यात येईल. यासाठी सुरुवातीस विविध शासकीय, निमशासकीय बांधकामामध्ये २० टक्के कृत्रिम वाळू वापरणे बंधनकारक करण्यात येईल. या बांधकामात पुढील ३ वर्षांत कृत्रिम वाळू बंधनकारक करण्यात येणार आहे. या धोरणानुसार



आता पर्यावरण विभागाच्या परवानगीनंतर नदीपात्रातील वाळू गटांसाठी जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाळू गटांचा एकत्रितरीत्या एकच ई-लिलाव प्रसिद्ध करण्यात येईल. या लिलावाचा कालावधी दोन वर्षांसाठी राहणार आहे.

खाडीपात्रातील वाळू गटांसाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने निश्चित केलेल्या प्रत्येक वाळू गटासाठी ई-लिलाव पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल. या लिलावाचा कालावधी तीन वर्षे इतका राहील. लिलावाद्वारे उत्खनन करण्यात येणाऱ्या प्रत्येक वाळू गटामधील १० टक्के वाळू विविध घरकूल लाभार्थ्यांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या २८ मार्च २०२० च्या अधिसूचनेत परिशिष्ट-९ मध्ये अनुक्रमांक ४ नुसार निश्चित केले गेलेले वाळूगट तसेच ज्या वाळू गटांना पर्यावरण विभागाची परवानगी मिळालेली नाही व जे वाळू गट लिलावात गेलेले नाहीत अशा नदी, नाले, ओढे इत्यादी वाळू गटातील वाळू शासनाच्या गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थ्यांना, गावकऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक व सामूहिक कामासाठी तसेच शेतकऱ्यांना त्याच्या स्वतःच्या विहिरीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या खाणीतील ओव्हरबर्डमधून निघणाऱ्या वाळू, रेतीसाठी प्रती ब्रास २०० रुपये व इतर गौण खनिजासाठी २५ रुपये प्रमाणे स्वामित्वधनाची रक्कम आकारण्यात येणार आहे. परराज्यातून येणाऱ्या वाळूचे सनियंत्रण करण्यात येणार आहे. ट्रॅक्टरद्वारे अवैध गौण खनिज वाहतूक केल्यास १ लाख रुपयांची दंडाची रक्कम कायम ठेवण्यात आली आहे. (तभा वृत्तसेवा)

### आणखी तीन गट हुर्रियतमधून बाहेर

◆ **श्रीनगर, ८ एप्रिल**

द जम्मू-काश्मीर इस्लामिक पार्टी, जम्मू-काश्मीर मुस्लिम डेमॉक्रॅटिक लीग आणि कास्शीर फ्रीडम फ्रन्ट या तीन संघटना फुटीरतावादी हुर्रियत कॉन्फरन्समधून बाहेर पडल्या आहेत, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी दिली.

लोकांचा विश्वास संविधानात असल्याचे यावरून स्पष्ट होत आहे. ही घोषणा अमित शाह यांच्या तीन दिवसांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यात करण्यात आली. जम्मू-काश्मीर इस्लामिक पॉलिटिकल पार्टी, जम्मू-काश्मीर मुस्लिम डेमॉक्रॅटिक लीग आणि काश्मीर फ्रीडम फ्रन्ट या तीन संघटनांनी फुटीरतावादी हुर्रियतची साथ सोडण्याचा निर्णय घेतला आहे, असे अमित शाह म्हणाले. (वृत्तसंस्था)

### सर्वोच्च न्यायालयात केंद्र सरकारचे कॅव्हेट

**नवी दिल्ली** : राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर वक्फ दुरुस्ती विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. या कायद्याच्या वैधानिकतेचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात पोहोचला असून, याविरोधात विविध याचिका दाखल करण्यात आल्या. यावर मंगळवारी केंद्र सरकारने कॅव्हेट दाखल केले. यामुळे सरकारचा म्हणणे ऐकून घेणे न्यायालयाला बंधनकारक झाले आहे. वक्फ कायद्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने १५ एप्रिल रोजी सुनावणी निश्चित केली आहे. या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारने कॅव्हेट दाखल केला. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्यासमोर वकील कपिल सिब्बल यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडत वक्फ दुरुस्ती कायदा संविधानाला धरून नसल्याचा युक्तिवाद केला होता.

# चैत्री यात्रेनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात फुलांची सजावट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. ८ एप्रिल-**

चैत्र शुद्ध कामदा एकादशी निमित्त मुख्य श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

मंदिरात विविध प्रकारच्या आकर्षक रंगीबेरंगी फुलांचा वापर करून श्रींचा गाभारा, सोळखांबी श्री संत नामदेव महाराज पायरी या ठिकाणी सजावट करण्यात आली आहे. ही सजावट पुणे येथील राजेंद्र पंढरीनाथ नाईक या भाविकांने सेवाभावी तत्त्वावर मोफत करून दिली आहे.

### सजावटीसाठी विविध फुलांचा वापर

कामिनी ३००, विविध कलरचे गुलाब ४०० ड्रेसिंग साँग टेबल पाम ६0, ऑर्किड २० बंडल, भगवा झेंडू १00 किलो, पिवळा झेंडू १00 किलो, वॉइसिस विटा बॉक्स २५, शेवंती ५0 बंडल, ब्ल्यू आणि पिंक डीजी १५0, पांढरी शेवंती ५0 किलो, अष्टर ५0 किलो, चाफा ४0 पाकिट, कमळ ३ डझन.



# नेहरू-पटेलांच्या विचारधारेनुसारच काँग्रेसची वाटचाल : खडगे

◆ **नवी दिल्ली, ८ एप्रिल**

पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांची विचारधारा एकच होती. या मुद्यावरून काहीजण विनाकारण संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. नेहरू आणि पटेल एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, त्यांच्या विचारधारेनुसारच काँग्रेसची वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी मंगळवारी केले.

अहमदाबाद येथील शाहीबाग परिसरातील सरदार पटेल स्मृती स्मारकात आयोजित विस्तारित काँग्रेस कार्यसमितीच्या बैठकीचे उदघाटन करताना खडगे बोलत होते. यावेळी काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य ज्येष्ठ काँग्रेस नेते उपस्थित होते.



देशातील मूलभूत समस्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी देशातील सामाजिक सदभवाचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला जात आहे. काही मोजके लोक देशातील साधनसंपत्तीवर कब्जा करीत शासनाला नियंत्रित करण्याचे काम करीत असल्याचा आरोप खडगे यांनी केला.

गुजरातच्या भूमीत जन्म झालेल्या दादासाहेब नौरोजी, सरदार पटेल तसेच महात्मा गांधी या तीन महान विभूतींनी जगात आपल्या देशाचे नाव रोशन केले. विशेष म्हणजे, या तिघांनीही काँग्रेसचे अध्यक्षपद भूषवले आहे. गांधींजींनी तर अन्यायाविरोधात आपल्याला सत्य आणि अहिंसेचा मार्ग दाखवला. हे अतिशय मजबूत असे वैचारिक शस्त्र आहे, ज्याच्यापुढे जगातील कोणतीच ताकद कोणीच टिकू शकत नाही, असे खडगे म्हणाले.

नेहरू अणि सरदार पटेल परस्परांचे कट्टर शत्रू होते, असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे, प्रत्यक्षात हे दोन्ही नेते एकदुसऱ्याला पुरक होते. हे इतिहासातील अनेक घटनांवरुन तसेच कागदपत्रांवरून दिसून येते. पटेलांबद्दल नेहरूंच्या मनात आदराची भावना होती. त्यामुळे अनेकवेळा पटेलांचा सल्ला घेण्यासाठी नेहरू त्यांच्या घरीही जायचे, असे खडगे म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### चेन्नई सुपर किंग्जचा सलग चौथा पराभव

**मुल्लानपूर, दि. ८ एप्रिल**

चेन्नई सुपर किंग्जला आयपीएल २०२५ मध्ये सलग चौथा पराभव पत्करावा लागला. पंजाब किंग्जने चेन्नईला १८ धावांनी पराभूत केले. पंजाबने या हंगामात तिसरा विजय मिळवला. मंगळवारी मुल्लानपूर येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर २२0 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईला २0 षटकांत ५ गडी गमावून २0१ धावाच करता आल्या. ४९ चेंडूत ६९ धावा काढून डेव्हॉन कॉनवे निवृत्त झाला. एमएस धोनीने १२ चेंडूत २७ धावा केल्या. लॉकी फर्ग्युसनने २ विकेट घेतल्या.

नाणेफेक जिंकून फलंदाजी करणाऱ्या पंजाबने २0 षटकांत ६ गडी गमावून २१९ धावा केल्या. पंजाबकडून प्रियांश आर्यने ४२ चेंडूत १0३ धावा केल्या. त्याने ३९ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. प्रियांश व्यतिरिक्त, शशांक सिंग ५२ आणि मार्को यान्सन ३४ धावांवर नाबाद राहिले. खलील अहमद आणि रविचंद्रन अश्विन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

# धावत्या स्कूलबसमधून पडला; चेहऱ्याचा चेंदामेंदा झाला

**शाळकरी विद्यार्थी अनुराग राठोडचा मृत्यू**

## अनुराग आता स्कूलबस मध्ये दिसणार नाही; कुटुंबीयांचा शासकीय रुग्णालयात आक्रोश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल -**

सोलापूर मंगळवेढा मार्गावर भीषण अपघात झाला आहे. शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या धावत्या स्कुलबस मधून पडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे.ज्या स्कुलबस मधून विद्यार्थी पडला त्याच्या मागच्या चाकाखाली विद्यार्थ्याचा मृत्यू झाला.अपघात इतका भीषण होता की,विद्यार्थ्याच्या चेहऱ्याचा संपूर्ण चेंदामेंदा झाला होता.

अनुराग तिपणा राठोड(वय १३ वर्षे,रा,बसवेश्वर नगर,शेगाव तांडा,सोलापूर) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे.अपघाताची माहिती मिळताच नातेवाईकांना शासकीय रुग्णालयात मोठी गर्दी केली होती.स्कुलबसच्या चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



### नातेवाईकांची कठोर कारवाईची मागणी

शासकीय रुग्णालयात आलेल्या नातेवाईकांनी स्कुलबस चालकाच्या हलगर्जीपणामुळे अनुरागचा असा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.बसचालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.सोलापूर पोलिसांनी स्कुलबस चालकाला ताब्यात घेतले आहे.स्कुलबस मधून तोल जाऊन धावत्या बस मधून पडून एका शालेय विद्यार्थ्याचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सोलापुरात हळहळ व्यक्त केले जात आहे.

**रोज स्कुलबसमधून घरी जाणारा अनुराग आता नाहीसा झाला**

सोलापूर शहराजवळ असलेल्या कवठे येथील एका आश्रम शाळेत अनुराग राठोड शालेय शिक्षण घेत होता.दररोज स्कुलबस मधून अनुराग घरी जात होता.कडक उन्हाळा सुरू झाल्याने अनेक शाळांचे वेळापत्रक सकाळच्या सत्रात झाले आहे. सोमवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर स्कुलबस मधून अनुराग घरी जात होता.स्कुलबसच्या दरवाज्याजवळ उभा होता. अचानकपणे अनुरागचा तोल जाऊन धावत्या स्कुलबसमधून बाहेर पडला.स्कुलबसचा वेग अधिक होता,त्यामुळे स्कुलबस चालकाला लक्षात आले नाही.इतर विद्यार्थ्यांनी आरडाओरडा केल्यानंतर थोड्या अंतरावर जाऊन स्कुलबस थांबवली. अनुराग हा त्याच स्कुलबसच्या मागील चाकात घेऊन चेंदामेंदा झाला होता.दररोज ज्या स्कुलबस मधून घरी परत जात होता,

त्याच स्कुलबस खाली अनुरागचा जीव गेला. रोज स्कुलबस मधून शालेय शिक्षण घेणारा अनुराग आता नाहीस झाला आहे.

### अनुरागचा रक्त,मेंदू,चेहरा रस्त्यावर विखूरला

अनुराग राठोड हा चिमुरडा फक्त तेरा वर्षांचा होता.अपघात इतका भीषण होता की,अनुरागचा चेहरा,त्याचा मेंदू,रक्त रस्त्यावर विखरूला होता.रस्त्यावर जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांनी स्कुलबस चालकाला चांगलाच धडा शिकवला.अनुराग रराठोड याचा अपघात झाल्याची माहिती मिळताच नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयाकडे धाव घेतली.शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांनी अनुरागला मृत घोषित केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### पाच बांगलादेशी स्थलांतरितांना अटक

**नवी दिल्ली** : पाच बांगलादेशी स्थलांतरितांना जहांगीरपुरी येथे अटक करण्यात आली. ते ओळख पटू नये म्हणून ट्रान्सजेंडर असल्याचे भासवून भारतात बेकायदेशीरपणे राहत होते. त्यांच्यावर किरकोळ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आणि त्यांचे शारीरिक स्वरूप बदलण्यासाठी तसेच ट्रान्सजेंडर समुदायाचे सदस्य भासवण्यासाठी हार्मोनल इंजेक्शन्स घेतल्याचा आरोप आहे. ते सग्नलवर भीक मागत इतर कामे करत असल्याचे समजले. त्यांच्या ताब्यातून सात मोबाईल फोन जप्त करण्यात आले. ते सर्व बंदी घातलेल्या आयएमओ ॲपसह स्थापित केले गेले आहेत. ज्याचा वापर ते बांगलादेशातील त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधण्यासाठी करत होते, असे पोलिसांनी एका निवेदनात सांगितले. सोमवारी जहांगीरपुरी मेट्रो स्टेशनजवळ त्यांना अटक करण्यात आली.

### मलायकाविरुद्ध न्यायालयाने जारी केला जामीनपात्र वॉरंट

**मुंबई** : २०१२ मध्ये मुंबई येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये सैफ अली खानने एका अनिवासी भारतीय व्यावसायिकावर केलेल्या कथित हल्ल्याच्या प्रकरणात साक्षीदार म्हणून हजर न राहिल्याने



अभिनेत्री मलायका अरोराविरुद्ध मुंबईतील न्यायालयाने पुन्हा जामीनपात्र वॉरंट जारी केला. २२ फेब्रुवारी २०१२ रोजी ही घटना घडली. तेव्हा हॉटेलमध्ये खानसोबत जेवायला गेलेल्या गटात अरोरा सहभागी होती. मुख्य न्यायदंडाधिकारी के. एस. झंवर सध्या या प्रकरणातील साक्षीदारांची साक्ष नोंदवत आहेत. न्यायालयाने १५ फेब्रुवारी रोजी अरोराविरुद्ध प्रथम जामीनपात्र वॉरंट जारी केला होता. ती न्यायालयात हजर न राहिल्याने सोमवारी पुन्हा वॉरंट जारी करण्यात आला. या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ एप्रिल रोजी होणार आहे. व्यावसायिक इक्बाल मीर शर्मा यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून सैफ अली खान आणि इतर दोन आरोपींना अटक करण्यात आली. नंतर तिघांनाही जामिनावर सोडण्यात आले.

### ॲमेझॉन इंडियात 'आश्रय'चे नेटवर्क वाढवणार

**मुंबई** : आश्रय केंद्रे ही विशेष विश्रांतीस्थळे असून, ई-कॉमर्स आणि लॉजिस्टिक्स परिसंस्थेत वितरण काम करणाऱ्या सहकाऱ्यांना वातानुकूलित आसनव्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, इलेक्ट्रोलाईट्स, मोबाईल चार्जिंग पॉईंट्स, स्वच्छतागृहे, प्राथमिक उपचार किट्स आणि अल्पोपहार सुविधा पुरवतात. सर्व डिलिव्हरी असोसिएट्ससाठी आश्रय केंद्रे पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध आहेत. ॲमेझॉन इंडियाने भारतभरात १०० आश्रय केंद्रांचे नेटवर्क वाढवणार असल्याचे आज जाहीर केले. आश्रय केंद्रे ही विशेष विश्रांतीस्थळे आहेत. ही या उद्योगक्षेत्रातील पहिलीच संकल्पना असून, त्यायोगे वितरण काम करणाऱ्या सहकाऱ्यांना आणि लॉजिस्टिक्स भागीदारांना मोठ्या गर्दीच्या ठिकाणी विशेष विश्रांती केंद्रे पुरविली जात आहेत. पेट्रोल पंप आणि व्यावसायिक भाडे जागांवर स्थित ही केंद्रे अत्यावश्यक सुविधांनी सुसज्ज आहेत. आश्रय केंद्रे दररोज सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत आठवड्याचे सातही दिवस, वर्षभर चालू असतात आणि सर्व डिलिव्हरी असोसिएट्सना एका भेटीत ३० मिनिटांपर्यंत मोफत प्रवेश दिला जातो. प्रत्येकवेळी १५ लोकांपर्यंत सामावून घेण्याची क्षमता असलेली ही केंद्रे सुलभ पार्किंग सुविधाही पुरवतात, अशी माहिती ॲमेझॉनच्या भारत आणि ऑस्ट्रेलिया ऑपरेशन्सचे उपाध्यक्ष अभिनव सिंग यांनी दिली.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| **सेन्सेक्स** | ७४,२२७.०८ (+१,०८९.१८) |
| **निफ्टी** | २२,५३५.८५ (+३७४.२५) |

### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ८९,७३० रु. |
| **चांदी** (प्रतिकिलो) | ९४,००० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ४१.८ | २७.४ |
| अमरावती | ४३.० | २४.७ |
| भंडारा | ३९.६ | २४.० |
| बुलडाणा | ४०.६ | २६.० |
| चंद्रपूर | ४२.६ | -.- |
| गडचिरोली | ४०.० | २२.० |
| गोंदिया | ३९.२ | २४.४ |
| नागपूर | ४०.८ | २४.३ |
| वर्धा | ४०.६ | २४.६ |
| वाशीम | ४२.० | -.- |
| यवतमाळ | ४१.२ | २४.० |

# एकात्म समरस समाजामुळे होणार 'राष्ट्रोत्थान'

## सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन

◆ **मुंबई, ८ एप्रिल**

सामाजिक एकात्मता हा समरसतेचा गाभा आहे. अशा एकात्म समरस समाजामुळेच राष्ट्रोत्थान होणार आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले.

निखळ राष्ट्रभक्तीची आणि एकात्मतेची तेजस्वी वाटचाल करणाऱ्या साप्ताहिक 'विवेक' च्या 'राष्ट्रोत्थान' या ग्रंथाचे प्रकाशन सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी ते म्हणाले, संघ केवळ संस्था नाही, ते एक जागृत आंदोलन आहे. जीवनाच्या प्रत्येक अंगाला भिडणारे, शाश्वत मूल्यांची प्रचीती देणारे हे जीवनदर्शन संघाच्या विचारधारेतून प्रकटते.



समरस समाजाची निर्मिती हेच संघाचे अंतिम ध्येय असून, या दिशेने संघ अविरत कार्य करीत आहे आणि करीत राहणार आहे.

समाजाला जागृत करण्याच्या कार्यात 'विवेक'चे योगदान अतुलनीय आहे. हा दिव्य दीपस्तंभ, आता संपूर्ण जगाला मार्गदर्शन करेल, असा भारत घडवण्याचे स्वप्न साकार करत आहे. गेली ७५ वर्षे अखंड राष्ट्रहित आणि समाजभान जागवणाऱ्या या पत्रिकेचे त्यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी चैत्र शुद्ध दशमीच्या पावन मुहूर्तावर, 'विवेक प्रकाशन'तर्फे 'राष्ट्रोत्थान' हा प्रेरणादायी ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. लक्ष्मीकांत खाबिया (रत्नमोहन ग्रुप, पुणे), उमेश भुजबळ (स्कॉन इन्फ्रा), रवींद्र गोळे, राहुल पाठारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश पतंगे यांनी केले. यावेळी साप्ताहिक विवेकच्या डिजिटल ग्राहक नोंदणी अभियानाची सुरुवात देखील मोठ्या उत्साहात करण्यात आली. ◂*(तभा वृत्तसेवा)*



# काँग्रेस नेत्याच्या एसयूव्हीने पादचाऱ्यांना चिरडले, तीन ठार

◆ **जयपूर, ८ एप्रिल**

एका मद्यधुंद एसयूव्ही चालकाने शहरातील अरुंद रस्त्यावरून वेगाने जात अनेक पादचाऱ्यांना आणि वाहनांना धडक दिली. यात तिघांचा मृत्यू आणि सहा जण गंभीर जखमी झाले, असे पोलिसांनी मंगळवारी सांगितले.

एमआय रोडवरून नाहरगड परिसरातील अरुंद गल्लीत गाडी जात असताना, तिने वाटेत येणाऱ्या लोकांना आणि वाहनांना चिरडले. उस्मान खान असे या चालकाचे नाव असून, तो एक कारखाना मालक आणि काँग्रेसचे जयपूर जिल्हा उपाध्यक्ष आहे. या घटनेनंतर स्थानिक लोक नाहरगड पोलिस ठाण्यात जमले आणि त्यांनी रस्ते अडवून निषेध केला. पीडितांना आणि त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक भरपाई, सरकारी नोकरी आणि इतर मदतीची मागणी केली. ◂*(वृत्तसंस्था)*

# अरुणाचलमधील सरकारी कार्यालयातून हेरॉईन जप्त

◆ **इटानगर, ८ एप्रिल**

मादकपदार्थांच्या विरोधातील 'ऑपरेशन डॉन २.०'ला मोठे यश मिळाले असून, इटानगर पोलिसांनी सोमवारी मादकपदार्थ पुरवठादाराला अटक केली. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी नागरी सचिवालय परिसरातून ४४.३६ ग्रॅम हेरॉईन जप्त केले, अशी माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने मंगळवारी दिली.

अटक करण्यात आलेला आरोपी राज्याच्या फलोत्पादन विभागात 'मल्टी-टास्किंग स्टाफ' म्हणून कार्यरत आहे, असे इटानगरचे पोलिस अधीक्षक रोहित राजबीरसिंह यांनी सांगितले. त्याच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेल्या हेरॉईनचे मूल्य जवळपास ३.७ लाख रुपये आहे.

सचिवालय इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील ब्लॉक तीनच्या बाथरूममध्ये संशयित पुरवठादाराने मादकपदार्थ लपवल्याची माहिती सुरक्षा कर्मचाऱ्याने दिली, असे एका कर्मचाऱ्याने पोलिसांना सांगितल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. उच्च सुरक्षा असलेल्या सरकारी ठिकाणावर मादकपदार्थ विक्रीचा प्रयत्न संशयिताकडून केला जात होता, असे अधीक्षकांनी सांगितले. उपविभागीय पोलिस अधिकारी केंगो दिर्ची यांच्या नेतृत्वातील पोलिस पथकाने आरोपीला घटनास्थळावरून अटक केली. संशयित हा गोम्पा मंदिराजवळील झीरो पॉईंट येथील रहिवासी आहे. ◂*(वृत्तसंस्था)*

# सौर-पवनऊर्जा उत्पादनात भारत तिसरा

## जर्मनीला टाकले मागे

◆ **नवी दिल्ली, ८ एप्रिल**

२०२४ मध्ये सौर आणि पवनऊर्जेच्या माध्यमातून सर्वाधिक वीज निर्मिती करण्यात भारत जगातील तिसरा देश ठरला. भारताने सौर-पवनऊर्जा निर्मितीत जर्मनीला मागे टाकले असल्याचे मंगळवारी प्रकाशित झालेल्या अहवालात म्हटले आहे.

मागील वर्षी पवन आणि सौरऊर्जेने एकत्रितपणे जागतिक वीजनिर्मितीच्या १५ टक्के निर्मिती केली होती. यात भारताचा वाटा १० टक्के होता, असे जागतिक ऊर्जा 'थिंक टँक' एम्बरच्या ग्लोबल इलेक्ट्रिसिटी रिव्ह्यूच्या सहाव्या आवृत्तीत म्हटले आहे. २०२४ मध्ये अक्षय ऊर्जा आणि अणुऊर्जेसह कमी कार्बन स्रोतांनी एकत्रितपणे जगातील



४०.९ टक्के वीज पुरवली. १९४० नंतर प्रथमच ४० टक्क्यांचा टप्पा ओलांडण्यात आला, असे अहवालात म्हटले आहे.

स्वच्छ स्रोतांच्या माध्यमातून झालेल्या वीजनिर्मितीत भारताचा वाटा २२ टक्के होता. जलविद्युत ऊर्जेचा वाटा यात ८ टक्के, तर पवन आणि सौरऊजेचा एकत्रितपणे हा वाटा १० टक्के होता. जागतिक पातळीवर स्वच्छ विजेच्या वाढीत नूतनकरणीय ऊर्जेचा मोठा हिस्सा होता. २०२४ मध्ये ८५८ टेरावॉट तास वाढ झाली. २०२२ मधील विक्रमाच्या तुलनेत हे प्रमाण ४९ टक्के जास्त आहे.

२०२४ मध्ये ४७४ टेरावॉटची भर पडून सलग तिसऱ्या वर्षी सौरऊर्जा हा नवीन विजेचा सर्वांत मोठा स्रोत होता. सलग २० व्या वर्षी हा सर्वांत झपाट्याने वाढणारा ऊर्जा स्रोत राहिला आहे. केवळ तीन वर्षांत जागतिक सौरऊर्जा निर्मिती दुप्पट होऊन एकूण वीज मिश्रणाच्या ६.९ टक्के झाली. भारतातही सौरऊर्जेत झपाट्याने वाढ झाली. २०२४ मध्ये देशाच्या विजेमध्ये सौरऊर्जेचा वाटा ७ टक्के राहिला आहे.

> सौरऊर्जा ही जागतिक ऊर्जा संक्रमणाचे इंजिन बनली आहे. बॅटरी स्टोरेजसह, सौरऊर्जा ही एक अविश्वसनीय शक्ती बनणार आहे. नवीन विजेचा सर्वांत वाढणारा आणि सर्वांत मोठा स्रोत म्हणून जगातील वाढत्या विजेच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी ते अत्यंत महत्त्वाचे आहे.
>
> **फिल मॅक्डोनाल्ड**, एम्बरचे व्यवस्थापकीय संचालक

मंगळवारी प्रसिद्ध झालेल्या अहवालात २०२४ मध्ये वीज निर्मितीवरील खुल्या डेटासेटसह जागतिक वीज मागणीच्या ९३ टक्के वाटा असलेल्या ८८ देशांचा समावेश आहे आणि त्यात २१५ देशांचा ऐतिहासिक डेटा समाविष्ट आहे.

वीज उत्पादनात सौरऊर्जेचा वाटा सात टक्के

२०२४ मध्ये भारताने सौरऊर्जेच्या माध्यमातून २४ गिगावॉट वीज उत्पादन घेतले. हे २०२३ मधील उत्पादनाच्या दुप्पट होते. या माध्यमातून देश चीन आणि अमेरिकेनंतर जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सौरऊर्जेच्या माध्यमातील वीज निर्मिती करणारा देश ठरला आहे. भारततही सौरऊर्जेमध्ये झपाट्याने वाढ झाली. २०२४ मध्ये देशाच्या विजेमध्ये सौरऊर्जेटा सात टक्के वाटा होता, २०२१ पासून उत्पादन दुप्पट झाले. ◂*(वृत्तसंस्था)*



उन्हाळा चांगलाच तापला असताना सोलापुरात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी महानगरपालिकेने बोलाविलेल्या पाण्याच्या टँकरमधून पाणी घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती

# नागपूर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर प्राधिकरणांना शासकीय जमिनी मिळणार

**राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय**

◆ **मुंबई, ८ एप्रिल**

राज्यातील नागपूर, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणांच्या नावावर वर्ग करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयानुसार, महानगर प्रदेशातील सर्व भारमुक्त शासकीय जमिनी राज्य शासनाच्या अटी व शर्तींनुसार प्राधिकरणांना हस्तांतरित करण्यात येणार आहेत. संबंधित प्राधिकरण या जमिनींचा उपयोग मंजूर प्रादेशिक किंवा विकास योजनेनुसार पायाभूत सुविधांसाठी निधी उभारण्याच्या स्रोत म्हणून करू शकतील. प्राधिकरणांकडे वर्ग होणाऱ्या जमिनींची विल्हेवाट विहित नियमावलीनुसार करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून, राज्य शासनाच्या मान्यतेने प्रत्येक प्राधिकरणानाला स्वतंत्र जमीन विल्हेवाट नियमावली तत्काळ तयार करावी लागणार आहे.

या जमिनींच्या वापराबाबत महसूल व वन विभागाच्या स्तरावर स्वतंत्र अभिलेख ठेवले जातील आणि त्याचे डिजिटायझेशन केले जाणार आहे. गायरान, गुरचरण, देवस्थान किंवा वन जमिनींचा समावेश असल्यास, त्या जमिनींवर सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसारच कार्यवाही करावी लागेल, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली तसेच हस्तांतरित होणाऱ्या जमिनी स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत किंवा जिल्हा परिषदेच्या ताब्यात असतील, तर त्यांचा विकास करण्याआधी संबंधित संस्थेची परवानगी किंवा ठराव घेणे प्राधिकरणांना अनिवार्य राहील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे महानगर प्रदेश विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीसाठी निधी उभारण्यास प्राधिकरणांना मोठा आधार मिळणार आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

## शासकीय आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी महाविद्यालयांतील अध्यापकांच्या मानधनात वाढ

राज्यातील शासकीय आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी तसेच योग व निसर्गोपचार महाविद्यालयांतील कंत्राटी अध्यापकांच्या मानधनात वाढ करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

शासकीय महाविद्यालयांतील सेवानिवृत्ती, राजीनामा, पदोन्नती व इतर कारणांमुळे पदे सातत्याने रिक्त होत असतात. या रिक्त पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियमित भरती होईपर्यंत २०२२ मध्ये कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार ठोक मानधन तत्त्वावर अध्यापकांची नियुक्ती करण्यात येत आहे. काही विषयांसाठी पात्र उमेदवार सहज उपलब्ध होत नसल्याने ठोक मानधनात वाढ करण्याची आवश्यकता जाणवत होती. या पृष्ठभूमीवर ठोक मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**नवीन मानधन असे**

प्राध्यापक - १ लाख ५० हजार रुपये
सहयोगी प्राध्यापक १ लाख २० हजार रुपये
सहाय्यक प्राध्यापक १ लाख रुपये

# झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र योजनेला गती देणार

## अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता

◆ **मुंबई, ८ एप्रिल**

राज्यातील झोपडपट्टी पुनर्वसनाला गती देऊन महाराष्ट्र झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा व पुनर्वसन कायद्यात सुधारणा करण्यास आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

या निर्णयानुसार महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मूलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१ मधील तीन तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. झोपडपट्टीची जमीन झोपडपट्टी क्षेत्र घोषित केल्यानंतर जमीन मालक, विकासक किंवा सहकारी संस्थेला या जमिनीवरील पुनर्वसनाचा प्रस्ताव १२० दिवसात सादर करावा द्यावा लागत असे. ही मुदत आता ६० दिवसांची करण्यात येणार आहे. या ६० दिवसांत संबंधितांनी प्रस्ताव न दिल्यास झोपडपट्टीचे क्षेत्र पुनर्विकासासाठी इतर प्राधिकरणास सोपवू शकणार आहेत, याबाबतची दुरुस्ती कलम १५(१) मध्ये केली जाणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील झोपडपट्टी पुनर्वसन योजना शासकीय, निमशासकीय महामंडळे, प्राधिकरणे किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत संयुक्त भागीदारी तत्त्वावर राबवण्यात येत असल्यास, त्यांना आता योजनेला आशयपत्र दिल्यानंतर ३० दिवसांच्या आत ही जमीन ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने उपलब्ध करून दिली जाईल. जेणेकरून योजनेच्या अंमलबजावणीसाठी बँक किंवा वित्तीय सस्थांकडून कर्ज, अर्थसहाय्य मिळविणे शक्य होणार आहे. याबाबतची दुरुस्ती कलम १५ अ मध्ये केली जाणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजना व प्रकल्पांमध्ये स्वेच्छेने सहभागी न होणाऱ्या झोपडपट्टीवासीयांबाबत करावयाची कार्यपद्धती आता कलम ३३-अ मध्ये विस्ताराने समाविष्ट करण्यात येत आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये झोपडीधारकांना संक्रमण शिबिराऐवजी भाडे देण्यात येते. पण झोपडपट्टीधारकांना विकासकांकडून हे भाडे वेळेत दिले जात नाही. त्याची थकबाकी वाढत जाते. संक्रमण शिबिराचे भाडे किंवा इतर देणे विकासकाकडून वसूल करता यावे यासाठीची कायदेशीर तरतूद करण्यासाठी कायद्यात ३३-बी नव्याने समाविष्ट करण्यात येणार आहे. यात विकासकांकडून भाडे थकबाकीची वसुली महसुली कायद्यानुसार केली जाणार आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

## ग्रामपंचायत, पं.स., जि.प. सदस्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

राज्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. याबाबत अध्यादेश काढण्यास बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या परंतु जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने सदस्यत्व रद्द झालेल्या सदस्यांना प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी अनेक लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली होती.

त्यानुसार ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या १ ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यानंतर अध्यादेश जारी होईपर्यंत झालेल्या सर्वसाधारण निवडणुका अथवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणि त्या अनुषंगिक बाबींसाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली. यासाठी महाराष्ट्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास तात्पुरती मुदतवाढ अध्यादेश काढण्यास मान्यता देण्यात आली.

# मुंबई पोलिस, शिवसेना आमदाराला बजावली नोटीस

## कुणाल कामरा प्रकरणी उच्च न्यायालयात १६ रोजी सुनावणी

◆ **मुंबई, ८ एप्रिल**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गीत गायल्याप्रकरणी दाखल गुन्हा रद्द करण्याची मागणी स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामराने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर मंगळवारी झालेल्या सुनावणीत खंडपीठाने मुंबई पोलिस आणि तक्रारदार शिवसेनेचे आमदार मुरजी पटेल यांना नोटीस बजावली. त्यात गुन्हा रद्द करण्याच्या याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचह आदेश दिला तसेच यावर १६ एप्रिल रोजी सुनावणी निश्चित केली.

कामराने विडंबनात्मक गीतातून उपमुख्यमंत्री शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा गद्दार असा उल्लेख केला होता. यावरून शिवसेनेचे आमदार मुरजी पटेल यांच्या तक्रारीवरून कामराविरोधात खार पोलिस ठाण्यासह राज्यातील विविध पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. सर्व गुन्ह्यांचा तपास मुंबई पोलिसांकडे देण्यात आला. कामराने उच्च न्यायालयाकडे गुन्हा रद्द करण्याची मागणी केली होती. या याचिकेवर न्याय सारंग कोतवाल आणि न्या. एस.एम. मोडक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

पोलिस आणि तक्रारदार आमदार पटेल यांना याचिकेवर उत्तर दाखल करण्याचा आदेश खंडपीठाने दिला. याप्रकरणात पुढील सुनावणी आता १६ एप्रिल होणार असल्याचे न्यायाधीशांनी निश्चित केले. दरम्यान, कामरा याला मुंबई पोलिसांनी तीन समन्स बजावले; मात्र त्याने चौकशीसाठी हजर राहणे टाळले. यानंतर त्याने दाखल झालेला गुन्हा रद्द करण्याची मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली. ◂*(वृत्तसंस्था)*

### गुन्हा दाखल करणे मूलभूत अधिकाराचे उल्लंघन

कामराच्या याचिकेवर युक्तिवाद करताना त्याचे वकील नवरोज सेर्वाई यांनी सांगितले की, त्याचे विधान राजकीय घटनांवर, विशेषतः शिवसेनेतील फूट आणि २०२२ मध्ये उद्धव ठाकरेंविरुद्ध शिंदे यांनी केलेल्या बंडाच्या संदर्भात होते. त्यामुळे त्याच्याविरोधात दाखल केलेला गुन्हा मूलभूत अधिकारांचे विशेषतः भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचे, जीवन आणि स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन आहे. जीवाला धोका असल्याने तो पोलिसांसमोर चौकशीला हजर राहू शकला नाही. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे तपासात सहकार्य करण्याची तयारी आहे.

# नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना

◆ **मुंबई, ८ एप्रिल**

राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था नागपूर येथे स्थापन करण्याचा निर्णय आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या धर्तीवर राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था स्थापन करण्यात येणार आहे. राज्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना सक्षमपणे प्रतिसाद देण्यासाठी आपत्ती पूर्व तयारी, सौम्यीकरण, आपत्ती प्रवणता, धोका, आपत्तीनंतर मदत व पुनर्वसन, पुनर्बांधणी तसेच प्रतिसाद, प्रशिक्षण या बाबींचे व्यवस्थापन व नियोजन राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेमार्फत (एसआयडीएममार्फत) होणार आहे. संस्थेसाठी नागपूर येथील महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरण (मिहान) येथे १० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या संस्थेच्या इमारतीच्या बांधकामासाठी १८७ कोटी ७३ लाख रुपयांच्या निधीच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली. संस्थेसाठी कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक असणारी संवर्गनिहाय नियमित व कंत्राटी पदे तसेच तांत्रिक सल्लागार इत्यादी मनुष्यबळ घेण्यास व त्यासाठीच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. राज्याच्या मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य कार्यकारी समिती ही या संस्थेसाठी नियामक समिती म्हणून काम पाहणार आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पूर्व इम्फाळमध्ये दोन बंडखोरांना अटक

**इम्फाळ, ८ एप्रिल**

मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यात बंदी घातलेल्या संघटनांशी संबंधित दोन बंडखोरांना सुरक्षा जवानांनी अटक केली. सोमवारी चुराचंदपूर, कांगपोक्पी आणि इम्फाळ पूर्व येथे शोध मोहिमांमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला, असे पोलिसांनी सांगितले.

सोमवारी इम्फाळ पूर्वेतील पेबिया पानफी येथून बंदी घातलेल्या युनायटेड पीपल्स पार्टी ऑफ कांगलेईपाकच्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली. जिल्ह्यातील केराओ वांगखेम येथून प्रेपाकचा सदस्य असलेल्या आणखी एका बंडखोराला अटक करण्यात आली, अशी माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.

शोध मोहिमांमध्ये सुरक्षा दलांनी रायफल, हँडग्रेनेड, पिस्तूल आणि मोर्टार बॉम्ब जप्त केले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



पीएम मुद्रा योजनेला १० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मंगळवारी नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेतील लाभार्थींशी संवाद साधला आणि त्यांच्याकडून सूचनाही ऐकून घेतल्या

# अमेरिकेपुढे झुकणार नाही, अखेरपर्यंत लढणार

### ट्रम्प यांच्या इशाऱ्यावर चीनचे प्रत्युत्तर

### भारतासोबत वाढवणार व्यापार

**बीजिंग, ८ एप्रिल**

चीनने अमेरिकन वस्तूंवरील आयात शुल्क कपात न केल्यास त्यांच्यावर ९ एप्रिलपासून ५० व्यापारी कर लादण्याचा इशारा अमेरिकेने दिला. त्यावर चीनने अमेरिकेपुढे कुठल्याही परिस्थितीत झुकणार नसून, अखेरपर्यंत आयात शुल्काविरोधात लढा सुरू ठेवणार आहे तसेच भारतातून आयात



वाढविणार असल्याचे स्पष्ट केले.

चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, अमेरिकेने कितीही धमक्या दिल्या तरी आम्ही माघार घेणार नाही. आम्ही आमचे हितसंबंध आणि राष्ट्रहितासाठी कुठलीही तडजोड करणार नाही. अमेरिकेने ५० नव्हे तर १०० टक्के व्यापारी शुल्क लादले तरी आम्ही झुकणार नाही. आम्ही इतर देशाशी चर्चा करीत आहोत, अमेरिकेला पर्याय म्हणून भारतासोबतचा व्यापार वाढविला जाईल. अमेरिकन वस्तूंची तूट भरून काढण्यासाठी भारतातून आयात वाढविण्याचा विचार करीत आहे. स्वतःचे हक्क आणि हितसंबंध जपण्यासाठी दृढनिश्चयाने प्रतिकारक उपाययोजना आखवल्या जातील. चीनविरुद्ध शुल्क वाढवण्याची अमेरिकेची धमकी मोठी चूक आहे. आम्ही संवाद आणि सहकार्याद्वारे वाद सोडवण्याच्या बाजूने आहो; परंतु दबाव कदापि मान्य नाही. अमेरिकेने आपल्याला त्याच्या मार्गावर जाण्यास भाग पाडले तर चीन शेवटपर्यंत लढेल. (वृत्तसंस्था)



### प्रत्युत्तरात्मक पावले उचलणार

चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी म्हटले की, आम्ही व्यापार शुल्काच्या मुद्यावर अमेरिकेशी चर्चा करण्यास तयार आहो; परंतु कोणत्याही परिस्थितीत अमेरिकेच्या दबावापुढे झुकणार नाही. अमेरिका आंतरराष्ट्रीय नियमांना बगल देत असून, सर्व देशांनी एकत्र येत याला विरोध करायला हवा. दरम्यान ट्रम्प यांनी सोमवारी इशारा देत म्हटले होते की, चीनने प्रत्युत्तरात्मक शुल्क उठवले नाही, तर आयात होणाऱ्या वस्तूंवर ५० टक्के अतिरिक्त शुल्का आकारले जाईल आणि त्या देशसोबतच्या सर्व बैठक देखील रद्द केल्या जातील.



### चर्चेतून मार्ग काढू

ट्रम्प यांनी भारतावर लावलेल्या २६ टक्के व्यापार शुल्कावर परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी एक्सवरील पोस्टमध्ये लिहिले की, भारत अमेरिकेसोबत चर्चा करून तोडगा काढणार आहे. ट्रम्प यांचे आंतरराष्ट्रीय संबंधविषयक प्रमुख सल्लागार मार्को रूबियो यांच्याशी नुकतीच चर्चा केली. भारतीय उपखंड, इंडो-पॅसिफिक, मध्य-पूर्व आशिया आणि कॅरेबियन देशांविषयी आमच्यात चर्चा झाली. द्विपक्षीय व्यापार कराराला लवकरात लवकर मूर्त रूप देण्यावर दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली.

# अमेरिकेतील तीन लाख भारतीय विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला

### ट्रम्प सरकारने मांडले नवीन विधेयक

**वॉशिंग्टन, ८ एप्रिल**

अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सादर केलेल्या टॅरिफनंतर आता त्यांच्या नव्या विधेयकाने अमेरिकेत शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात लोटताना दिसत आहे.

राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय चर्चेत आणि वादात अडकले आहेत. त्यात बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या स्थलांतरितांची पाठवणी आणि जगभरातील देशांवर सरसकट रेसिप्रोकल टॅरिफ लागू करण्याच्या निर्णयावर आंतरराष्ट्रीय वर्तुळातून तीव्र पडसाद उमटले. आता लोकप्रतिनिधी सभागृहात डोनाल्ड ट्रम्प सरकारने प्रस्तावित केलेले नवीन विधेयक तिथे राहणाऱ्या ३ लाखांहून अधिक भारतीय विद्यार्थ्यांच्या मुळावर उठण्याची शक्यता आहे.

अमेरिकन काँग्रेसमध्ये सादर झालेल्या या विधेयकामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. अमेरिकेत शिक्षण किंवा त्यानंतर तिथे कामाचा अनुभव घेण्यासाठी व्हिसा नियमांमध्ये या विधेयकामुळे मोठे फेरबदल होणार आहेत. हे विधेयक अमेरिकन काँग्रेसने पारित केल्यास तिथे राहणाऱ्या अशा भारतीय विद्यार्थ्यांना तातडीने देश सोडून मायदेशी परतावे लागणार आहे.

या विधेयकामुळे अमेरिकेत राहणाऱ्या सर्व विदेशी विद्यार्थ्यांच्या वास्तव्यावर टांगती तलवार आली आहे. यात प्रामुख्याने एसटीईएम (सायन्स, टेक्नॉलॉजी, अभियांत्रिकी, वैद्यकीय) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना फटका बसणार असल्याचे सांगितले जात आहे. या विद्यार्थ्यांसाठी ऑप्शनल प्रॅक्टिलक ट्रेनिंगचा पर्याय रद्द करण्याचा प्रस्ताव या विधेयकात मांडण्यात आला आहे. त्यामुळे अमेरिकेत शिक्षण व त्यानंतर करिअर घडवण्याचे स्वप्न उराशी बाळगलेल्या विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका बसणार आहे.

यापूर्वी अमेरिका सरकारने विविध विद्यार्थी आंदोलनातील परदेशी विद्यार्थ्यांना मेल पाठवून त्यांना देश सोडण्यास सांगितले होते. (वृत्तसंस्था)

### काय आहे ओपीटी उपक्रम?

ओपीटी उपक्रमांतर्गत अमेरिकेत पदवी शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना काम शोधण्यासाठी वेळ मिळावा म्हणून त्यांच्या व्हिसाची मुदत एक वर्षासाठी वाढवता येते. ही एक वर्षाची मुदत नंतर आणखी दोन वर्षांसाठी वाढवता येते. यासाठी तुम्ही एसटीईएम अभ्यासक्रमाचे पदवीधर असणे आणि अमेरिकेत एखाद्या नामांकित व्यक्ती वा संस्थेत अनुभवासाठी काम करत असणे ही अट ठेवण्यात आली आहे. पण, नवीन विधेयकात विद्यार्थ्यांसाठीचा ओपीटीचा पर्यायच काढून घेण्याचे प्रस्तावित आहे.

### उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांचा मुलगा आगीत जखमी

**हैदराबाद** : दाक्षिणात्य अभिनेते, आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांचा आठ वर्षांचा मुलगा मार्क शंकर आगीत गंभीर जखमी झाला. सिंगापूर येथील शाळेत लागलेल्या आगीत ही घटना घडली. पवन कल्याण यांचा मुलगा मार्क शंकर सिंगापूरमधील एका शाळेत शिक्षण घेत आहे.

# २०३४ मध्ये देशात एकाच वेळी निवडणुका

### योगी आदित्यनाथांनी दिले संकेत

**लखनौ, ८ एप्रिल**

१९५२ ते १९६७ पर्यंत देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या. आजही काही राज्यांमध्ये हा प्रयोग केला जात आहे. आता ते कायमस्वरूपी करण्याची वेळ आली आहे. कदाचित २०३४ मध्ये देशात एकाच वेळी निवडणुका होतील, असे स्पष्ट संकेत उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिले.

एका मुलाखतीत योगी म्हणाले, वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे देशाच्या जीडीपीवर १.५ टक्के परिणाम होतो, ज्यामुळे ३.५ ते ४ लाख कोटी रुपये खर्च होतात. ही रक्कम अनेक राज्यांच्या एकूण वार्षिक अर्थसंकल्पापेक्षा जास्त आहे. देशाला वेगाने पुढे जायचे असेल, तर निवडणूक व्यवस्थेत बदल आवश्यक आहे. दरवर्षी निवडणुका घेतल्याने केवळ राजकीय हालचाली वाढत नाहीत, तर विकास प्रकल्पांचा वेगही मंदावतो.

ही केवळ राजकीय चर्चा नाही, तर राष्ट्रीय हिताचा मुद्दा आहे. एक राष्ट्र, एक निवडणूक ही आता एक कल्पना राहू नये, ती एक ध्येय बनली पाहिजे. यासाठी समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घ्यावे लागेल, असेही योगी म्हणाले. मागील वर्षीपासून देशात एकाच वेळी सर्व निवडणुका घेण्याचा विचार समोर आला आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### अल्लू अर्जुनच्या नव्या चित्रपटाची घोषणा

**हैदराबाद** : पुष्पा २ चित्रपटातून इतिहास रचल्यानंतर अल्लू अर्जुनने त्याच्या चाहत्यांना एक खास भेट दिली आहे. वाढदिवसानिमित्त त्याने त्याच्या पुढच्या चित्रपटाची घोषणा केली. यावेळी तो पहिल्यांदाच दिग्दर्शक ॲटलीसोबत काम करणार आहे. सन पिक्चर्सने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला, ज्यात



ॲटली आणि अल्लू अर्जुन त्यांच्या नवीन प्रोजेक्टसाठी एकत्र दिसत आहेत. व्हिडीओमध्ये तो चित्रपटावर स्वाक्षरी करताना आणि लॉस एंजेलिसमधील व्हीएफएक्स स्टुडिओला भेट देताना दाखवले आहे. प्रथम अल्लू अर्जुन चेन्नईतील प्रॉडक्शन हाऊसच्या ऑफिसकडे जाताना दाखवला जातो, जिथे तो दिग्दर्शक ॲटली आणि निर्माते कलानिधी मारन यांना भेटतो. तिघेही एकत्र चर्चा करतात आणि नंतर प्रकल्पावर सही करतात. या चित्रपटाला तात्पुरता 'एए२२-ए६' असा हॅशटॅग देण्यात आला आहे.

### 'मेट गाला २०२५'मध्ये कियारा अडवाणीचे पदार्पण

**मुंबई** : कियारा अडवाणी सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. तिने २८ फेब्रुवारी रोजी तिच्या गरोदरपणाची घोषणा केली. आता लवकरच ती मेगा फॅशन इव्हेंट मेट गालामध्ये पदार्पण करणार आहे. गेल्या वर्षी ती कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये सहभागी झाली होती, जिथे ती रेड सी फिल्म फाऊंडेशनच्या वतीने कान्स गाला डिनरमध्ये सहभागी झाली होती. मेट गाला हा दरवर्षी न्यू यॉर्कमधील मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्टच्या कॉस्च्युम इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित केला जाणारा एक चॅरिटी कार्यक्रम आहे. त्याची सुरुवात १९४८ मध्ये सोसायटी मिडनाईट डिनर म्हणून झाली. या फॅशन शोमध्ये भारत आणि परदेशातील स्टार्स इतरांपेक्षा एक चांगला पोशाख घालून सहभागी होतात. १९९५ पासून मेट गालाचे आयोजन आणि अध्यक्षपद व्होग मासिकाच्या मुख्य संपादक एना विंटूर यांच्याकडे आहे. सहसा दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या सोमवारी हे आयोजन केले जाते. याशिवाय, एना विंटूर स्वतः मेट गालाची थीम ठरवतात तसेच पाहुण्यांची निवड विंटूर आणि त्यांच्या टीमकडून केली जाते. २०१७ पासून यात भारतीय सेलिब्रिटीही सहभागी व्हायला लागले.



### 'सरू'मध्ये मोहक मटकरची प्रमुख भूमिका

**मुंबई** : झी टीव्ही ही वाहिनी एक कथा 'सरू' प्रस्तुत करीत आहे. आपल्या छोट्या शहराच्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन स्वप्ने पाहण्याचे धाडस करणाऱ्या एका तरुण मुलीची ही रोचक कथा आहे. हुशार मोहक मटकर यात सरस्वतीची मुख्य भूमिका साकारत असून, ती बारकाईने काम करणारी, आत्मविश्वास असलेली आणि स्वतंत्र अशी तरुण मुलगी आहे, जी आपल्या



मूल्यांसोबत जोडलेली आहे. राजस्थानच्या एका गावातील सरस्वती कबड्डी चॅम्पियन असून, तिचे जिल्हा आयुक्त बनण्याचे स्वप्न आहे. ती नीतिमान, धाडसी असली तरी संवेदनशील आहे. जर कोणी काही कारणास्तव तिच्याकडे बोट दाखवले तर ती मागे हटत नाही, अढळ विश्वासाने प्रतिक्रिया देते आणि तिचे म्हणणे ऐकून घेतले जाईल, याची खात्री करून घेते.

### मानहानी खटल्यातून मेधा पाटकर निर्दोष

**नवी दिल्ली, ८ एप्रिल**

दिल्लीच्या साकेत न्यायालयाने नर्मदा बचाव आंदोलनाच्या कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना नायब राज्यपाल विजयकुमार सक्सेना यांच्या मानहानी प्रकरणात दोषी ठरवले होते. या प्रकरणी त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने त्यांना कनिष्ठ न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला होता. दरम्यान, न्यायालयात झालेल्या सुनावणीत मेधा पाटकर यांना मोठा दिलासा मिळाला.

नायब राज्यपाल सक्सेना यांनी दाखल केलेल्या २३ वर्षे जुन्या मानहानी खटल्यात दोषी ठरवल्याबद्दल साकेत जिल्हा न्यायालयाने मंगळवारी मेधा पाटकर यांना एक वर्षाच्या प्रोबेशनवर मुक्त केले. मेधा पाटकर मंगळवारी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर राहिल्या होत्या. सक्सेना यांची बदनामी केल्याबद्दल पाटकर यांना तुरुंगवास भोगावा लागणार नाही, असे सत्र न्यायालयाने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)



गुजरातच्या अहमदाबाद येथे मंगळवारपासून काँग्रेस कार्यसमितीची दोन दिवसीय बैठक सुरू झाली. या बैठकीसाठी आलेले पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी तसेच राहुल गांधी

# ३४ हजार सैनिकांच्या भत्त्यात होणार वाढ

### मुख्यमंत्री योगींचा मोठा निर्णय

**लखनौ, ८ एप्रिल**

उत्तरप्रदेशच्या योगी आदित्यनाथ सरकारने राज्यातील युवा आणि आरोग्य सेवा क्षेत्रात एक मोठा निर्णय घेतला आहे. मंगळवारी मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण १५ प्रस्ताव सादर करण्यात आले, त्यापैकी १३ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या निर्णयांपैकी सर्वांत महत्त्वाचा निर्णय म्हणजे पीआरडी सैनिकांच्या दैनिक भत्त्यात वाढ करण्याचा आहे. यामुळे राज्यातील ३४ हजारांवर सैनिकांना थेट फायदा होणार आहे.

राज्य सरकारने पीआरडी सैनिकांचा दैनिक भत्ता ३९५ वरून ५०० रुपयांपर्यंत वाढवला आहे. यामुळे त्यांचे मनोबल वाढेल आणि सेवेत अधिक तत्परता येईल, असा अधिकाऱ्यांना विश्वास आहे. अयोध्येत विशेष बाल संगोपन केंद्र स्थापन करण्याचा प्रस्तावही मंत्रिमंडळाने मंजूर केला आहे. हे केंद्र ३ ते ७ वर्षे वयोगटातील मुलांची काळजी घेईल. दिव्यांगांच्या सक्षमीकरण विभागाला नुझुल जमिनीची मोफत जागा देण्यात आली आहे तसेच अयोध्येतील सीता नेत्र रुग्णालयाच्या अतिरिक्त जमिनीवर ३०० खाटांचे एक नवीन सरकारी रुग्णालय बांधले जाईल. हे रुग्णालय १२,७९८ चौरस मीटर क्षेत्रात बांधले जाईल, जे अयोध्या तसेच आसपासच्या जिल्ह्यांतील लोकांना चांगल्या आरोग्य सुविधा प्रदान करेल.

आरोग्य सेवांच्या क्षेत्रातही हाथरस जिल्ह्याला मोठी देणगी मिळाली आहे. आता जिल्हा रुग्णालयासोबत एक वैद्यकीय महाविद्यालय बांधले जाईल. (वृत्तसंस्था)

# ब्रह्मकुमारीजच्या दादी रतन मोहिनी यांचे देहावसान

### वयाच्या १०१व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**अहमदाबाद, ८ एप्रिल**

ब्रह्मकुमारीज इन्स्टिट्यूटच्या मुख्य प्रशासक दादी रतन मोहिनी यांचे सोमवारी रात्री १.२० वाजता अहमदाबाद येथील एका खाजगी रुग्णालयात निधन झाले. त्या १०१ वर्षांच्या होत्या.



संस्थेच्या पीआरओ बीके कोमल यांनी सांगितले की, दादींचे पार्थिव मंगळवारी अहमदाबादहून अबू रोड येथील ब्रह्मकुमारी संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालयात आणण्यात आले, जिथे मृतदेह अंतिम संस्कारासाठी ठेवण्यात आला आहे. अन्त्यसंस्काराची तारीख लवकरच संस्थेच्या अधिकाऱ्यांकडून जाहीर केली जाईल.

दादींचा जन्म २५ मार्च १९२५ रोजी हैदराबाद, सिंध (सध्याचे पाकिस्तान) येथे झाला. त्यांचे नाव लक्ष्मी होते. वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी त्या ब्रह्मकुमारी संस्थेच्या संपर्कात आल्या. लहानपणापासूनच अध्यात्मात रस असलेल्या दादींनी संस्थेच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावली. दादी रतन मोहिनी त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसांपर्यंत सक्रिय राहिल्या. ब्रह्म मुहूर्ताच्या वेळी त्या दररोज पहाटे ३.३० वाजता उठायच्या आणि रात्री १० वाजेपर्यंत सेवेत मग्न असायच्या.

भारतीय संस्कृती आणि मूल्यांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक पदयात्रा केल्या. १९८५ मध्ये त्यांनी १३ यात्रा केल्या आणि २००६ मध्ये ३१ हजार किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला. एकूण ७० हजार किलोमीटरहून अधिक चालल्या. संस्थेत येणाऱ्या बहिणींच्या प्रशिक्षणाची आणि नियुक्तीची जबाबदारी राजयोगिनी दादी रतनमोहिनी यांनी घेतली. (वृत्तसंस्था)

### दोन तासांत १०८ सूर्यनमस्काराचा गिनीज रेकॉर्ड

**अल्लूरी, ८ एप्रिल**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त सूर्यनमस्काराच्या एका आयोजनाने भारताच्या नावे मोठी उपलब्धी नोंदविली आहे. आंध्रप्रदेशच्या अल्लूरी सीताराम राजू जिल्ह्यातील अराकू वैली डिग्री कॉलेज येथे 'योग महा सूर्य वंदनम्' कार्यक्रमांतर्गत जवळपास २० हजार आदिवासी विद्यार्थ्यांनी दोन तासांत १०८ सूर्यनमस्कार घातले. हा नवा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड झाला आहे.

जागतिक आरोग्य दिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याला लंडन वर्ल्ड रेकॉर्ड्स् युनियनचे प्रबंधक एलिस रेनॉड यांनी अधिकृत मान्यता दिली. त्यानंतर जिल्हाधिकारी दिनेश कुमार यांना गिनीजतर्फे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. एलिस रेनॉड म्हणाल्या, मी वर्ल्ड रेकॉर्ड युनियनची व्यवस्थापक असून, येथे २० हजार विद्यार्थ्यांचे सूर्यनमस्कार पाहण्यासाठी आले होते. येथे नवा विश्वविक्रम प्रस्थापित झाला आहे. त्यासाठी सर्वांचे अभिनंदन. (वृत्तसंस्था)

# तीन अंतराळवीरांना घेऊन सोयुझ बूस्टर यान झेपावले

### नासाचे जॉनी किम यांच्यासह दोन रशियन संशोधकांचा समावेश

**मॉस्को, ८ एप्रिल**

नासाचे अंतराळवीर जॉनी किम आणि दोन रशियन संशोधकांना घेऊन सोयुझ बूस्टर एमएस-२७ या यानाने मंगळवारी कझाकस्तान येथील बायकोनूर स्थानकावरून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकासाठी यशस्वीरीत्या प्रक्षेपण केले. यानात नासाचे अंतराळवीर जॉनी किम आणि रशियाचे सर्गेई रायझिकोव्ह व अलेक्सी झुब्रित्स्की यांचा समावेश असून, तिघेही आठ महिने अंतराळात राहणार आहे.

नासाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, रशियाने कझाकस्तानला बायकोनूर प्रक्षेपण स्थानक भाड्याने दिले आहे. मंगळवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास सोयुझ बूस्टर यानाने अवकाशात उड्डाण केले. काही तासांतच यान तिन्ही अंतराळवीरांना घेऊन आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या कक्षेत यशस्वीरीत्या पोहोचले. जॉनी किम हे मोहिमेचे नेतृत्व करीत आहेत.

बदलत्या वातावरणाचा पृथ्वीवर होणाऱ्या परिणामावर वैज्ञानिक संशोधन करणार आहेत. किम हे मूळचे अमेरिकेच्या लॉस एंजेलिस येथील रहिवासी आहे. ते अमेरिकन नौदलात लेफ्टनंट कमांडर आणि फ्लाईट सर्जन देखील आहे. याशिवाय, जपान एरोस्पेस एक्सप्लोरेशन एजन्सीचे अंतराळवीर ताकुया ओनिशी, रशियन अंतराळवीर अलेक्सी ओव्हचिनिन, इव्हान वॅग्नर आणि किरिल पेस्कोव्ह हे देखील अंतराळ स्थानकात असून, त्यांच्यासोबत तिन्ही अंतराळवीर एकत्र संशोधन करणार आहेत. (वृत्तसंस्था)



## अग्रलेख...

# इशारा आणि संधीदेखील!

दि. ७ एप्रिल २०२५ रोजी म्हणजे सोमवारी सकाळी शेअर बाजार उघडले तेव्हा देशात तसे सामान्य वातावरण होते. पण दिवसअखेर गुंतवणूकदारांच्या चेहऱ्यावर चिंतेच्या रेषा उमटू लागल्या. सेन्सेक्समध्ये प्रचंड घसरण झाली. शेअर बाजार कोसळला. शेअर बाजारातील चढ-उतार ही नेहमीची बाब असली, तरी ७ एप्रिलची घटना ही छोटीशी घटना नव्हती. ही घसरण म्हणजे केवळ संख्यात्मक किंवा लाक्षणिक घट नव्हती. मार्केट करेक्शन वगैरे जे म्हणतात, त्यातलेही काही नव्हते. जागतिक अर्थकारणात निर्माण होत असलेल्या अस्थिरतेची ही परिणती होती. गेल्या काही दशकांमध्ये अर्थकारणाचे जागतिकीकरण झालेले असल्यामुळे आणि अमेरिकेतील छोट्या-मोठ्या घटनांचा परिणाम संपूर्ण जगात जाणवत असल्यामुळे भारत या अस्थिरतेपासून वेगळा राहू शकत नाही. त्यामुळे अमेरिकेतील अस्थिरतेचा फटका भारताला बसणे स्वाभाविक होते आणि तसेच झाले. या आर्थिक झटक्याने आपल्याला हादरवून टाकले आहे हे खरे. मात्र, यातून सावरून आपण आपल्या आर्थिक भविष्याबद्दल अधिक जागरूक, सावध आणि स्वावलंबी व्हावे, हा या घटनेचा धडा आहे.

भारतात अर्थसाक्षरता अल्प आहे. शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्यांची संख्याही फार कमी आहे. मात्र, शेअर बाजारातील तेजी-मंदीचा परिणाम सर्व प्रकारच्या बाजारपेठांवर होतो आणि अंतिमतः तो प्रत्येक नागरिकावर कोणत्या ना कोणत्या स्वरूपात होतोच. आपण एक समजून घेतले पाहिजे की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेले टॅरिफ धोरण हे या घसरणीचे एक प्रमुख कारण होय. त्यांच्या नवनवीन धोरणांद्वारे, इक्वल टॅरिफ सूत्राद्वारे ते त्यांच्या देशाच्या हिताचे रक्षण करीत आहेत. त्यासाठी त्यांना दोष देता जाऊ शकत नाही. प्रत्येक देश आपल्या नागरिकांना आणि बाजारपेठेला प्राधान्य देतो आणि काहीही त्यात चूक नाही. अमेरिकेसारख्या देशातील आर्थिक निर्णयांचा परिणाम इतर देशांवरही होतो. भारत आता जागतिक आर्थिक व्यवस्थेत बऱ्यापैकी एकरूप झाला आहे. त्यामुळे भारताच्या अर्थकारणावर अमेरिकेतील आर्थिक उलथापालथीचे परिणाम होतातच, हे अनपेक्षित नाही. लक्षात घ्यायला हवे ते हे की, आपण १४० कोटी लोकसंख्या असलेले भारतीय म्हणजे जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहोत आणि बाजारपेठही आहोत. आपले मनुष्यबळ, ग्राहक शक्ती आणि इन्व्हेस्टिंगची क्षमता प्रचंड आहे. यापूर्वीच्या मंदी आपण पाहिल्या आणि देशांतर्गत बचतीच्या सवयींनी आपल्याला तारलेही. आता आपली ही क्षमता आणि शक्ती केवळ बाह्य गुंतवणूक आणि जागतिक स्थिरतेवर अवलंबून विकसित करण्याचा प्रयत्न होत राहिला तर प्रत्येक जागतिक कंपनाचा प्रतिध्वनी आपल्या वाट्याला येणारच. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही वर्षांपूर्वी आत्मनिर्भर भारताचा नारा दिलेला आहे. तो त्यांचा द्रष्टेपणा आहे आणि स्टार्टअप्समधील प्रगती हा त्याचाच परिणाम आहे. भारतात येत असलेली परदेशी गुंतवणूक हा त्याचा पुरावा. तरीही आत्मनिर्भरता पर्याप्त नाही, हे आपण आता तरी शिकले पाहिजे. आत्मनिर्भरतेच्या नाऱ्याचा अर्थ हाच आहे की, शक्य त्या सर्व क्षेत्रांत आपण स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी झाले पाहिजे. आपण जगापासून पूर्णपणे विलग होणे शक्य नाही. परंतु, जागतिक अर्थकारणावर आपली अर्थव्यवस्था पूर्णपणे अवलंबून राहणेही आपल्या हिताचे नाही. आता आपली अंतर्गत अर्थव्यवस्था इतकी मजबूत करण्याची वेळ आली आहे की, जागतिक घडामोडींचा आपल्याला धक्का बसेल, पण आपले अर्थकारण घसरणार नाही. भारत स्वावलंबी होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे हे खरेच; पण हे स्वावलंबन केवळ घोषणा किंवा योजनांपुरते मर्यादित नसावे. आपल्याला आपल्या उत्पादन क्षमता, तांत्रिक स्वावलंबन आणि धोरणांमध्ये मोठ्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, बँकिंग आणि शेती ही सारी क्षेत्रे आपल्याला इतकी मजबूत करावी लागतील की, कोणत्याही बाह्य दबावामुळे आपल्या अर्थव्यवस्थेला धक्का लागणार नाही. भारतातील आर्थिक साक्षरतेची स्थिती चिंताजनक आहे, हे देखील आपल्याला मान्य करावे लागेल. आपले नागरिक आर्थिक निर्णय सुज्ञपणे घेऊ शकत नसतील तर बाजारातील प्रत्येक घसरणीमुळे आपल्या समाजात भीतीचे वातावरण निर्माण होणारच. त्यातून नुकसानच होईल. शाळांमध्ये मुलांना, महाविद्यालयांमध्ये तरुणांना आणि कामाच्या ठिकाणी सामान्य नागरिकांना आर्थिक शिक्षण दिले पाहिजे. तसे झाले तरच आपण एक स्थिर आणि समजूतदार असा गुंतवणूकदारांचा समाज निर्माण करू शकू. भारत हा केवळ ग्राहकांचा देश नाही तर तो एका नवीन आर्थिक दिशेचा अग्रणीदेखील बनू शकतो. ती क्षमता भारतात आहे. यासाठी आपल्याला स्वदेशी उत्पादने मोठ्या प्रमाणात अंगीकारण्याचे धाडस दाखवावे लागेल. गरज नसेल तेथे विदेशी वस्तू वापरणे सोडून द्यावे लागेल. स्वदेशी वस्तूंची निर्मिती करणाऱ्यांनीही अधिकाधिक नफ्याच्या मागे धावण्यापेक्षा भारताच्या अर्थकारणाचे स्थैर्य महत्त्वाचे मानले पाहिजे. आपण मागे पडतो ते बाजारपेठेतील किमतीच्या स्पर्धेत. उदाहरणार्थ, दिवाळीत लावायचे दिवे चीनमधून येतात. ते देखील स्वस्तात. आपल्याकडचे देशात तयार झालेले दिवे महाग असतात. बाजारात गेल्यानंतर सामान्यांचा स्वदेशीचा आग्रह आणि देशप्रेम गळून पडते. कारण प्रश्न पैशांचा असतो. त्याच दर्जाचा माल कमी पैशात मिळणार असेल तर कुणीही देशाचा विचार करीत नाही. यामागे खरे कारण असते नफेखोरीच्या हव्यासाचे. अमाप नफेखोरीचा हव्यास हा भारतीय उद्योग विश्वाला, मॅन्युफॅक्चरिंग सेक्टरला लागलेला शाप आहे. ते त्यांना सरकारने सांगितले पाहिजे. नफेखोरीचे नियमन केले पाहिजे. याउपरही स्वदेशीचा स्वीकार करणे यापुढच्या काळात अपरिहार्य असेल, असे आजची स्थिती सांगते. स्वदेशीचा आग्रह आणि स्वीकार ही संकुचित विचारसरणी समजण्याचे कारण नाही. तो अर्थकारणातील डावपेच व धोरणांचा भाग आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. भारतात अपार क्षमता आहे. कोरोनाची लस बनवून आपण जगाला मार्ग दाखवला. भारताने चांद्रयान आणि मंगळयानद्वारे आमचे वैज्ञानिक कौशल्य दाखवून दिले. आमच्या स्टार्टअप्सनी गुंतवणूकदारांचा विश्वास जिंकला. भारतात मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणूक येते आहे. हे सर्व आपल्या आत्मविश्वासाचे आणि बुद्धिमत्तेचे पुरावे आहेत. परंतु जेव्हा आपण जागतिक अवलंबित्वाचे संतुलन साधण्यात यशस्वी होऊ तेव्हाच आपल्या या क्षमतांचा प्रभाव निर्माण करू शकू. बाजारपेठा भावनांनी नव्हे तर तर्कावर चालतात. बुद्धिमत्तेवर आणि स्ट्रॅटेजीजवर चालतात. भीतीचे वातावरण गुंतवणुकीच्या मुळाशी उठते. ७ एप्रिलला तेच घडले. सामान्य गुंतवणूकदाराला राजकारण आणि अफवांच्या पलीकडे जाऊन शहाणपणा दाखवण्याचा हा प्रसंग आहे. शेअर बाजार घसरतो तसा वरही जातो. कधी तो लवकर जातो, कधी त्याला वेळ लागतो. त्यामुळे आज घसरण झाली असली, तरी बाजारपेठ कधी ना कधी वधारेलच, हे गुंतवणूकदारांनी लक्षात घ्यायला हवे.

भारतात मंदीची चिन्हे दिसू लागली आहेत. बेरोजगारी, घटते उत्पादन आणि ग्राहकांच्या मागणीतील स्थिरता हे याचे स्पष्ट पुरावे आहेत. आता सरकारलाही सक्रियता दाखवावी लागेल. मोठ्या प्रमाणात सार्वजनिक गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि लघु आणि मध्यम उद्योगांना पाठिंबा यातूनच मंदीचा प्रभाव कमी करता येऊ शकेल. नागरिकांचीदेखील ही जबाबदारी आहे की, त्यांनी आपले आर्थिक निर्णय सुज्ञपणे घेतले पाहिजेत. ही वेळ आपल्या विवेकाची परीक्षा पाहणारी आहे. या आर्थिक संकटात एक इशारा दडलेला आहे. त्यामागे संधीही आहेत. ती संधी आहे अर्थसाक्षरता वाढवण्याची, आपली धोरणे सुधारण्याची आणि स्वावलंबनाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करण्याची. आपण या संकटातून धडा घेतला तर आपण या अस्थिरतेवर मात तर करूच; शिवाय आर्थिकदृष्ट्या अधिक मजबूत असा भारतदेखील निर्माण करू शकू. बाजारपेठेतील क्रियाकलापांवरील आपल्या प्रतिक्रिया सुजाण असणे आणि म्हणूनच या घसरणीच्या इशाऱ्याचा अन्वयार्थ समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## विशेष

# भारत ‘बायोटेक’ची महासत्ता होईल?

**प्रा. सुखदेव बखळे**

संपूर्ण जगात जैवतंत्रज्ञानासाठी भारत १२ सर्वोत्तम देशांपैकी एक आहे. जैवतंत्रज्ञान उद्योगाने कोविड-१९ महामारीशी लढण्यासाठी आघाडीवर राहून खूप मदत केली आहे. या क्षेत्राने लस, ॲण्टिव्हायरल, रोगनिदानविषयक चाचण्या आणि इतर अनेक साधने तयार करून दाखवली आहेत. या साथीच्या रोगामुळे देशाला वैद्यकीय उपकरणे आणि लसींचे उत्पादन, आयात आणि निर्यात करण्यासाठी योग्य वातावरण निर्माण होण्यास मदत झाली आहे. २०२१ मध्ये देशभरात जैवतंत्रज्ञान क्षेत्रात नवीन ‘स्टार्टअप्स’चा पूर आला होता. सुमारे ११२८ नवीन ‘स्टार्टअप्स’ बाजारात दाखल झाले. या वाढीमुळे २०२३ पर्यंत ‘बायोटेक्नॉलॉजी स्टार्टअप्स’ची एकूण संख्या सुमारे ८५०० पर्यंत गेली. एका अहवालानुसार, भारताचा जैव-अर्थव्यवस्था उद्योग २०१५ मध्ये १० अब्ज डॉलरवरून २०२४ मध्ये १३० अब्जपर्यंत विस्तारला. २०२१ पर्यंत भारताच्या जीडीपीमध्ये जैव-अर्थव्यवस्थेचे २.६ टक्के योगदान होते. २०३० पर्यंत हा उद्योग ३०० अब्ज डॉलरची उलाढाल करेल. कोविड लसीकरण आणि चाचणी मोहिमेमुळे भारताच्या जैव-अर्थव्यवस्थेलाही मोठी मदत मिळाली. कोविड लसींची किंमत ८.७ अब्ज डॉलर होती, तर चाचणीची किंमत ५.९ अब्ज डॉलर होती. २०२१ मध्ये १.४५ अब्ज कोविड डोस देण्यात आले आणि दररोज १.३ दशलक्ष कोविड चाचण्या घेण्यात आल्या. भारतीय जैव-अर्थव्यवस्थेचा सर्वांत मोठा भाग बायोफार्मा हा आहे. ‘बायो-इकॉनॉमी’मध्ये बायोफार्माचा वाटा ४९ टक्के वाटा असून त्याचे एकूण आर्थिक योगदान ३९.४ अब्ज डॉलर इतके आहे.

२०२५ पर्यंत भारतातील एकूण लस बाजार २५२ अब्ज रुपये होण्याचा अंदाज आहे. भारत बायोटेक महासत्ता होणार का? सरकारचे व्हिजन कितपत प्रभावी आहे, अशी विचारणा कायम केली जाते. त्याला आकडेवारीतूनच उत्तर मिळते. भारताचा जैवतंत्रज्ञान उद्योग दुपटीहून अधिक वाढत आहे. हा उद्योग २०१५ ते २०२० दरम्यान अतिशय वेगाने वाढला. पाच वर्षांमध्ये तो ३०.२ अब्ज डॉलरवरून ७०.२ अब्ज डॉलर म्हणजे दुपटीहून अधिक झाला. भारताचा जैवतंत्रज्ञान उद्योग २०२५ पर्यंत १५० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचेल, अशी अपेक्षा आहे. २०३० पर्यंत तो २७०-३०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकतो. २०२५ पर्यंत जागतिक जैवतंत्रज्ञान बाजारपेठेतील भारताचे योगदान १९ टक्क्यांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. त्याचा वार्षिक वाढ दर २२ टक्के आहे. भारतीय जीवशास्त्र बाजार २०२५ पर्यंत १२ अब्जांपर्यंत पोहोचू शकेल. ‘इंडिया बायोइकॉनॉमी रिपोर्ट (आयबीईआर) नुसार, भारतात ‘बायोटेक स्टार्टअप्स’ची संख्या लक्षणीय वाढली आहे. २०१४ मध्ये केवळ ५० ‘बायोटेक स्टार्टअप’ होते; परंतु २०२३ मध्ये त्यांची संख्या ८५३१ वर पोहोचली आहे. सरकारने लोकसभेत सांगितले की, सरकार ‘बायोटेक स्टार्टअप्स’ना मदत करण्यासाठी खूप काही करत आहे. ‘बायोटेक्नॉलॉजी’ विभागाने (डीबीटी) २०१२ मध्ये ‘बीआयआरएसी’ नावाची संस्था स्थापन केली. ती बायोटेक क्षेत्रातील ‘स्टार्टअप’ला प्रोत्साहन देते. ही संस्था शासनाच्या धोरणानुसार काम करते. ‘बीआयआरएसी’ने ९५ ‘बायो-इन्क्युबेटर’ तयार केले आहेत. तिथे स्टार्टअप्सना जागा आणि सुविधा मिळतात.



‘बीआयआरएसी’ अनेक प्रकारे पैशांची मदत करते. एखाद्याकडे नवीन कल्पना असल्यास ५० लाख रुपयांपर्यंत मदत मिळते; जेणेकरून तो तळागाळात त्याची कल्पना राबवू शकेल. सुमारे एक हजार ‘स्टार्टअप्स’ना यातून मदत मिळाली आहे. ‘बीआयआरएसी’ वेळोवेळी आपल्या योजना आणि कार्यक्रम अपडेट करत राहते; जेणेकरून ‘स्टार्टअप्स’ना योग्य मदत मिळत राहते. गरज पडेल तेव्हा नवीन कार्यक्रमही सुरू केले जातात. ‘बायोटेक स्टार्टअप इकोसिस्टिम’ला सतत पाठिंबा देण्यासाठी ‘बीआयआरएसी’ अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत काम करते. ‘बायोटेक’ला चालना देण्यासाठी सरकारने बायोई ३ नावाचे नवीन धोरण सुरू केले आहे. मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर जैवतंत्रज्ञान विभागाने (डीबीटी) ते सुरू केले आहे. जैव-आधारित उत्पादने बनवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे, त्यासाठी देशभरात जैव-सक्षम बनवले जातील. ‘एआय’ आणि बायोटेक एकत्र करून येथे नवीन संशोधन आणि विकास केला जाईल. बायोफाऊंड्रीमध्ये जैविक प्रणाली वापरून उत्पादने तयार केली जातील. जैव-आधारित उत्पादने येथे मोठ्या प्रमाणावर तयार केली जातील. भविष्यात बायो-आधारित उत्पादने खूप महत्त्वाची ठरतील, असा सरकारचा विश्वास आहे. त्यामुळे पर्यावरणाला फायदा होईल आणि नवीन रोजगारही निर्माण होतील. त्यामुळे हे ‘बायो-एनेबलर्स’ तयार करून सरकारला या क्षेत्राला चालना द्यायची आहे.

सरकारने लोकसभेत सांगितले की, ‘बायोटेक्नॉलॉजी’ विभाग (डीबीटी) आणि ‘बीआयआरएसी’ यांनी संयुक्तपणे ‘बायोटेक हब’ तयार करण्यासाठी प्रस्ताव मागवले आहेत. महाविद्यालय आणि उद्योग अशा दोन्ही ठिकाणी हे हब तयार केले जातील. त्यासाठी २५३ हून अधिक प्रस्ताव प्राप्त झाले. त्यापैकी २४ प्रकल्पांची निवड करण्यात आली आहे. हे प्रकल्प ‘बायोफाऊंड्रीज’ आणि ‘बायोमॅन्युफॅक्चरिंग हब’ तयार करण्यासाठी आहेत. असे हब देशभरात तयार केले जातील आणि दोन वर्षांमध्ये तयार होतील. याशिवाय ‘बायो-एआय हब’ आणि ‘बायोमॅन्युफॅक्चरिंग’ सुविधा निर्माण करण्याच्या योजनांवरही काम सुरू आहे. भारतामध्ये बायोटेक महासत्ता बनण्याची क्षमता आहे. बायोटेक कंपन्यांना सरकार पैसे आणि सुविधा देत आहे. शास्त्रज्ञ सतत नवनवीन शोध लावत असतात. लोक बायोटेक उत्पादने आणि सेवादेखील वापरत आहेत. यातून कंपन्या नफा कमावत आहेत. बायोटेक उत्पादनांना मान्यता देण्याचे नियम थोडे कठोर आहेत. ते सोपे करणे आवश्यक आहे. ‘बायोटेक रिसर्च’मध्ये खूप पैसा खर्च होतो. त्यामुळे सरकारला आणखी गुंतवणूक करावी लागेल. भारताला बायोटेक महासत्ता बनण्याची संधी आहे. सरकारने आपली धोरणे प्रभावीपणे राबविल्यास आणि खाजगी क्षेत्राला अधिक पाठिंबा मिळाल्यास भारत पुढील दशकात जागतिक बायोटेक हब बनू शकतो. भारत केवळ जागतिक जैवतंत्रज्ञान क्रांतीच्या बरोबरीने चालत नाही, तर त्याचे नेतृत्व करत आहे.

भारताची जैव-अर्थव्यवस्था एका दशकात १६ पटींनी वाढली. या अर्थव्यवस्थेने गेल्या १० वर्षांमध्ये १० अब्ज डॉलरवरून १६५.७ अब्ज डॉलरपर्यंत वाढण्याचा असाधारण विक्रम नोंदविला आहे. २०२५ पर्यंत १५० अब्ज डॉलरचे लक्ष्य भारताने पार केले आहे. हे क्षेत्र आता भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) ४.२५ टक्के योगदान देत आहे; शिवाय गेल्या चार वर्षांमध्ये जैव-अर्थव्यवस्थेचा चक्रवाढ वार्षिक वाढीचा दर १७.९ टक्के आहे. त्यामुळे भारत जैवतंत्रज्ञानात जागतिक शक्ती म्हणून उदयास येत आहे. ‘बायोटेक स्टार्टअप्स’साठी ‘बायोसारथी’ हा नावीन्यपूर्ण जागतिक मार्गदर्शन उपक्रम सुरू केला. भारताचा एकूण संशोधन आणि विकास खर्च गेल्या दशकात दुप्पट झाला आहे, २०१३-१४ मध्ये ६०,१९६ कोटी रुपयांवरून २०२४ मध्ये १ लाख २७ हजार ३८१ कोटी रुपये झाला आहे.

‘बायो-राईड’मध्ये ‘बायोटेक्नॉलॉजी रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट’, औद्योगिक आणि उद्योजकता विकास आणि अलिकडेच सादर करण्यात आलेले ‘बायोमॅन्युफॅक्चरिंग’ आणि ‘बायोफाऊंड्री’ हे तीन प्रमुख घटकदेखील समाविष्ट आहेत. या योजनेचा उद्देश देशाच्या नावीन्यपूर्ण, जैव-उद्योजकता आणि जैव-उत्पादन क्षमतांना प्रोत्साहन देणे तसेच देशाच्या हरित अर्थव्यवस्थेला चालना देणे आहे. ही योजना बियाणे निधी, मार्गदर्शन आणि उष्मायन कार्यक्रमांद्वारे जैव-उद्योजकांना पाठिंबा देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल तसेच सिंथेटिक जीवशास्त्र, ‘बायोफार्मास्युटिकल्स’, ‘बायो-एनर्जी’ आणि ‘बायोप्लॅस्टिक्स’ यासारख्या क्षेत्रातील संशोधनासाठी निधी प्रदान करेल. ही योजना जैव-आधारित उत्पादने आणि तंत्रज्ञानाच्या व्यापारीकरणाला गती देण्यासाठी शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यात समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न करेल. या योजनेचा उद्देश विद्यार्थी, तरुण संशोधक आणि शास्त्रज्ञ यांच्या क्षमतावाढीसाठी आणि कौशल्यांमध्ये गुंतवणूक करून मानव संसाधन विकासाला चालना देणे, त्यांना जैवतंत्रज्ञानातील वाढीसाठी तयार करणे हा आहे. हा उपक्रम ‘डेव्हलप इंडिया २०४७’ चे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. ते भारताला बायोटेक्नॉलॉजी, संशोधन आणि औद्योगिक विकासामध्ये आघाडीवर ठेवेल.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# माणुसकी जिवंत ठेवा, तिला मारू नका!

आपली समाज व्यवस्था इतकी व्यापक व गुंतागुंतीची आहे की, त्याचे फायदे तेवढेच दुष्परिणाम आहे. व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती असणे वाईट नाही पण, एखाद्या प्रवृत्तीचे दुष्परिणाम फारच गंभीरतेने समोर येतात. स्वार्थी व आपल्या सोयीनुसार विचार करणारी मंडळी प्रत्येक ठिकाणी असल्यामुळे काही व्यवस्था सुलभ होण्यापेक्षा अवघड होऊन बसल्या आहे. समाजाला धोकादायक ठरणारा विमर्श त्यातून जन्माला येतो आणि व्यवस्थेवरचा विश्वास कमी व्हायला लागतो. बोटावर सहज मोजता येतील, इतकीच माणसे हा विकृत डाव खेळत असतात. कोणाच्या जीवावर बेतेल याचा विचार देखील ते करीत नाही. त्यांचा प्रत्येकच डाव यशस्वी होतोच असे नाही. पण, झाला तर माणुसकीची वाताहत होते आणि ती वारंवार मरते. आरोग्याशी निगडित क्षेत्रामध्ये जर असे घडले तर पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयासारखी घटना झाल्याशिवाय राहत नाही. या घटनेच्या चौकशी अहवालातून जी माहिती समोर येत आहे, ती खरंच धक्कादायक आणि माणुसकीला काळिमा फासणारी आहे. असेही घडू शकते, यावर विश्वास ठेवण्यास ती बाध्य करणारी आहे.

धर्मार्थ पद्धतीने अनेक संस्था चांगले काम करीत आहे. त्यांचा जागोजागी गुणगौरव होतो. देशात त्यांचा लौकिक आहे. पाचही बोटे सारखी नसतात. पण, जिथे विवेक जागृत असतो, तेथे अडचणीत आणणाऱ्या घटना होत नाही. पुण्याच्या घटनेशी निगडित जे रुग्णालय आहे ते धर्मार्थच आहे. तेथून जे नवे पैलू समोर आले, त्याची वेगवेगळ्या पद्धतीने चिकित्सा होईलच. सदर रुग्णालयासाठी जे नियम आहे, त्याचे पालन त्यांनी केले की नाही, हा तपासाचा विषय होता. चौकशी समितीने चूक झाल्याचे अहवालात दर्शविले आहे. ही प्राथमिक चौकशी झाली. याच समितीचा आणखी सविस्तर अहवाल येणार असून, माता मृत्यू अन्वेषण समिती सुद्धा अभ्यास करून आपला अहवाल देणार आहे. विषय समोर आला म्हणून या समितीच्या सदस्यांनी धर्मार्थ पद्धतीने चालणाऱ्या प्रत्येक संस्थेला भेट देऊन प्रत्यक्षात काय स्थिती आहे, याची सखोल माहिती गोळा केली पाहिजे. कोणत्या संस्थेने काय काम केले, हे सर्वांसमोर ठेवायला हवे. धर्मार्थ संस्था उभ्या करून धंदा तर सुरू केला नाही ना, याची खातरजमा व्हायला पाहिजे. भूतकाळातील अनेक प्रकरणे समोर येत आहेत. पुण्याच्या घटनेतील पीडितेचा व कुटुंबीयांचा जो घटनाक्रम समोर आला आहे, तो मन सुन्न करणारा आहे. घटनेनंतर कुटुंबीय, माध्यमे व शासकीय व्यवस्थेकडून जी माहिती बाहेर येत आहे, त्यावरून रुग्णालयातले काही डॉक्टर व कर्मचारी कमालीचे बेफिकीर होते. रुग्णालय प्रशासनाने हे ठरवून केले असे कोणाचेच म्हणणे नाही. पण, त्यांच्या व्यवस्थेतल्या झारीतल्या शुक्राचार्यांवर अहंकार वरचढ झाल्याने ही घटना घडली आहे. ही विकृती तेव्हाच जन्म घेते, जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःला इतरांपेक्षा खूपच श्रेष्ठ समजते. अशा व्यक्ती परिणामाची चिंता करीत नाही. बेशरमपणे युक्तिवाद करतात आणि आपल्या संस्थेला अडचणीत आणत असतात. अशी प्रवृत्ती समाजासाठी कमालीची घातक असते. ती शोधून वेळीच ठेचणे आवश्यक असते. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व्यवस्थापनाने पूर्ण नाही पण काही गंभीर चुका निश्चित झाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळेच काही ठोस निर्णय त्यांनी तातडीने घेतले आहेत. त्याने लवकरच असंतोष शमेल असे वाटत नाही.

जीव अमूल्य आहे. त्याच्याशी भावना जुळली असते. ईश्वरी भिसे यांचा नाहक जीव गेल्यामुळे कुटुंबीयांच्या भावनांचा उद्रेक झाला. जनतेने तो उचलून धरल्याने बरेच काही समोर येणार आहे. धर्मादाय पद्धतीने चालणारी रुग्णालये असो की शैक्षणिक संस्थेसह अन्य, यांच्यासाठी जी नियमावली तयारी केली आहे, त्याचा फेरआढावा घेण्याची गरज आहे. लाभार्थींना त्रास होणार नाही आणि पारदर्शकतेसोबतच संस्थेवर वचक राहील, अशी व्यवस्था तयार करायला हवी. दुसरे महत्त्वाचे म्हणजे खाजगी रुग्णालयांबद्दल जनतेत फारच ओरड आहे. लुटीच्या प्रचंड तक्रारी आहेत. येथे पण पारदर्शकता गरजेची झाली आहे. या रुग्णालयांना वेसण घालून आवरणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाले नाही तर पुण्यात आता झालेल्या घटनेसारखा भडका भविष्यात उडण्याची खूप शक्यता आहे. एक मागणी सातत्याने होत असून ती म्हणजे, खाजगी असो की धर्मादाय रुग्णालये कुठल्या उपचारासाठी महत्तम किती दर असावा याची कडक नियमावली शासनाने करायला हवी. मागणी व्यावहारिक आहे. एकूण सर्व बाबींवर मंथन सुरू आहे. समाजासाठी त्यातून अमृत बाहेर येईल, अशी अपेक्षा शासनाकडून आहे. सर्वांना विनंती इतकीच, माणुसकी जिवंत ठेवा!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# अंतरात्म्याचा आवाजच महत्त्वाचा!

**प्रा. दिलीप जोशी**

माणूस म्हटला की जीवनात चढ आणि उतार, आनंद आणि दुःख, सुख आणि संकटे येतच असतात. कधी मनासारखे होते तर कधी मनाविरुद्धही होते. अनेक वेळा आपल्यासमोर यक्षप्रश्न उभे राहतात. काय करावे हे समजत नाही. पडलेल्या प्रश्नाचे उत्तर ‘हे आहे की ते आहे’ असा प्रश्न पडतो. अशावेळी एकच करावं- चर्चा सर्वांशी करावी, नीरक्षीर विवेकही ठेवावा, पण सर्वांत शेवटी आपल्या अंतर्मनाचा आवाज ऐकावा. ऐकावे जनाचे आणि करावे मनाचे हे उगाच थोडी म्हटले आहे?

अंतर्मनाचा आवाज ऐकण्याला तर्क आहे. भारतीय तत्त्वज्ञानात आपले चार प्रकारचे देह सांगितले आहेत. स्थूलदेह, सूक्ष्मदेह, कारणदेह आणि महाकारणदेह हे ते चार प्रकार आहेत. तैत्तिरीय उपनिषदात आपल्या आत्म्याभोवती पाच प्रकारचे कोश सांगितले आहेत. अन्नमय कोश, प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश आणि आनंदमय कोश हे ते पंचकोश आहेत. याशिवाय शरीरात विविध चक्रेही आहेत. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनहत, विशुद्धचक्र, आज्ञाचक्र, सहस्रारचक्र ही ती चक्रे आहेत. चारदेह, पाच कोश आणि षड्चक्रे आपल्यासाठी सतत सक्रिय आणि सतत पूरक असतात. ते सतत सकारात्मक आणि सर्जनशील, सृजनशील असतात. ते आपल्या पंडाबुद्धीचे जागरण करीत असतात. याशिवाय आपल्याला मन आणि बुद्धी विशेषत्वाने विधात्याने दिले आहे. महाभारत तर स्पष्टच सांगते-

आहार निद्रा भय मैथुनंच, सामान्यमेतत्, पशुभिर्नराणाम् ।
बुद्धी तेषाम् अधिको विशेषो, मनोही तेषाम् अधिको विशेषो ॥

मन आणि बुद्धी हे आपल्या हितासाठीच आहेत. त्यांचा आवाजच महत्त्वाचा आहे.



आता व्यावहारिक पाहू!

समजा आपल्यासमोर एखादा प्रश्न पडला तर तो प्रश्न पडल्या पडल्याच त्याचे त्वरित उत्तर मन आणि बुद्धी आपल्याला देते. काय करावे हे देखील आतल्या कोपऱ्यात सांगून ठेवते, पण आपणच कायम संभ्रमात असतो. अंतरात्म्यावर आपला विश्वास नसतो.

भीती, आत्मविश्वासाचा अभाव, स्वतःप्रती न्यूनगंड आपल्यात ठासून भरलेले असतात. त्यामुळे ‘घर की मुर्गी...’सारखे आपल्याच मन आणि मस्तिष्काला आपण हलक्यात घेतो. मग सुरू होते आपली धावपळ. याचा सल्ला घे, त्याचा विचार घे, याच्याशी चर्चा, त्याच्याशी चर्चा. आपण ज्यांच्याशी चर्चा करतो तो ‘हेही बरोबर’ आणि ‘तेही बरोबर’ या भूमिकेत असतो. आपल्या प्रश्नांची विस्कट ही बाहेरची मंडळी करतात. शेवटी घात होतो.

तुम्ही विचार करा, घात झाल्यावर तुमच्या तोंडी एकच वाक्य असते... ‘अरे यार! मला हेच वाटत होतं बरं! पण उगाच त्याचं ऐकलं!’ लक्षात ठेवा, तुम्हाला जे वाटत होते तोच अंतरात्म्याचा आवाज होय. हा अनुभव नेहमीच येतो आपल्याला. एखादी समस्या, प्रश्न किंवा घ्यायचा निर्णय आपल्यासमोर येताच बारीक लक्ष द्या. त्याचे उत्तर आपल्या आतूनच आपोआप आलेले असते. त्या उत्तराला आपण अनुल्लेखित करतो नेहमीच. त्याकडे लक्षपूर्वक लक्ष द्या. तो आपला अंतर्नाद असतो. तो खरा आणि हिताचा असतो. पण आपण आपले हित कशात आहे, याबाबत कायम संभ्रमात असतो. या जगात आपले मन आणि आईवडील हेच आपले हितचिंतक असतात. आपले दुर्दैव हे आहे की, या दोघांनाही आपण ‘त्यांना काय कळते यातले?’ या भूमिकेत ठेवतो आणि फसतो. आतला आवाज तुम्हाला कायम जागे करीत असतो; पण-

लोकः प्रयागवासी कुपे स्नानं समाचरती !
किंवा
मलये भिल्लपूरंध्री चंदनतरुं अग्निकाष्ठं कुरूते !

म्हणजे प्रयागच्या लोकांना त्रिवेणीचे काय महत्त्व? ते घरातल्या विहिरीतच स्नान करतात किंवा मलय पर्वतावरची भिल्ल स्त्री चंदनाच्या लाकडावर स्वयंपाक करते. तद्वतच आपल्याजवळ आपले प्रचंड हितचिंतक असलेले मन आणि मस्तिष्क आहे, पण आपण मात्र कस्तुरीमृगासारखे भटकतो यादृच्छिक सर्वत्र.

आपण एकदा आपल्या मनाचा आवाज ऐकून तर पाहा! अचूक उत्तर मिळेल याची खात्री आहे. याचा अर्थ दुसऱ्यांशी चर्चाच करायची नाही असे नाही. पण अंतःप्रज्ञा (इंट्यूशन) सर्वांत विशेष असते. अनेक वेळा आपण म्हणत असतो की, ‘माझे मन मला सांगते.’ यालाच भाव अंतरीचे म्हणतात.

सर्वांत प्रथम येणारा आतला आवाज लक्षात घेणे महत्त्वाचे, नंतर यावर इतर बाह्य बाबींचे परिणाम होऊन त्यात बदलही होतो. याला प्रकाशी प्रभाव (हॅलो इफेक्ट) म्हणतात. इतरांच्या प्रभावी मतामुळे स्वतःचे मत काजळून जाणे. पण एखाद्या प्रश्नी सर्वांत प्रथम जो विचार येतो तो आपला अंतर्मनाचा आवाज असतो. बहुधा तो योग्यच असतो. तो आवाज ऐकला पाहिजे. अंतरात्म्याचा आवाज सद्सद्विवेकबुद्धीचा आवाज असतो. तोच सत्य असतो. तोच ऐकला पाहिजे.

९८२२२६२७३५

### पर्यावरणवादी आदित्य ठाकरेंचा कानाडोळा

देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या कार्यकाळात मेट्रोचे कार शेड आरे कॉलनीतील जंगलात करण्याचे मंजूर करण्यात आले होते. या प्रकल्पाला पर्यावरणवाद्यांनी विरोध केला होता. मग पर्यावरणवाद्यांसोबत शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने सुद्धा या प्रकल्पाला विरोध केला होता. राज्यात महाविकास आघाडी सरकार राज्यात स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी आरे कार शेडला स्थगिती दिली होती. आदित्य ठाकरेंनी महाविकास आघाडी सरकार पडल्यानंतर ‘सेव्ह आरे’ ही मोहीम सुरू केली होती. आदित्य ठाकरे म्हणतात, आपल्याला विकास हवाच आहे. पण, पर्यावरणाचा बळी देऊन नको. आपलं पर्यावरण उद्ध्वस्त झालं तर भविष्यात राजकारण करायला माणूस नावाचा प्राणी शिल्लकच राहणार नाही वगैरे वगैरे मोठमोठ्या वल्गना इकडे करतात.

इंडिया आघाडीतील त्यांच्याच मित्र पक्ष असणाऱ्या काँग्रेस पक्षाचे सरकार तेलंगणात असून त्यांच्या सरकारद्वारे हैदराबाद विद्यापीठाजवळील कांचा गचिबोवली वनक्षेत्रात जगातील सर्वांत मोठा इको पार्क केला जाणार आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली. हा परिसर जवळपास चारशे एकराचा आहे. यावेळी अनेक प्राणी, पक्षी आपला जीव वाचवण्यासाठी बाहेर पळतानाची छायाचित्रे समाज माध्यमाद्वारे प्रकाशित झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने तेलंगणा राज्याला पुढील आदेश येईपर्यंत ‘भयानक जंगलतोड उपक्रम’ थांबवण्याचा निर्देश दिला आहे.

हैदराबादजवळ झालेल्या अनपेक्षित वृक्षतोडीमुळे प्राण्यांचे चित्कारणे, किलबिलाट याचे समाज माध्यमात प्रसारित झालेले व्हिडीओ ऐकून अंगावर काटा येतो. इतर वेळी समाज माध्यमात लहान लहान गोष्टींसाठी प्रतिक्रिया देणाऱ्या पर्यावरणवादी आदित्य ठाकरेंना प्राण्यांचे चित्काराणे, किलबिलाट नेमका ऐकू आला नाही. हीच बाब भारतीय जनता पक्षाच्या शासित प्रदेशात झाली असती तर आदित्य ठाकरेंनी आपले पर्यावरण पांडित्य पाजले असते.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

### वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभाव वृद्धिंगत व्हावा

पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात एका महिलेला प्रसूतीसाठी दाखल करून न घेतल्याने महिलेचा मृत्यू झाल्याच्या घटनेने खळबळ उडाली आहे. दवाखान्यांचे वाढते खर्च, गरिबी, ऐनवेळी रक्कम जमा करण्यात येणारी अडचण, वैद्यकीय क्षेत्रात कमी झालेला सेवाभाव, रुग्णालय व्यवस्थापनाचा व्यापारी दृष्टिकोन, वैद्यकीय विमा इत्यादी अनेक मुद्दे चर्चेत येत आहेत. खाजगी रुग्णालयांशी तुलना केली तर शासकीय रुग्णालयात येणारा खर्च अतिशय कमी असतो. तरीही अनेकांची धाव खाजगी रुग्णालयाकडे असते. स्वच्छता, सुसंवाद, संसाधनांची उपलब्धता याबाबत खाजगी रुग्णालये शासकीय रुग्णालयांच्या अनेक पावले समोर आहे. रुग्ण दगावला की सहानुभूती रुग्णाच्या बाजूनेच असते. त्याचवेळी डॉक्टरांवर दोषारोपण केले जातात. ज्या डॉक्टरांवर दोषारोपण केले जातात त्यांनी अनेकदा रुग्णांना जीवदान दिलेले असते. अशावेळी दोषी कोणाला धरावे असा प्रश्न पडतो. शासकीय रुग्णालयात जी अनागोंदी निर्माण झालेली आहे त्याला बऱ्याच मोठ्या प्रमाणात राजकीय मंडळी जबाबदार आहेत. कोरोना साथरोगाचे वेळी कोरोना झाल्यावर त्यावेळी विरोधी पक्षातील नेत्यांनी शासकीय रुग्णालयात उपचार घेतले. त्यावेळच्या ज्या मंत्र्यांना कोरोना झाला ते सर्व मुंबईच्या लीलावती रुग्णालयात दाखल झाले. मंत्र्यांनी फक्त आणि फक्त शासकीय रुग्णालयातच उपचार घेण्याचे धोरण स्वीकारले तर शासकीय रुग्णालय व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन होऊ शकते.

वैद्यकीय क्षेत्रात सेवाभावाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. रुग्णांकडून कोणतेही शुल्क न आकारणारे अनेक आयुर्वेदिक वैद्य आपल्या देशाने पाहिले आहेत. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात जी अप्रिय घटना घडली त्या घटनेच्या अनुषंगाने वैद्यकीय सेवा वाजवी दरात मिळणे, शासकीय रुग्णालये रुग्णानुकूल करणे, वैद्यकीय विमा संदर्भात जागृती करणे इत्यादी संदर्भात विचारमंथन व्हावे असे वाटते.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

### पुस्तकांची भाववाढ पालकांच्या डोक्याला ताप

येत्या शैक्षणिक वर्षात सीबीएसई अभ्यासक्रमातील क्रमिक पुस्तकांची भाववाढ ही पालकांसाठी विकतचे दुखणे ठरलेली आहे. प्राथमिक व उच्च प्राथमिक इयत्तांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची पुस्तके अत्यंत महागडी आहेत. नागपुरातील एका प्रसिद्ध शाळेतील विद्यार्थ्यांची सातव्या इयत्तेची पुस्तके ९८५५ रुपयांची आहेत. पालकांना नोटबुक रजिस्टर देखील शाळेने सांगितलेल्या दुकानांमधूनच खरेदी करावे लागते. अशा प्रकारे पालकांची पद्धतशीरपणे लूट करण्याची ही यंत्रणा सक्रिय आहे. शासनाने कृपया यात लक्ष घालून सर्वसामान्य पालकांची या दुष्टचक्रातून मुक्तता करावी.

**निकेता गावंडे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बार्शीमध्ये भरदिवसा चोरी; माजी सैनिकाची पैसे ठेवलेली बॅग पळविली, दोघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ एप्रिल -**

बार्शी शहरात दि. ७ एप्रिल रोजी दुपारी तुळजापूर रोड येथे अज्ञात दोन चोरट्यांनी माजी सैनिकाची बॅग लंपास केल्याची घटना घडली आहे. या चोरीत ३० हजार रुपयांची रोख रक्कम, बँकेची कागदपत्रे, ओळखीची कागदपत्रे व मोटार स्टार्टर चोरीस गेला आहे.

याप्रकरणी अश्रुकुमार दत्तात्रय कांदे (वय ६६, रा. बोरगाव खुर्द, ता. बार्शी) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रारीत म्हटले सकाळी बार्शी येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेतून ३० हजार रुपये काढले व लेदर बॅगेत ठेवले. त्यानंतर त्यांनी मार्केट यार्ड येथून मोटार स्टार्टर विकत घेतला. त्याच दरम्यान त्यांच्या दुचाकीचा टायर पंक्चर झाल्याने त्यांनी ती धनराज गॅरेज (सागर बिअर बार शेजारी) येथे दुरुस्तीसाठी ठेवली. गॅरेजमध्ये त्यांनी आपली लेदर बॅग खुर्चीजवळ ठेवले व पाणी पिण्यासाठी उठले असता दरम्यान दोन अज्ञात इसम ती बॅग घेऊन पळाले.

माजी सैनिक व गॅरेज मालक राहुल लोखंडे यांनीही चोरांचा पाठलाग केला. मात्र, ते इसम मोटारसायकलवरून बस स्टँड रोडकडे पसार झाले. चोरांनी बॅगेतून रोख रक्कम, बँकेची पासबुक व चेकबुक, आधार कार्ड, कार्ड व इलेक्ट्रिक मोटार स्टार्टर असा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.पोलीस अधिक तपास करत असून चोरी करणाऱ्या अज्ञात इसमांचा शोध सुरु आहे.

## महत्वाचे...

### बिनविरोध निवडणुकीसाठी तयार; मात्र शेतकऱ्यांचे हित आवश्यक

**सोलापूर बाजार समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर माजी सभापती दिलीप माने यांनी भूमिका केली स्पष्ट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ एप्रिल**

राज्यातील दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीची चर्चा जोरदार रंगलेली आहे. अर्ज मागे घेण्याच्या कार्यकाळात कोणताही उमेदवार अर्ज मागे घेण्यास, सध्या तरी तयार नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे बाजार समितीची निवडणूक अत्यंत चुरशीची होईल. असा अंदाज बांधण्यात येत आहे. दरम्यान याच निवडणुकीच्या निमित्ताने माजी सभापती दिलीप माने यांनी आपली भूमिका स्पष्ट करत, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जबाबदार नेतेमंडळी चांगल्या व्यक्तींना घेऊन बिनविरोध करत असतील, तर माझी काही हरकत नाही. मात्र, संचालक मंडळात येणाऱ्या लोकांचा हेतू चांगला पाहिजे. हेतू ठेवून संचालक मंडळात कोणी येत असेल किंवा शेतकऱ्यांविषयी त्यांचा दृष्टिकोन चांगला पाहिजे, तरच मी बिनविरोध निवडणुकीला तयार आहे. मात्र, कोणालाही घेऊन बाजार समितीची निवडणूक बिनविरोध केली जाणार असेल तर मी त्याला तयार असणार नाही, असे सांगून काँग्रेसचे माजी आमदार तथा बाजार समितीचे माजी सभापती दिलीप माने यांनी निवडणुकीबाबतचे आपले मत व्यक्त केले. दरम्यान दिलीप माने म्हणाले, बाजार समितीच्या इतिहासात प्रथमच ४५० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. आम्ही आमच्या कार्यकर्त्यांना प्रत्येक गटातून उमेदवारी अर्ज भरायला सांगितले होते. त्यामुळे कार्यकर्त्यांनी उमेदवारी अर्ज भरून ठेवले आहेत. कोणासोबत युती करायची, कोणाला सोबत घ्यायचं, कोणाबरोबर जायचं, याचा निर्णय अजून आम्ही घेतलेला नाही. आम्ही आमच्या कार्यकर्त्यांशी चर्चा केली असून, शेतकरी हित पाहणाऱ्यांसोबत काम करण्याची आमची इच्छा आहे. कार्यकर्त्यांशी संवाद सुरू आहे. येत्या चार-पाच दिवसांत आम्ही निर्णय जाहीर करणार आहोत.




### ए.जी. पाटील पॉलिटेक्निकचे 'डिपेक्स'मध्ये यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व सृजन ट्रस्ट यांच्याद्वारे मुंबई येथे आयोजित ३४ व्या डिपेक्स प्रदर्शनात सोलापूरच्या ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक यश मिळविले. प्रदर्शनात राज्यातील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांच्या नवनवीन अविष्कारांना मंच उपलब्ध करून देणे, नव उद्योजकांना प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील कलागुणांना प्रोत्साहन देणे व विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास घडविणे हा सदर प्रदर्शनामागचा मुख्य हेतू असतो. सदर प्रदर्शनात ए. जी. पाटील तंत्रनिकेतन मधील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी यांनी प्राध्यापक श्रीकांत बोगा यांच्या मार्गदर्शनाखाली आटोमॅटिक झेब्रा ब्रिज फॉर रेल्वे प्लॅटफॉर्म हा प्रकल्प सादर केला होता. या प्रकल्पास डिपेक्स २०२५ मधील संस्टेनेबल सिव्हिल इन्फ्रास्ट्रक्चर या विभागांतर्गत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट च्या महाविद्यालय स्तरावरील डिपेक्सचे मुख्य समन्वयक म्हणून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाचे प्राध्यापक कृष्णकांत साळुंखे यांनी काम पाहिले. ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट मधील विद्यार्थ्यांच्या डिपेक्स मधील यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर ए. पाटील, उपाध्यक्ष शिवानंद सिद्धेश्वर पाटील, संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले व उपप्राचार्य एस.के. मोहिते, व सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख नितीन पवार यांनी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग व विभाग प्रमुख यांचे अभिनंदन केले.

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२४-२५**
**ई निविदा सुचना क्रमांक : २६० ते २६१ / सन २०२५-२६**

**नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत** ०२ कामाची ई-निविदा सुचना क्र. **२६० ते २६१ / सन २०२५-२६** ई-टेंडर पद्धतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
(मा. आयुक्त, यांचे मान्यतेने)

स्वाक्षरी/-
शहर अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

**नावात बदल**

माझे जुने नाव संतोषकुमार राजशेखर निंबाळकर हे होते. तरी नवीन नाव संतोष राजशेखर निंबाळकर हे. सदर दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.

ॲफिडेव्हिट क्रं. १७९९
दि. :०८/०४/२०२५

**जाहीरात प्रसिध्दीकरण**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक नियम) २०१४ मधील तरतुदीनुसार सोलापूर जिल्हायातील क वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रमाचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यांत येत आहे.

**निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी**

| अ.क्र. | सहकारी संस्थांची नांवे |
|---|---|
| १ | श्री उत्तरेश्वर प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या केम, ता. करमाळा, जि. सोलापूर |
| २ | पं. वसंतदादा पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्या वीट, ता. करमाळा, जि. सोलापूर |
| ३ | रणजितसिंह मोहिते पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्या करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर |
| ४ | मा. दिगंबरराव बागल ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या मांगी, ता. करमाळा, जि. सोलापूर |
| ५ | वांगी कैकाडी समाज सामुदायिक सहकारी शेती संस्था मर्या वांगी, ता. करमाळा, जि. सोलापूर |
| ६ | ज्योतिर्लिंग ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या कंदर ता. करमाळा, जि. सोलापूर |

**वरील संस्थांची निवडणूक कार्यक्रम**

| अ. क्र | नामनिर्देशन पत्र विक्री व दाखल करण्याचा शेवटचा दिनांक | नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक | नामनिर्देशन पत्र माघार दिनांक | मतदान दिनांक | मतमोजणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि.०९/०४/२०२५ ते १७/४/२०२५ | दि २१/४/२०२५ | दि ०६/५/२०२५ | दि १८/५/२०२५ | दि १८/५/२०२५ |
| २ | दि.०९/०४/२०२५ ते १७/४/२०२५ | दि २१/४/२०२५ | दि ०६/५/२०२५ | दि १९/५/२०२५ | दि १९/५/२०२५ |
| ३ | दि.०९/०४/२०२५ ते १७/४/२०२५ | दि २१/४/२०२५ | दि ०६/५/२०२५ | दि १७/५/२०२५ | दि १७/५/२०२५ |
| ४ | दि.०९/०४/२०२५ ते १७/४/२०२५ | दि २१/४/२०२५ | दि ०६/५/२०२५ | दि १८/५/२०२५ | दि १८/५/२०२५ |
| ५ | दि.०९/०४/२०२५ ते १७/४/२०२५ | दि २१/४/२०२५ | दि ०६/५/२०२५ | दि १९/५/२०२५ | दि १९/५/२०२५ |
| ६ | दि.०९/०४/२०२५ ते १७/४/२०२५ | दि २१/४/२०२५ | दि ०६/५/२०२५ | दि १७/५/२०२५ | दि १७/५/२०२५ |

टीप :- उपरोक्त निवडणूक कार्यक्रम तालुका निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा ता. करमाळा जि. सोलापूर, यांचे कार्यालय, व संस्थेचे कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिध्द करण्यांत आलेला आहे याची नोंद घेण्यांत यावी.

सही/-
(श्रीमती रतन महावीर बोलवाडे)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा
ता. करमाळा जि. सोलापूर.

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर**

॥ धनवृद्धि समृद्धि ॥

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार

**स्थावर मालमत्तांचे जाहीर फेर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि.,सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दि. १७/०६/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू रा.५८/५९ शिवयोग आश्रम, सैफुल स्टॉप जवळ, नरेंद्र नगर, विजापूर रोड सोलापूर व जामीनदार १) श्री विश्वजित अप्पासाहेब बिराजदार रा. मु.पो. निम्बर्गी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर २) सदानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू रा.५८/५९ शिवयोग आश्रम, सैफुल स्टॉप जवळ, नरेंद्र नगर, विजापूर रोड सोलापूर ३) श्रीमंत निन्गाप्पा पाच्छापुरे रा. प्रचंडे गल्ली, मु.पो. नागणसूर ता.अक्कलकोट, जि. सोलापूर ४) शिवरुद्रप्पा सिद्धराम कल्याण रा. ७७६, हडपद गल्ली, मु.पो.नागणसूर, जि. सोलापूर ५) संजय अण्णाप्पा संगोलगी रा. १७, नेहरू नगर, विजापूर रोड, श्रीकृष्ण मंदिर जवळ, सोलापूर यांना पाठवून रक्कम रु.२,६६,२१,३८७/- या वर दि.०१/०९/२०२२ पासून पुढे हि सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कम ची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकित रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमुद थकित कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परिस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहीर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे असे.**

| अ. क्र. | कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन / मिळकतदाराचे नाव | प्लॉट नं./ गट नं. | क्षेत्र आर. चौ.मी. | राखीव किंमत | अ. क्र. | प्लॉट नं./ गट नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | १ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २२ | २२ | ०.०१.२८ | १६५२७३.६० |
| २ | | | २ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २३ | २३ | ०.०१.१६ | १४९७७९.२० |
| ३ | | | ३ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २४ | २४ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ४ | | | ४ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २५ | २५ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ५ | | | ५ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २६ | २६ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ६ | | | ६ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २७ | २७ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ७ | | | ७ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २८ | २८ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ८ | कर्जदार - दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू रा.५८/५९, सैफुल स्टोप, शिवयोग आश्रम, विजापूर रोड, सोलापूर<br>जामीनदार - १. सदानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू २. विश्वजित अप्पासाहेब बिराजदार ३. श्रीमंत पाच्छापुरे लिंगप्पा | | ८ | ०.०१.१६ | १४९७७९.२० | २९ | २९ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ९ | | | ९ | ०.०१.२४ | १६०१०८.८८ | ३० | ३० | ९.०६.२० | ११७००८५.४४ |
| १० | | विश्वजित अप्पासाहेब बिराजदार मौजे. निंबर्गी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट क्र.२१०/१ अ | १० | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३१ | ३१ | १.०६.२५ | १३७१९०.०० |
| ११ | | | ११ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३२ | ३२ | ०.९२,०० | ११८७९०.४० |
| १२ | | | १२ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३३ | ३३ | ०.८९.१२ | ११५०७१.७४ |
| १३ | | | १३ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३४ | ३४ | ०.८६.२५ | १११३६६,०० |
| १४ | | | १४ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३५ | ३५ | ०.८६.२५ | १११३६६.०० |
| १५ | | | १५ | ०.७८.३७ | ९८९३३.२० | ३६ | ३६ | ०.८७.०० | ११२३३७.४० |
| १६ | | | १६ | ०.८५.५० | ११०३९७.६० | ३७ | ३७ | ०.९०.६२ | ११७००८.५४ |
| १७ | | | १७ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३८ | ३८ | ०.९४.२५ | १२१६९५.६० |
| १८ | | | १८ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३९ | ३९ | ०.८१.०० | १०४५८७.२० |
| १९ | | | १९ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ४० | ४० | ०.७८.०० | १००७१३.६० |
| २० | | | २० | ०.७७.०० | ९९४२२.४० | ४१ | ४१ | ०.७५,०० | ९६८४०,०० |
| २१ | | | २१ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ४२ | ४२ | ०.७८.१२ | १००८६८.५४ |
| | | | | | | ४३ | ४३ | ०.८१.२५ | १०४९१०,०० |
| | | | | | | | | | |
| ४४ | | | ३७ | १.०८.५० | १४००९५.५२ | ७१ | ६४ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ |
| ४५ | | | ३८ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ७२ | ६५ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ |
| ४६ | | | ३९ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ७३ | ६६ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ |
| ४७ | | | ४० | ०९४.२५ | १२१६९५.६० | ७४ | ६७ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ |
| ४८ | | | ४१ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ७५ | ६८ | ०.७७.६२ | १००२२२.९४ |
| ४९ | | | ४२ | १,०५,०० | १३५५७६,०० | ७६ | ६९ | ०.८७.५० | ११२९८०.०० |
| ५० | | | ४३ | १,०५,०० | १३५५७६,०० | ७७ | ७० | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५१ | | | ४४ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ७८ | ७१ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५२ | | | ४५ | ०.९४.२५ | १२१६९५६० | ७९ | ७२ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५३ | | | ४६ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ८० | ७३ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५४ | | | ४७ | ०.९४.२५ | १२१६९५६० | ८१ | ७४ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५५ | | | ४८ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ८२ | ७५ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५६ | | विश्वजित अप्पासाहेब बिराजदार मौजे निंबर्गी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट क्र. २१०/२अ, | ४९ | ०.७८.०० | १००७१३.०६० | ८३ | ७६ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५७ | | | ५० | ०.७८.०० | १००७१३.६० | ८४ | ७७ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५८ | | | ५१ | ०.७८.०० | १००७१३.६० | ८५ | ७८ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५९ | | | ५२ | ०.७८.०० | १००७१३.६० | ८६ | ७९ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ६० | | | ५३ | ०.७८.०० | १००७१३.६० | ८७ | ८० | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ६१ | | | ५४ | ०.८७.७५ | ११३३०२.८० | ८८ | ८१ | ०.७१,५० | ९२३२०.८० |
| ६२ | | | ५५ | ०.८७.७५ | ११३३०२.८० | ८९ | ८२ | ०.९४.२५ | १२१६९५.६० |
| ६३ | | | ५६ | ०.७८.०० | १००७१३.६० | ९० | ८३ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ६४ | | | ५७ | ०,७८,०० | १००७१३.६० | ९१ | ८४ | ०.७४.२५ | ९५८७१.६० |
| ६५ | | | ५८ | ०.७८.०० | १००७१३.६० | ९२ | ८५ | ०.७४.२५ | ९५८७१.६० |
| ६६ | | | ५९ | ०.७८,०० | १००७१३.६० | ९३ | ८६ | ०.७४.२५ | ९५८७१.६० |
| ६७ | | | ६० | ०,९८,०० | १२६५३७.६० | ९४ | ८७ | ०.७४.२५ | ९५८७१.६० |
| ६८ | | | ६१ | ०.७७.६२ | ९७६४०.५४ | ९५ | ८८ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ६९ | | | ६२ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ | ९६ | ८९ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ७० | | | ६३ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ | ९७ | ९० | ०.९०.६२ | ११७००८.५४ |
| ९८ | | दयानंद शरणबसलिंग शिवयोगीगाळू डी व सब डी, सोलापूर पैकी ता. अक्कलकोट, मौजे गाव नागणसूर | ६७९/२/अ/१ | हे.१.२१.०० आर चौ मी. | ३५२२५५२.०० | | | | |
| ९९ | | सदानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. अक्कलकोट, मौजे गाव नागणसूर | ६७८ | हे.२.४५.०० आर चौ.मी. पो.ख. क्षेत्र ०.०४.०० | ७२४८८८८.०० | | | | |
| १०० | | श्रीमंत निंगप्पा पाच्छापुरे डी. व सब डी, सोलापूर पैकी ता. अक्कलकोट, मौजे गाव नागणसूर | ८०६/२/अ/२ | हे.१.२१.०० आर चौ. मी. | ३५२२५५२.०० | | | | |
| | कर्ज रक्कम बाकी दि. ३१/१२/२०२४ अखेर | रु. ३,७७,३१,३०२/- (अधिक पुढील व्याज, दंड व्याज व इतर खर्च) | | | | | | | |
| | लिलावाचे ठिकाण, तारीख व वेळ | **श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर** ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ बंद लिफाफ्यात निविद सादर करणेचे दिनांक - ०९/०५/२०२५ वेळ - सकाळी ११ ते दुपारी ५ वाजेपर्यंत. निविदा उघडण्याची वेळ सायंकाळी ५.५० वा. | | | | | | | |

**टिप-**
१. लिलावात भाग घेणाऱ्यानी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम ०७/०५/२०२५ पूर्वी दुपारी ३.०० वाजेपर्यंत डीमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर अथवा आरटीजीएसने भरणा करावी.
२. लिलावाच्या शर्ती व अटी लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येथील आणि त्या बँकेच्या सूचना पत्रक मध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकती संबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.
५. स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परिस्थितीमध्ये विक्री करण्यात येईल.
६ लिलावाचे सर्व अधिकार व हक्क बँकेने राखून ठेवले आहेत.

**दिनांक : ०८/०४/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

सही/-
विशेष वसुली व विक्री अधिकारी
श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर

**औसा नगर परिषद, औसा**
**निविदा सूचना क्र. ०१.**

**निविदा सुचना क्र.२०२५/न.प.औ./निविदा/भांडार वि./कावि- सन २०२५-२६**

औसा नगर परिषद, औसा यांचे कडुन न. प. निधी अंतर्गत साल सन २०२५-२६ साठी खालील नमूद कामाकरिता ठेकेदार, पुरवठादार, कंत्राटदार जे पुर्व अर्हता अटी पुर्ण करतील अशा ठेकेदारांकडून / पुरवठा दारांकडून /कंत्राटदार यांच्याकडून फक्त बंद पाकिट निविदा / दरपत्रक पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. या निविदाच्या पुर्व अर्हता अटी व सविस्तर निविदा सूचना, टेंडर फॉर्म तसेच सदर कामा बाबतचे वेळा पत्रक न. प. कार्यालयात पहाता व मिळवता येईल.

सदर निविदाचा सविस्तर तपशील दि. ०९/०४/२०२५ पासून उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा फॉर्म भरण्याचा सुरुवातीचा दिनांक ०९/०४/२०२५

निविदा फॉर्म भरण्याचा अंतिम दिनांक - १७/०४/२०२५ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत राहील.

| अ.क्र. | सहकारी संस्थांची नांवे |
|---|---|
| १ | न. प. चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना गणवेश, शिलाई व इतर साहित्य पुरवठा करणे. |
| २ | सण / उत्सव / ध्वजारोहण कार्यक्रम व इतर नगर परिषद कार्यालया मार्फत घेण्यात येणा-या कार्यक्रमासाठी स्टेज, मंडप, शामियाना, बॅराकेटींग व इतर साहित्य भाडेतत्वावर पुरवठा करणे |
| ३ | सण / उत्सव / ध्वजारोहण कार्यक्रम व इतर नगर परिषद कार्यालया मार्फत घेण्यात येणा-या कार्यक्रमासाठी कार्यालयावर व इतर ठिकाणी विद्युत रोषणाई करणे, फोकस लावणे साऊंड सिस्टीम, जनरेटर इत्यादी साहित्य भाडेतत्वावर पुरवठा करणे |
| ४ | नगर परिषद कार्यालयीन छपाई व झेरॉक्स पुरवठा करणे |
| ५ | नगर परिषद कार्यालयासाठी बॅनर प्रिंटीग, पॉम्प्लेट, स्टीकर पेपर इत्यादी छपाई करुन मिळणे |
| ६ | कार्यालयासाठी नविन संगणक पुरवठा करणे, तसेच जुने संगणक दुरुस्ती करणे, टोनर रिफीलींग, ॲण्टीव्हायरस पुरवठा करणे इत्यादी |
| ७ | कार्यालयीन वापरासाठी बाहन भाडेतत्वावर पुरवठा करणे |
| ८ | औसा शहरात रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी मुरूम व कच पुरवठा करणे |
| ९ | कार्यालयीन कार्यक्रमासाठी चित्रीकरण व फोटोग्राफर भाडेतत्वावर पुरवठा करणे |
| १० | आरोग्य विभागासाठी विविध साहित्य पुरवठा करणे |
| ११ | नगर परिषद कार्यालयासाठी फायबर खुर्ध्या पुरवठा करणे |

दिनांक - ०८/०४/२०२५

स्वा./-
प्रशासक तथा मुख्याधिकारी
नगर परिषद, औसा

**खरेदीपूर्व जाहिर नोटीस**

सोलापूर येथील तमाम जनतेस या खरेदीपूर्व जाहिर नोटीस कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णनः-** जिल्हा सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर, पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं.७३२/१ यासी एकूण क्षेत्र ४ हे. १३ आर, यासी आकार ३ रु. ८० पैसे ही शेतजमीन असून यासी चतुः सिमा खालीलप्रमाणे पूर्वेस गट नं.७३२ ब, ७३९, ७३६ व ७३७, दक्षिणेस रस्ता, पश्चिमेस गट नं. ७०२, उत्तरेस गट नं. ७३१ व ७३३

येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत व त्यातील तद्गभूत वस्तुसह व वहिवाटचे हक्कासह.

वर नमुद मिळकत ही **उमा ऊर्फ राधिका तानाजी हंचाटे व शितल रमेश फुटाणे** यांचे मालकी, कब्जेवहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलास वर नमुद मिळकत विक्री करण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिलेली आहे. वर नमुद मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे त्यांनी आमचे अशिलास खात्री व हमी दिलेली आहे. सबब, आमचे अशिल वर नमुद मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर नमुद मिळकतीबाबत कोणाचे कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास अथवा हरकत अथवा खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, टाच, जप्ती इ. असल्यास हि खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत हरकती लेखी स्वरुपात कागदोपत्रांनिशी खालील नमुद पत्त्यावर कळवाव्यात. हरकती मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून आमचे अशिल वर नमुद मिळकतीबाबतचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर येणाऱ्या हरकती या आमच्या अशिलावर व वर नमुद मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून हे खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. तारीख. ०८/०४/२०२५

सही/-
ॲड. शिवानंद व्ही. गंजी
(ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी, भारत सरकार)
पत्ता-घर नं. ९९९, थोबडे नगर भाग-४, शिवशरण मठाच्यामागे, एम.आय.डी.सी. रोड, सोलापूर,
मो.नं. ९९७५४६७५५०
अशिलातर्फे ॲडव्होकेट

**सावधानतेची नोटीस**

आमच्या सर्व ग्राहक, पुरवठादार, व्यावसायिक सहयोगी आणि संबंधितांना कळविण्यात येते की, आमच्या संस्थेच्या **शेठ सखाराम नेमचंद रसशाळा, सोलापूर** येथे –

**१. श्री. अवधूत ऊर्फ गिरीश भालचंद्र वैद्य** राहणार घर नंबर ६२, बसवराज निलम नगर, रुबी नगर शेजारी, जुळे सोलापूर, सोलापूर – ४१३ ००८ हे २० वर्षे मॅनेजर म्हणून कार्यरत होते.

**२. डॉ. प्रज्ञा प्रकाश कुलकर्णी** (डॉ. सौ. प्रज्ञा प्रांजल कुलकर्णी) राहणार अ–८, द्वारका नगर, अंकुर रोप वाटिका जवळ, विजापूर रोड, सोलापूर – ४१३ ००४ ह्या क्वालिटी कंट्रोल ऑफिसर म्हणून ०२ वर्षे कार्यरत होत्या.

**वरील दोघांनी संगनमताने संस्थेमध्ये अनेक आर्थिक गैरव्यवहार, आर्थिक अफ़रातफर, निष्काळजीपणा, फसवणूक करून संस्थेचे मोठे आर्थिक नुकसान असे गंभीर गैरवर्तन केले आहे.**

**त्यामुळे त्यांचे विरुद्ध अक्कलकोट रोड, एम आय डी सी, सोलापूर पोलिस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्यांची रितसर खातेनिहाय चौकशी करून श्री. अवधूत ऊर्फ गिरीश भालचंद्र वैद्य यांना दिनांक २५/०३/२०२५ पासून तर डॉ. प्रज्ञा प्रांजल कुलकर्णी यांना दि.०५/१०/२०२४ पासून सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.**

परिणामी डॉ. प्रज्ञा प्रांजल कुलकर्णी यांनी अन्न व औषध प्रशासन, राजकीय पुढारी यांना खोटी माहिती पुरवून व पत्रकार परिषदेद्वारे संस्थेची बदनामी करण्याचा उपद्रव चालविला आहे, त्यामध्ये काही तथ्य नाही.

श्री अवधूत ऊर्फ गिरीश भालचंद्र वैद्य व डॉ. प्रज्ञा प्रांजल कुलकर्णी हे दोघे आता आमच्या संस्थेच्या कोणत्याही आस्थापनेशी, कोणत्याही पदावर कार्यरत नाहीत आणि ते दोघे सोलापूर येथील शेठ सखाराम नेमचंद रसशाळा यांचे कोणत्याही व्यवहारात प्रतिनिधित्व करण्यास अधिकृत नाहीत. तरी त्यांचेशी कोणीही, कसलेही आर्थिक व्यवहार करू नये अन्यथा होणाऱ्या नुकसानीस संस्था जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही सावधानतेची नोटीस दिली तारीख ०९/०४/२०२५

विश्वस्त मंडळ, शेठ सखाराम नेमचंद रसशाळा, ई–१०१/१, एम आय डी सी, अक्कलकोट रोड, सोलापूर – ४१३ ००६ यांनी जनहितार्थ जारी केलेले आहे.

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



### महत्त्वाचे

**चॅम्पियन्स ट्रॉफीमधून पीसीबीला अपेक्षेपेक्षा जास्त कमाई**

**कराची** : आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या आयोजनातून ३ अब्ज रुपये कमाई झाल्याचा दावा पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) केला आहे, जे त्यांच्या २ अब्ज रुपयांच्या उद्दिष्टापेक्षा जास्त आहे. गेल्या दोन वर्षांत राष्ट्रीय संघाच्या सातत्याने खराब कामगिरीबद्दल चिंता व्यक्त करणाऱ्या राष्ट्रीय असेंब्लीला दिलेल्या लेखी उत्तरात पीसीबीने हा दावा केला. पीसीबीने त्यांच्या लेखी उत्तरात कराची, लाहोर आणि रावळपिंडी येथील स्टेडियमच्या नूतनीकरणावर एकूण १८ अब्ज रुपये खर्च केले जात असल्याची पुष्टी केली आहे. बोर्डाने सांगितले की नूतनीकरण प्रक्रिया २०२६ पर्यंत पूर्ण होईल आणि त्याचा दुसरा टप्पा मे महिन्यात पाकिस्तान सुपर लीग संपल्यानंतर सुरू होईल. चॅम्पियन्स ट्रॉफी आणि इतर गोष्टींमुळे आतापर्यंत अंदाजपत्रकात कोणतीही वाढ झालेली नाही. पीसीबी त्यांच्या आर्थिक वर्षाच्या अखेरीस दरवर्षी दोन ऑडिट करते, अशी पीसीबीने पुष्टी केली. चालू आर्थिक वर्षाचे ऑडिट ३० जून २०२५ नंतर केले जाईल. आयसीसीचे आर्थिक लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उत्पन्नाचा अंतिम आकडा निश्चित केला जाईल, असेही बोर्डाने म्हटले आहे.

### कोलकाताविरुद्धच्या रणनीतीचा फायदा : ऋषभ पंत



**कोलकाता** : कोलकाता नाईट रायडर्सवर विजय मिळवल्यानंतर लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंत म्हणाला की, पॉवरप्लेमध्ये कोलकाता नाईट रायडर्सच्या फलंदाजांनी केलेल्या शानदार कामगिरीनंतर गोलंदाजांना त्यांच्या योजनेवर टिकून राहण्याचा आणि जास्त प्रयोग न करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सुपर जायंट्सने दिलेल्या २३९ धावांच्या आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना नाईट रायडर्सने १० षटकांत २ बाद १२९ धावा केल्या पण त्यानंतर त्यांची फलंदाजी कोसळली. यजमान संघाला चार धावांनी पराभव स्वीकारावा लागला. सामन्यानंतर पंत म्हणाला की, पहिल्या पॉवरप्लेनंतर, आम्ही गोलंदाजांशी योजनेवर टिकून राहण्याबद्दल आणि जास्त काही करण्याचा प्रयत्न न करण्याबद्दल बोललो. मला वाटतं आम्ही फलंदाजी करताना ते लक्षात आलं नव्हतं, पण पॉवरप्लेनंतर आम्हाला कळलं की ही एक चुरशीची लढत असेल. केकेआरकडून खेळाची गती हिरावून घेण्यासाठी त्याने खेळ मंदावण्याचा प्रयत्न केला, असे पंतने सांगितले. अर्थातच हा एक सावध निर्णय होता कारण जेव्हा खेळ त्या वेगाने सुरू असतो तेव्हा तुम्हाला तो कमी करावा लागतो. कधीकधी ते काम करते, कधीकधी नाही. आज ते यशस्वी झाले याचा मला आनंद आहे.

### वुशु विश्वचषकात भारतीय खेळाडू चमकले

**जियांगयिन (चीन)** : भारतीय वुशु खेळाडू मुकेश चौधरीने ७५ किलो वजन गटात सुवर्णपदक जिंकले तर इतर पाच खेळाडूंनी येथे झालेल्या १० व्या सांडा विश्वचषक स्पर्धेत अंतिम फेरी गाठली. आतापर्यंतच्या स्पर्धेत जगातील काही सर्वोत्तम खेळाडूंविरुद्ध सहा सदस्यांच्या भारतीय संघाने उल्लेखनीय कौशल्य दाखवले आहे. भारताच्या आतापर्यंतच्या मोहिमेतील सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुकेश चौधरीने ७५ किलो वजन गटात अंतिम फेरीत त्याच्या फ्रेंच प्रतिस्पर्ध्यावर प्रभावी विजय मिळवत सुवर्णपदक जिंकले. कुशलने ४८ किलो वजन गटात येमेनच्या त्याच्या प्रतिस्पर्ध्याला पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला आणि स्पर्धेतील विजयी घोडदौड सुरू ठेवली. रवी पांचालने ६५ किलो गटात कझाकस्तानच्या प्रतिस्पर्ध्याला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला, तर ५२ किलो गटात अनुज कुमार आणि ८५ किलो गटात रजत चरक हे देखील सुवर्णपदकासाठी आव्हान देतील. महिला खेळाडूंमध्ये ४८ किलो वजन गटात, छावीने तिच्या पोर्तुगीज प्रतिस्पर्ध्याला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला.

### कुंवर सुभाष पटेल प्रीमियर लीगमध्ये १० संघ

**नवी दिल्ली** : कुंवर सुभाष पटेल स्मृती प्रीमियर लीग १९ एप्रिलपासून बरेली येथील जीपी वेल्फेअर ट्रस्टद्वारे दोहरा रोड येथील मैदानावर आयोजित केली जाईल. या स्पर्धेसाठी रविवारी झालेल्या लिलाव समारंभात शहरातील दहा आघाडीच्या संघांनी सहभाग घेतला. यामध्ये न्यूरो किड्स द इनव्हिन्सिबल, गज ग्रीन, एन्स डायमंड्स, मनितम इंडियन्स, न्यूट्री वर्ल्ड सुपर जायंट्स, प्रेमचंद सोनी अँड सन्स, केएआय रॉयल्स, श्री सिद्धी विनायक नाईट रायडर्स, सनरायझर्स सलून एमएम आणि आरआरआर यासारख्या संघांचा समावेश आहे. लिलाव प्रक्रियेदरम्यान, हर्ष राणाला १२,१०० रुपयांची सर्वाधिक बोली मिळाली. दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात महागडा खेळाडू शिवकुमार राठी होता. न्यूरो किड्स द इनव्हिन्सिबल टीमने त्याला ११,६०० रुपयांना खरेदी केले.

# लखनौचा कोलकातावर ४ धावांनी विजय

## निकोलस पूरनच्या तडाखेबंद ८७ धावा ● अजिंक्य रहाणेचे प्रयत्न व्यर्थ

**कोलकाता, ८ एप्रिल**

आयपीएलच्या १८ व्या हंगामातील मंगळवारी कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात झालेल्या सामन्यात लखनौने ४ धावांनी विजय मिळवला. पहिले फलंदाजी करताना लखनौने फलंदाजांच्या जोरावर २० षटकांत ३ बाद २३८ धावा केल्या. धावांचा पाठलाग करताना कोलकाता संघाने शेवटपर्यंत झुंज दिली. पण त्यांना ७ बाद २३४ धावांपर्यंत मजल मारता आली. परिणामी त्यांचा ४ धावांनी पराभव झाला. कोलकाताचा कर्णधार अजिंक्य रहाणेची अर्धशतकी खेळी त्यांना विजय मिळवून देऊ शकली नाही. सामनावीराचा पुरस्कार लखनौच्या निकोलस पूरनला मिळाला. त्याने ३६ चेंडूंत तडाखेबंद नाबाद ८७ धावा केल्या. लखनौने या हंगामात तिसरा विजय मिळवला.



तडाखेबंद फलंदाजी करताना निकोलस पूरन

दिवसा झालेल्या सामन्यात फलंदाजीसाठी अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर नाणेफेक जिंकल्यानंतर केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणेने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. परंतु लखनौचे सलामीवीर मिचेल मार्श (८१) आणि एडन मार्करम (४७) यांनी तो चुकीचा ठरवला. दोघांनीही पहिल्या गड्यासाठी १०.२ षटकांत ९९ धावांची भागीदारी केली. हर्षित राणाने ही भागीदारी मोडली, पण त्यानंतर निकोलस पूरन आला आणि त्याने चौफेर फटके हाणले.

पूरन आणि मार्शमध्ये दुसऱ्या गड्यासाठी ३० चेंडूंत ७१ धावांची भागीदारी झाली. दोघांनीही मैदानावर सर्वत्र फटके मारले आणि काही उत्कृष्ट षटकार मारून कोलकात्याच्या प्रेक्षकांचे मनोरंजन केले. ८१ धावांवर आंद्रे रसेलच्या एका संथ चेंडूवर मार्श त्याच्या शतकाकडे वाटचाल करताना बाद झाला. त्यानंतर पूरनने अब्दुल समदसोबत १८ चेंडूंत ५१ धावांची भागीदारी केली, ज्यामध्ये समदचे योगदान फक्त सहा धावांचे होते.

मार्शप्रमाणेच, पूरन देखील दुर्दैवी ठरला. तो त्याचे शतक पूर्ण करू शकला नाही. त्याने ३६ चेंडूंत सात चौकार आणि आठ उत्तुंग षटकारांसह ८७ धावांची नाबाद खेळी केली. कोलकाताकडून हर्षित राणाने २ आणि आंद्रे रसेलने १ गडी बाद केला. २३९ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना कोलकाताने जलद सुरुवात केली. क्विंटन डी कॉक आणि सुनील नारायण यांनी पहिल्या गड्यासाठी फक्त २.३ षटकांत ३७ धावांची भागीदारी केली. आकाश दीपच्या चेंडूवर डी कॉक बाद झाला. त्यानंतर नरेन आणि कर्णधार रहाणे यांनी २३ चेंडूंत ५४ धावांची भागीदारी करून केकेआरला सामन्यात टिकवून ठेवले. जेव्हा दिग्वेश राठीने त्याचा आदर्श नारायणला लाँग ऑफवर झेलबाद केले तेव्हा केकेआरने फक्त ६.२ षटकांत ९१ धावा केल्या होत्या.

यानंतर, केकेआरचा कर्णधार आणि उपकर्णधार व्यंकटेश अय्यरने विजयाचा पाया रचला आणि ४० चेंडूंत ७१ धावांची भागीदारी केली. जोपर्यंत ते दोघेही तिथे होते, तोपर्यंत केकेआर लक्ष्य गाठू शकेल असे वाटत होते. पण शार्दुल ठाकूरने प्रथम रहाणे आणि नंतर आंद्रे रसेलला सलग दोन चेंडूंवर (वेगवेगळ्या षटकांमध्ये) फुल-टॉसवर बाद करून केकेआरच्या धावांचा पाठलाग रोखला.

केकेआरचे शेवटचे पाच गडी तीन षटकांच्या आत पडल्या. शेवटी, रिंकू सिंगने १५ चेंडूंत ३८ धावा केल्या तरी त्या पुरेशा नव्हत्या. लखनौचे गोलंदाज आकाशदीप आणि शार्दुल ठाकूरने प्रत्येकी २ गडी, तर आवेश खान, दिग्वेश राठी आणि रवि बिश्नोईने प्रत्येकी १ गडी बाद केला. (वृत्तसंस्था)

# गुजरात, राजस्थान गोलंदाजी सुधारण्याच्या प्रतीक्षेत

## विजय मिळवून गुणतालिकेत स्थान मजबूत करणार

**अहमदाबाद, ८ एप्रिल**

बुधवारी येथे होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीग सामन्यात गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स एकमेकांविरुद्ध लढणार आहेत. दोन्ही संघ गोलंदाजीच्या कमतरता दूर करण्याचा प्रयत्न करतील. गजरात टायटन्सचे सध्या सहा गुण आहेत आणि येथे विजय मिळवल्यास त्यांचे गुणतालिकेत स्थान आणखी मजबूत होईल. राजस्थान रॉयल्सचे चार गुण आहेत. या दोन्ही संघांच्या काही प्रमुख गोलंदाजांना आतापर्यंत अपेक्षेनुसार कामगिरी करता आलेली नाही आणि जर या संघांना गुणतालिकेत त्यांचे स्थान मजबूत करायचे असेल तर त्यांच्या गोलंदाजांना चांगली कामगिरी करावी लागेल.



शुभमन गिल



संजू सॅमसन

**आजचा सामना**
**गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

गुजरात टायटन्सकडून आतापर्यंत फक्त वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि फिरकी गोलंदाज साई किशोर यांनीच गोलंदाजीत चांगली कामगिरी केली आहे. स्टार फिरकी गोलंदाज रशीद खान आणि अनुभवी वेगवान गोलंदाज इशांत शर्मा यांचा खराब फॉर्म त्यांच्यासाठी चिंतेचा विषय आहे. टी-२० स्पेशालिस्ट असलेल्या रशीदने चार सामन्यांत फक्त एकच गडी बाद केला आहे आणि प्रति षटक १० पेक्षा जास्त धावा दिल्या आहेत. आयपीएलमध्ये अफगाणिस्तानच्या खेळाडूची सुरुवात चांगली झाली नाही अशी ही पहिलीच वेळ आहे. वेगवान गोलंदाज इशांत शर्मानेही तीन सामन्यांत फक्त एकच गडी बाद केला आहे. त्याने प्रति षटक १२ धावा दिल्या आहेत.

गुजरातकडेही पर्याय नाहीत कारण अर्शद खान किंवा फजलहक फारुकी सारख्या वेगवान गोलंदाजांनी खरोखर प्रभाव पाडलेला नाही. आता त्यांना राजस्थानच्या मजबूत फलंदाजी फळीचा सामना करावा लागेल ज्यामध्ये संजू सॅमसन, ध्रुव जुरेल, रियान पराग आणि नितीश राणा सारखे आक्रमक फलंदाज आहेत. या सर्वांनी १५० पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने धावा केल्या आहेत. सलामीवीर यशस्वी जयस्वालनेही पंजाब किंग्जविरुद्ध ६७ धावा करून कामगिरी सुधारण्याचे संकेत दिले आहेत. गुजरातप्रमाणेच राजस्थानची सर्वात मोठी चिंता गोलंदाजी आहे. संदीप शर्मा वगळता, त्यांच्या संघातील इतर कोणताही गोलंदाज त्यांच्या कामगिरीत सातत्य राखू शकलेला नाही.

पंजाब किंग्ज विरुद्धच्या शेवटच्या सामन्यात इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने २५ धावा देत तीन गडी बाद केले आणि पुढेही संघाला त्याच्याकडून अशाच कामगिरीची अपेक्षा असेल. आतापर्यंत अहमदाबादमध्ये फलंदाजांचे वर्चस्व गाजवले आहे. या मैदानावर आतापर्यंत खेळलेल्या चार पूर्ण झालेल्या डावांमध्ये २४३, २३२, ११६ आणि १६० अशा धावा झाल्या आहेत. गुजरातकडे कर्णधार शुभमन गिल, जोस बटलर, शेरफेन रदरफोर्ड आणि बी. साई सुदर्शन यांचा समावेश असलेली मजबूत फलंदाजी फळी देखील आहे. (वृत्तसंस्था)

# रजत पाटीदारने बंगळुरूला नैराश्यातून बाहेर काढले

## सुनील गावस्कर यांचे गौरवोद्‌गार

**मुंबई, ८ एप्रिल**

माजी दिग्गज फलंदाज सुनील गावस्कर यांनी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा कर्णधार रजत पाटीदारचे कौतुक केले. ते म्हणाले की, त्याच्या साधेपणामुळे अनेक वर्षांच्या निराशेनंतर संघाला अखेर इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये यश मिळाले आहे.





आरसीबी संघ सध्याच्या आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करत आहे. १७ वर्षांनंतर चेन्नईतील चेपॉक येथे पहिला विजय मिळवला आणि वानखेडे स्टेडियमवर सहा सामन्यांच्या पराभवाची मालिका संपुष्टात आणली.

पाटीदार कर्णधार म्हणून सहज वावरतो, असे गौरवोद्‌गार गावस्कर यांनी काढले. त्याच्या संघाने गेल्या १७ वर्षांत विजेतेपद जिंकलेले नाही आणि आता त्याच्या खेळाडूंना जिंकण्यासाठी काय करावे लागेल हे समजले आहे. शांत आणि संयमी कर्णधारासोबतच, संघाशी संबंधित इतर खेळाडूही त्यांचे पूर्ण योगदान देत आहेत. गावस्कर यांनी आरसीबीचे मार्गदर्शक दिनेश कार्तिक यांच्या भूमिकेचेही कौतुक केले.

बंगळुरूकडे नेहमीच मदत करणारे अनेक वरिष्ठ लोक आहेत. त्यांच्याकडे एक मजबूत सपोर्ट स्टाफ आहे. त्यांच्या सपोर्ट स्टाफमध्ये दिनेश कार्तिकसारखा कोणीतरी आहे ज्याच्या प्रभावाबद्दल लोक पुरेसे बोलत नाहीत. दिनेश कार्तिक हा तरुण खेळाडूंना सांभाळून घेणारा आहे. त्यांना तो योग्य मार्गदर्शन करतो.

गावस्कर यांनी मुंबई इंडियन्सचा खराब फॉर्म असलेला वरिष्ठ फलंदाज रोहित शर्माला त्याच्या फटक्यांवर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. (वृत्तसंस्था)

# अंतिम अकरामध्ये जास्त बदल नाही

## महेला जयवर्धनेची माहिती

**मुंबई, ८ एप्रिल**

आयपीएलच्या १८ व्या हंगामात मुंबई इंडियन्सने आतापर्यंत पाचपैकी चार सामने गमावले आहेत. असे असताना मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने यांनी अंतिम अकरा जणांमध्ये जास्त बदल करण्याची शक्यता नाकारली आहे.



सोमवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध मुंबईच्या १२ धावांनी पराभवानंतर जयवर्धने विचारले की, तो आगामी सामन्यांमध्ये अंतिम अकरा खेळाडूंमध्ये बदल करेल का, तेव्हा तो म्हणाला, याची काहीच गरज नाही. निकाल कदाचित आमच्या बाजूने नसतील पण त्याच वेळी तुम्हाला हे मान्य करावे लागेल की आम्ही काही चांगल्या खेळी खेळल्या आहेत.

मी अजूनही संघात वरिष्ठ खेळाडूंना कायम ठेवण्याचे समर्थन करेन. ज्या खेळाडूंवर आम्ही विश्वास दाखवला आहे त्या सर्व खेळाडूंना मी पाठिंबा देईन. त्यांच्याकडे कौशल्य आहे पण आम्हाला थोडी अधिक चांगली कामगिरी करण्याची गरज असल्याचे जयवर्धने म्हणाला. सामन्यात पराभव होणे ही चांगली गोष्ट नाही. यामुळे तुम्हाला स्वतःवर शंका येऊ लागते आणि कधीकधी अशा परिस्थितीत संघात नवीन चेहरा आणणे खेळाडूसाठी अनुभवाशिवाय आणखी कठीण होऊ शकते.

ज्या लोकांकडे अनुभव आहे, त्यांना कठीण परिस्थिती कशी हाताळायची आणि नंतर मानसिकदृष्ट्या कसे मजबूत व्हायचे हे माहीत आहे, असेही जयवर्धने म्हणाला. (वृत्तसंस्था)

# हरमनप्रीत कौर करणार भारताचे नेतृत्व

## श्रीलंकेत होणार तिरंगी एकदिवसीय मालिका

**नवी दिल्ली, ८ एप्रिल**

जानेवारीमध्ये आयर्लंडविरुद्धच्या घरच्या मालिकेसाठी विश्रांती देण्यात आल्यानंतर, या महिन्याच्या अखेरीस श्रीलंकेत सुरू होणाऱ्या एकदिवसीय तिरंगी मालिकेत स्टार फलंदाज हरमनप्रीत कौर भारतीय महिला संघाचे नेतृत्व करेल.



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या महिला निवड समितीने २७ एप्रिल ते ११ मे दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेसाठी १५ सदस्यीय संघाची निवड केली आहे. स्मृती मंधानाची उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भारत आणि श्रीलंका व्यतिरिक्त, या स्पर्धेत सहभागी होणारा तिसरा संघ दक्षिण आफ्रिकेचा आहे.

डबल राउंड रॉबिन पद्धतीने होणाऱ्या या स्पर्धेत भारताचा पहिला सामना २७ एप्रिल रोजी श्रीलंकेविरुद्ध होईल. प्रत्येक संघ चार सामने खेळेल आणि अव्वल संघ ११ मे रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यासाठी पात्र ठरतील. सर्व सामने कोलंबोमधील आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळले जातील.

वेगवान गोलंदाज रेणुका सिंग ठाकूर आणि तीतस साधू जखमी आहेत आणि त्यामुळे त्यांचा निवडीसाठी विचार करण्यात आला नाही, असे बीसीसीआयने म्हटले आहे. या संघात काशवी गौतम, श्री चरणी आणि शुची उपाध्याय यांचाही समावेश आहे. या तिघींनी अद्याप कोणताही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. हरमनप्रीतला आयर्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या घरच्या एकदिवसीय मालिकेसाठी (१०-१५ जानेवारी) विश्रांती देण्यात आली होती, ही मालिका भारताने ३-० ने जिंकली होती. त्यावेळी मंधानाने संघाचे नेतृत्व केले होते.

डिसेंबर २०२४ मध्ये, वेस्ट इंडिजविरुद्धच्या घरच्या मालिकेदरम्यान हरमनप्रीतला गुडघ्याला दुखापत झाली. यापूर्वी,

**भारतीय संघ**

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), प्रतिका रावल, हरलीन देओल, जेमिमाह रॉड्रिग्स, ऋचा घोष (यष्टिरक्षक), यास्तिका भाटिया (यष्टिरक्षक), दीप्ती शर्मा, अमनजोत कौर, काशवी गौतम, स्नेह राणा, दीप्ती शर्मा.

ऑक्टोबर २०२४ मध्ये महिला टी-२० विश्वचषकात पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यादरम्यान ३५ वर्षीय खेळाडूला मानेला दुखापत झाली होती. तथापि, हरमनप्रीतने गेल्या महिन्यात महिला प्रीमियर लीगमध्ये यशस्वी पुनरागमन केले. तिच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने जेतेपद जिंकले.

आयर्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी वेगवान गोलंदाज रेणुकाला विश्रांती देण्यात आली होती. डिसेंबर २०२४ मध्ये वेस्ट इंडीजविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात ती मालिकावीर होती. तिने तीन सामन्यात १० गडी बाद केले होते. (वृत्तसंस्था)

### संथ षटकासाठी कर्णधार पाटीदारला १२ लाखांचा दंड

**मुंबई, ८ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्स विरुद्धच्या सामन्यात संथ षटके टाकल्याबद्दल रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा कर्णधार रजत पाटीदार याला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. सोमवारी खेळलेला हा सामना आरसीबीने १२ धावांनी जिंकला होता. पाटीदारने ३२ चेंडूंत ६४ धावा करून आपल्या संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. आयपीएलच्या आचारसंहितेच्या कलम २.२ अंतर्गत संथगती षटकाशी संबंधित त्याच्या संघाचा हंगामातील हा पहिलाच गुन्हा होता आणि त्यामुळे पाटीदारला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे, असे आयपीएलच्या एका प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### प्रभावी गोलंदाजीमुळे विजयावर शिक्कामोर्तब

**मुंबई, ८ एप्रिल**

मुंबई इंडियन्सवर १२ धावांनी रोमांचक विजय मिळवल्यानंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा कर्णधार रजत पाटीदारने गोलंदाजांचे कौतुक केले.

या सामन्यात, आरसीबीने विराट कोहली (६७) आणि कर्णधार रजत पाटीदार (६४) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर पाच बाद २२१ धावा केल्या आणि त्यानंतर मुंबईला नऊ बाद २०९ धावांवर रोखले आणि २०१५ नंतर पाहुण्या संघाविरुद्धचा त्यांचा पहिला विजय नोंदवला. सामनावीर म्हणून निवड झालेला कर्णधार पाटीदार पुरस्कार सोहळ्यात म्हणाला की, आमच्या गोलंदाजांनी ज्या धाडसाने गोलंदाजी केली ती कौतुकास्पद आहे. हा पुरस्कार मी त्यांना समर्पित करतो. शेवटच्या षटकात तीन गडी बाद करणाऱ्या कृणाल पंड्याचे कौतुक करताना रजत म्हणाला, शेवटच्या षटकात त्याने ज्या पद्धतीने गोलंदाजी केली ती अद्भुत होती. (वृत्तसंस्था)

# ८२ लाख रुपये खर्चून बांधणार जिम्नॅस्टिक्स संकुल

## बरेली विकास प्राधिकरणाची प्रक्रिया

**बरेली, ८ एप्रिल**

जिम्नॅस्टिक्स खेळाडूंना लवकरच बरेली येथील क्रीडा स्टेडियममध्ये सरावासाठी संकुल मिळणार आहे. बीडीए (बरेली विकास प्राधिकरण) ने ८२ लाख रुपये खर्चाच्या संकुलाच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया पूर्ण केली आहे. अंमलबजावणी एजन्सी म्हणून विपीन भाटिया कंपनीची निवड करण्यात आली आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा पुरवल्या जातील. आतापर्यंत स्टेडियममध्ये जिम्नॅस्टिक्ससाठी स्वतंत्र जागा नव्हती. खेळाडू बॅडमिंटन हॉलच्या कोपऱ्यात मर्यादित जागेत गाद्या घालून सराव करत होते. त्यामुळे त्यांना अनेक गैरसोयींना तोंड द्यावे लागले.



आता जिम्नॅस्टिक्स हॉलच्या बांधकामानंतर खेळाडूंना गाद्या आणि इतर उपकरणे ठेवण्यासाठी एक योग्य जागा मिळणार आहे. नवीन संकुलात उपकरणे दुरुस्त केली जातील. यामुळे सराव अधिक चांगल्या रीतीने करता येईल. (वृत्तसंस्था)

# महिन्याच्या पुरस्काराच्या शर्यतीत श्रेयस अय्यर

**दुबई, ८ एप्रिल**

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये शानदार कामगिरी करणारा भारताचा मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यरला मार्च महिन्यासाठी आयसीसीच्या महिन्यातील सर्वोत्तम क्रिकेटपटू पुरस्कारासाठी न्यूझीलंडच्या रचिन रवींद्र आणि जेकब डफीसह नामांकन मिळाले आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताच्या जेतेपदाच्या शिल्पकारांपैकी एक असलेल्या अय्यरने पाच सामन्यांमध्ये दोन अर्धशतकांसह २४३ धावा केल्या. उजव्या हाताने फलंदाजी करणाऱ्या अय्यरने मार्चमध्ये तीन एकदिवसीय सामन्यांमध्ये ५७.३३ च्या सरासरीने १७२ धावा केल्या आणि स्पर्धेत भारताकडून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता, असे आयसीसीने एका प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. भारताच्या अपराजित मोहिमेत अय्यरचे योगदान महत्त्वाचे होते. त्याने न्यूझीलंडविरुद्धच्या ग्रुप ए सामन्यात ७९ आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात ४५ धावा केल्या. याशिवाय, न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यातही त्याने ४८ धावा केल्या. डाव मजबूत करण्याची आणि भागीदारी उभारण्याची त्याची क्षमता भारतासाठी महत्त्वाची ठरली, असे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. रवींद्रने चार सामन्यांमध्ये दोन शतकांसह २६३ धावा केल्या आणि तीन गडीही बाद केले. तर जगातील नंबर वन टी-२० गोलंदाज डफीने मार्चमध्ये ६ गडी बाद केले होते. मार्च महिन्यातील आयसीसीच्या सर्वोत्तम महिला क्रिकेटपटूच्या शर्यतीत अमेरिकेची चेतना प्रसाद, ऑस्ट्रेलियाची ॲनाबेल सदरलँड आणि जॉर्जिया वोल आहेत. (वृत्तसंस्था)

# बॅडमिंटन आशियाई चॅम्पियनशिप स्पर्धेत ध्रुव, तनिषा उपांत्यपूर्व फेरीत

**निंगबो (चीन), ८ एप्रिल**

मंगळवारी येथे झालेल्या बॅडमिंटन आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत मलेशियाच्या हू पांग रॉन आणि सु यिन चेंग यांच्यात झालेल्या चुरशीच्या सामन्यात ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो या भारतीय मिश्र दुहेरी जोडीने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

पहिल्या फेरीच्या सामन्यात ध्रुव आणि तनिषा या भारतीय जोडीने त्यांच्या मलेशियन प्रतिस्पर्ध्यांचा ५१ मिनिटांत १५-२१, २१-१२, २१-११ असा पराभव केला. ध्रुव आणि




तनिषाचा पुढील सामना चायनीज तैपेईच्या हॉँग वेई ये आणि निकोल गोंझालेस चान यांच्याशी होईल. तथापि, मिश्र दुहेरीत भारताच्या इतर तीन जोड्यांना पहिल्या फेरीत पराभव पत्करावा लागला.

सतीश कुमार करुणाकरन आणि आद्या वरियाथ या जोडीला तिसऱ्या मानांकित मलेशियाच्या सून हुआट गोह आणि शेवॉन जेमी लाई या जोडीकडून १८-२१, १९-२१ असा पराभव पत्करावा लागला. आशित सूर्या आणि अमृता प्रमुथेश यांनाही मलेशियाच्या थुलिय पल्लियागुरू आणि पांचाली अधिकारी यांच्याविरुद्ध ९-२१, ११-२१ असा पराभव पत्करावा लागला. मिश्र दुहेरीत रोहन कपूर आणि रुत्विका शिवानी गड्डे या भारतीय जोडीने यॉंग किंग याप आणि व्हॅलेरी सेव या मलेशियन जोडीला कडवी झुंज दिली पण त्यांना ५६ मिनिटांत २१-१८, १७-२१, १७-२१ असा पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आमदार निवासात हृदयविकाराच्या झटक्याने सोलापुरातील वृद्धाचा मृत्यू

## रुग्णवाहिका वेळेत न आल्याने पोलिसांनी रुग्णालयात नेले

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.८ एप्रिल:**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने वेळेवर उपचार न केल्याने एका गर्भवतीचा मृत्यू झाल्याने राज्यभरातून संताप व्यक्त होत असतानाच मंत्रालयापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या आकाशवाणी आमदार निवासस्थानात सोलापूरहून आलेल्या एका वृद्धाचा वेळेत उपचार न झाल्याने मृत्यू होण्याची दुर्दैवी घटना मंगळवारी उघडकीस आली.

चंद्रकांत धोत्रे (वय ६०) असे त्यांचे नाव असून हृदयविकाराचा झटका आल्यानंतर अनेकदा फोन करूनही १०८ क्रमाकांची रुग्णवाहिका आमदार निवासस्थानी आली नाही, त्यामुळे पोलिसांच्या गाडीतून त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचार सुरू करण्यापूर्वी त्यांचा मृत्यू झाला. रुग्णवाहिका वेळेत पोहोचली असती तर कदाचित त्यांचे प्राण वाचले असते. मंत्रालयापासून काही मिटर अंतरावर असलेल्या ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे आरोग्य विभागाच्या या ढिसाळपणाबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### ...तर कदाचित वडील वाचले असते

वेळेत रुग्णवाहिका आली असती तर माझ्या वडिलांचा जीव वाचला असता, आमदार निवासस्थानात रुग्णवाहिका न येण्याची चौकशी करण्यात यावी आणि आमदार निवासस्थानी एक रुग्णवाहिका कायमस्वरुपी उपलब्ध करून देण्यात यावी,

**-विशाल धोत्रे**
( मृत चंद्रकांत धोत्रे यांचे पुत्र)

धोत्रे यांचे पुत्र विशाल धोत्रे हे भारतीय जनता पक्षाचे आमदार विजयकुमार देशमुख यांचे कार्यकर्ते. समाजाच्या प्रश्नाबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यासाठी ते मुलासमवेत सोमवारी मुंबईला आले होते .आमदार देशमुख यांच्या नावे असलेल्या आकाशवाणी आमदार निवासस्थानातील त्यांच्या खोली क्रमांक ४०८ मध्ये ते थांबले होते.

रात्री साडेबाराच्या सुमारास चंद्रकांत धोत्रे यांना छातीत दुखू लागले त्यांचे पुत्र विशाल यांनी तातडीने १०८ क्रमांकावर फोन करून रुग्णवाही केची मागणी केली वारंवार फोन करून कळवूनही रुग्णवाहिका अर्धा तास झाले तरी घटनास्थळी आली नाही त्यामुळे अखेर पोलीस नियंत्रण कक्षाला कॉल करून पोलीस व्हॅन मागवण्यात आली ते आल्यानंतर धोत्रे यांना त्यात घालून घेते हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले मात्र उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मावळली होती.त्यामुळे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.




# मारिया क्रिकेट क्लबचा क्रिक किंग्डमवर दणदणीत विजय

### रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : एम. युवराज सामनावीर

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

रेल्वेच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत एम. युवराजच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर मारिया क्रिकेट क्लबने क्रिक किंग्डम संघावर १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात मंगळवारी झालेल्या सामन्यात मारिया क्लबने क्रिक किंग्डमचा डाव केवळ ४१ धावांत गुंडाळला. विजयी लक्ष्य त्यांनी केवळ तीन षटकांत गाठले. एम. युवराज सामन्याचा मानकरी ठरला. त्यास हा पुरस्कार ज्येष्ठ पंच अमोल अंगडी यांच्या हस्ते देण्यात आला. पंच म्हणून अंगडी व किरण डिग्गे यांनी तर सचिन गायकवाड यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले. प्रत्येक सामन्यातील सामनावीरचे पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत.

### आजचे सामने

१)मारिया क्रिकेट क्लब विरुद्ध सिटी टायटन्स.
२)सोलापूर पोलीस विरुद्ध बागलकोट क्रिकेट अकॅडमी.

### संक्षिप्त धावफलक

**क्रिक किंग्डम :** ११.४ षटकांत सर्व बाद ४१ (गिरीष पाटील ११, एम युवराज ५ बळी, युवान शर्मा ३ बळी, सोहम तिवारी व उपेंद्र कुमार प्रत्येकी एक बळी) पराभूत विरुद्ध **मारिया क्रिकेट क्लब** : ३ षटकांत बिन बाद ४३ (ओम पवार नाबाद २५)

## निधन वृत्त...

### मार्कंडेय यन्नम



**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**
पूर्व भागातील गडगी नगर येथील रहिवासी मार्कंडेय शंकरय्या यन्नम (वय ७७) यांचे मंगळवारी दि. ८ एप्रिल रोजी रात्री ९.३० वाजता आकस्मित निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा व एक मुलगी, सून मुले सून नातवंडे असा परिवार आहे.

### महाळप्पा तळेकर



**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**
वैदू वाडी भागातील रहिवासी महाळप्पा गोविंद तळेकर (वय ६२) यांचे मंगळवारी दुपारी ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, बहीण, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा दि. ९ एप्रिल रोजी सकाळी १२ वाजता वैदू वाडी येथील निवासस्थानापासून ते रूपाभवानी स्मशानभूमी येथे निघणार आहे.

### जयकुमार धरमसी



**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**
जयकुमार खेतसी धरमसी (७५) यांचे मंगळवार ८ एप्रिल रोजी दुपारी १.३०च्या सुमारास अल्पशा आजाराने दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. अजंठा ट्रेडर्सचे (फार्मास्युटिकल वितरक) ते संचालक होते. मोदी विद्युतदाहिनीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापुर, सोलापूर यांचे समोर**
सोलापुर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित सोलापुर
सिटी सर्व्हे नं. ८४१३, कुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापुर ४१३००३

जा क्र/उप/७६/२०२५ — दि.०८.०४.२०१५

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापुर** -- **अर्जदार**

**विरुध्द**
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद)** -- **जाब देणार**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ४९७/२०२५ | ६८७८६५/- | २ | २. श्री. लोंढे अजय अरूण<br>रा. गणेश विठ्ठल मंदीरजवळ विभाग १ घर क्र आर १५ अवंतीनगर मुरारजी पेठ सोलापूर |
| २ | ४९८/२०२५ | १४७८७५/- | १<br>२<br>३ | १. सुतार चंदकाल विठ्ठल<br>रा. ११८/२ माशाळे नगर विजापुर रोड जि. सोलापूर<br>२. श्री. लाड रविंद्र चंद्रकात<br>रा. माशाळे नगर विजापुर रोड जि सोलापूर<br>३ तांबोळी समिना मोतिलाल<br>रा गरिबी हटाव झोपड पट्टी २ घर ५०८ विजापुर रोड सोलापुर |
| ३ | ५००/२०२५ | ४०९९५१/- | १<br>३ | १. सौ सहकर्जदार वनिता संतोष पाटील<br>रा. रा. १८७, १८८ जानकी नगर जुळे सोलापुर<br>३. श्री शंकर सिद्रमप्पा कोळी<br>रा. हनुमान मंदिर गुडडेवाडि ता अक्कलकोट जि सोलापुर |
| ४ | ५०१/२०२५ | १३४४१२/- | २ | २ श्री संदिप बलभिम पंडित<br>रा. सुंदरम नगर विजापुर रोड सोलापुर |
| ५ | ५०३/२०२५ | १४५५१४/- | १<br>३ | १ श्री राहुल बाळु लोखंडे<br>रा. प्लाट नं ३४ कुमार स्वामी नगर शेळगी सोलापुर<br>३ श्री दिगंबर ज्ञानदेव कांबळे<br>रा बरळेगाव ता द सोलापुर जि सोलापुर |
| ६ | ५०४/२०२५ | ६३६४७८/- | ४ | ४. श्री. अंकुश श्रीगम प्रकाश<br>रा प्लाट नं २२ पाटील नगर बाळे सोलापुर |
| ७ | ५०५/२०२५ | २५००२८/- | १<br>२<br>३ | १ श्री जकीकोरे सिध्देश्वर रामचंद<br>रा प्लाट नं ४२ चिराग रेसिडेन्सी दयानंद कॉलेज जवळ सोलापुर<br>२ श्री साळुके अजित तात्यासाहेब<br>रा. १२९ रतमंजुरी नगर जुळे जि सोलापुर<br>३ श्री पाटील प्रमोद जयपाल<br>रा मार्डी ता उ सोलापुर सोलापुर |
| ८ | ५०६/२०२५ | ५६४७५८/- | १<br>२<br>३ | १. श्री पंडीत रत्नदीप नागेंद्र<br>रा प्लाट नं २१२ पापाराम नगर विजापुर रोड सोलापुर<br>२. श्री नायब नितीन मोहनराव<br>रा. कासार बालकुंड ता. निलंगा, जि. लातूर<br>३ श्री चौधरी शशिकांत पांडुरंग<br>रा. व्यास नगर नळदुर्ग जि उस्मानाबाद |
| ९ | ५०७/२०२५ | ८७७४१/- | २<br>३<br>४ | २ श्री गुंडु लक्ष्मण अंबादास<br>रा ४०९ भारत रत्न इंदीरानगर सोलापुर नॉर्थ सोलापुर<br>३ श्री पगडे रमेश पंडित<br>रा १०६ विनायक नगर एमआयडीसी सोलापुर साऊथ सोलापुर<br>४ श्री कोटमाळे भागवत प्रकाश<br>रा. डी.एड कॉलेज जवळ ३१२ सुशिल नगर विजापुर रोड सोलापुर |
| १० | ५०८/२०२५ | ५०३६४/- | ३ | ३ श्री यनगंटी मोहन बालराज<br>रा २८२/३ निलमनगर श्रमजीवी नगर एमआयडीसी सोलापुर साऊथ सोलापुर |
| ११ | ५०९/२०२५ | ४७६६७/- | १<br>२ | १ सौ गोसावी रंजना रमेश<br>रा घर नं १४६ सात रस्ता सोलापुर सोलापुर नार्थ सोलापुर<br>२ श्री एडके दिपक बालाजी<br>रा प्लाट नं २१ शिवलिंग नगर एमआईडीसी रोड सोलापुर |
| १२ | ५१०/२०२५ | १६०८३४/- | १<br>२ | १ श्री गुज्जर विनायक अंबादास<br>रा ताई चौक नीलम नगर, श्रमजीवी नगर सोलापुर<br>२ श्री म्याडम नरेश श्रीनिवास<br>रा व्यंकटेशनगर मजरेवाडी सोलापुर साउथ सोलापुर |
| १३ | ५११/२०२५ | ८१५८८/- | १<br>२ | १ सौ. अभंगे कल्पना सुनिल<br>रा ज्ञानेश्वर प्रशाला जवळ ३६७ बापूजी नगर उत्तर सदर बाजार सोलापुर<br>२ श्री कंदि प्रज्वल राजेश<br>रा ६१५/१ अशोक चौक सोलापुर |
| १४ | ५१२/२०२५ | १४६८२७/- | १<br>२<br>३ | १ श्री शर्मा राकेश बाळकृष्ण<br>रा भवानी मंदिर जवळ १९३/बी राजीव गांधी नगर सोलापुर नॉर्थ, सोलापुर<br>२ श्री कादरी मोहम्मद मुनीर मोहम्मद हनीफ<br>रा १४६ गुरूवार पेठ सोलापुर नॉर्थ, सोलापुर<br>३ सौ बोरामणी ललिता मल्लिनाथ<br>रा १८२/२/२ सुनिल नगर, सोलापुर नेहर मशान दुकान सोलापुर |
| १५ | ५१३/२०२५ | १६१४२९/- | १<br>२ | १ श्री मोहसीन ईलाही जमादार<br>रा पंचशिल नगर कुमठा नाका नेयर पुजारी किराणा शॉप सोलापुर<br>२ श्री संतोष बिजु चौगुले<br>रा २१७ पाटील गल्ली बेलावटटी हुकेरी बेलगाव कर्नाटक |
| १६ | ५१४/२०२५ | १४६४२६६३/- | २ | २. सह कर्जदार श्री. बैरागी गोकुळदास रामचंद्र<br>मु. पो. आंबेचिंचोळी पो. पुळूज ता पंढरपुर जि सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळून येत नसल्याने /अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक -२२/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि.०८/०४/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

स्थळ - सोलापुर
दि - ०८/०४/२०२५

**सही/-**
**(डॉ. पी.ए.बागल)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापुर शहर सोलापुर**

**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर, सोलापूर**
सोलापूर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था नि.. सोलापूर - ४१३००३
दुरध्वनी क्र.०२१७-२६०२८४० — ईमेल-dyescitysolapurgmail.com

**जाहीर प्रकटन**

क प्रवर्गातील खाली नमुद सहकारी संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२४-२५ ते २०२८-२९ साठी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | विवेकानंद कंझुमर्स सहकारी सोसायटी लि. सोलापूर | क |
| २ | निलकंठ महिला सहकारी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | क |
| ३ | ललकार सहकारी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | क |
| ४ | सिध्देश्वर सर्व व्यवसायी ग्राहक सहकारी संस्था मर्या., सोलापूर | क |
| ५ | श्रीनिवास सर्व ग्राहक सहकारी संस्था मर्या., सोलापूर | क |
| ६ | प्रियदर्शनी महिला विडी कामगार सहकारी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | क |
| ७ | श्री. स्वामी समर्थ मागासवर्गीय महिला ग्राहक सहकारी संस्था मर्या., सोलापूर | क |
| ८ | सोलापूर जनता ग्राहक सहकारी संस्था मर्या., सोलापूर | क |
| ९ | रजनीगंधा महिला मागावर्गीय सर्व व्यवसायी सहकारी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | क |
| १० | वैष्णवीदेवी महिला सहकारी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | क |
| ११ | आर्शिवाद विविध कार्यकारी सहकारी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | क |
| १२ | निलम मागावर्गीय ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | क |
| १३ | इंदिरा सर्व व्यवसायी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | क |
| १४ | श्रीरामनगर सहकारी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | क |

**क प्रवर्गातील प्रारुप मतदार यादीचे महत्वाचे टप्पे खालीलप्रमाणे राहतील**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०९.०४.२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादी वर आक्षेप सादर करण्याचा दिनांक | ०९.०४.२०२५ ते १५.०४.२०२५ |
| ३ | प्राप्त आक्षेपावर निर्णय देण्याचा दिनांक | २१.०४.२०२५ |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द क्रण्याचा दिनांक | २१.०४.२०२५ |

संस्थेची सविस्तर प्रारुप मतदार यादी व प्रारुप यादीचा कार्यक्रम आदेश संस्थेच्या नोटीस बोर्डावर, तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा, उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर सोलापूर यांचे कार्यालय सोलापूर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था नि. सोलापूर - ४१३००३ येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**स्थळ :-** सोलापूर
**दिनांक :-** ०७/०४/२०२५

**सही/-**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर, सोलापूर**

**जाहीर समन्स**

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापुर, सोलापूर यांचे समोर**
सोलापुर जिल्हा नागरी सहकारी बॅक्स को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेडरी शाखे शेजारी, सोलापूर - ४१३००१

**कमला को-ऑप बँक. लि. सोलापूर.** -- **अर्जदार**
१४/३०, गांधी नगर, कटारे कॉम्प्लेक्स
अक्कलकोट रोड, सोलापूर - ४१३००६

**विरुध्द**
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद)** -- **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणाऱ्यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ५५४/२०२४-२५ | रु. १,३०,८७५/- | १ | श्री. जगन्नाथ सुदर्शन आडम<br>रा. १०८, गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर. |
| | | | २ | सौ. लक्ष्मी जगन्नाथ आडम<br>रा. १०८, गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| | | | ३ | श्री. श्रीनिवास सुदर्शन आडम<br>रा. १०८, गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| | | | ४ | श्री. लक्ष्मीनरसू कृष्णाहरी गुंडला<br>रा. २५६, गाळा/एम-३, म्युन्सिपल कॉलनी, रविवार पेठ. सोलापूर |
| २ | ११११/२०२४-२५ | रु. ६७,१०२/- | ३ | श्री. मंजप्पा भोजप्पा म्हेत्रे<br>रा. ३/३०, रेवणसिध्देश्वर जवळ, मोतीबाग जवळ, सोलापूर |
| ३ | ११०६/२०२४-२५ | रु. २,१०,४१७/- | १ | श्री संजय शंकर होसमनी<br>रा. हॉलीबॉल मैदान जवळ ब्लॉक नं. ४. लोखंडवाला पार्क ज्ञानेश्वर नगर जुळे सोलापूर |
| | | | ३ | श्री. विनोदकुमार बाबासाहेब शिरसे<br>रा. गौतम बुध्द विहार समोर, ३१ सिध्दार्थ नगर उत्तर सदर बझार, सोलापूर |
| ४ | १११०/२०२४-२५ | रु. ४७,९५९/- | ३ | श्री. मंजप्पा भोजप्पा म्हेत्रे<br>रा. ३/३०, रेवणसिध्देश्वर जवळ, मोतीबाग जवळ सोलापूर |
| ५ | ५५५/२०२४-२५ | रु. १,५४,७५४/- | १ | श्री. श्रीकांत सिद्राम इंजामुरी<br>रा. ४१, गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| | | | ३ | श्री. गिरीश नारायण इंजामुरी<br>रा. २१६, शशिकला नगर, देसाई नगर, सोलापूर |
| ६ | ११०८/२०२४-२५ | रु. ७१.०८५/- | १ | सौ. कल्पना जगन्नाथ मेडपल्ली<br>रा. १६२८, कुचन नगर, सोलापूर |
| | | | २ | सौ. सुवर्णा बालराज कुरापाटी<br>रा. ६०, व्यंकटेश नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर, |
| | | | ३ | श्री. अबूबकर अ. हमीद मोहोळकर<br>रा. ६५९, शास्त्री नगर, अन्सारी चौक, सोलापूर |
| | | | ४ | श्री. श्रीनिवास जगन्नाथ मेडपल्ली<br>रा. १६२८, कुचन नगर, सोलापूर |
| ७ | ११०९/२०२४-२५ | रु. ७०,६६७/- | १ | श्री. अबुबकर अ. हमीद मोहोळकर<br>रा. ६५९, शास्त्री नगर, अन्सारी चौक, सोलापूर |
| | | | २ | सौ. सुवर्णा बालराज कुरापाटी<br>रा. ६०, व्यंकटेश नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| | | | ३ | सौ. कल्पना जगन्नाथ मेडपल्ली<br>रा. १६२८, कुचन नगर, सोलापूर |
| ८ | ११०५/२०२४-२५ | रु. ६६,०६५/- | १ | श्री. आनंद मार्कंडेय निली<br>रा. एम-७६ महेश नगर, हैद्राबाद रोड, जुनी विडी घरकुल सोलापूर |
| | | | २ | श्री. अनिल मार्कंडेय निली<br>रा. एम-७६ महेश नगर, हैद्राबाद रोड, जुनी विडी घरकुल, सोलापूर |
| | | | ३ | श्री. राजेश इरण्णाप्पा कुंभार<br>रा. गणेश मंदिर, तालुका उत्तर सोलापूर कोंडी सोलापूर |
| ९ | १११५/२०२४-२५ | रु. १,९९,८८३/- | १ | श्री. उमेश प्रभाकर दोरनाल<br>रा. २२३८, एच ग्रुप, विडी घरकुल, सोलापूर |
| | | | २ | श्री अमोल रमेश सगरी<br>रा. २६०, बेगम पेठ, मारुती मंदिर जवळ, सोलापूर |
| १० | १११४/२०२४-२५ | रु. १,८३,२३१/- | १ | श्री. गोविंद प्रकाश गड्डम<br>रा. ५७९, बी ग्रुप जुना विडी घरकुल सोलापूर |
| | | | ३ | श्री. रमेश सिद्राम दासपती<br>रा. २५०, गोकुल नगर, विडी घरकुल, सोलापूर |
| ११ | १११३/२०२४-२५ | रु. २,७१,३६१/- | २ | श्री. सिकंदर बाबूलाल शेख<br>रा. २३, संजय नगर, कुमठा नाका, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पता उपलब्ध होत नसल्याने जाहीर समन्स देत आहेत.

उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि. २२/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि.०८/०४/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# विजेच्या धक्क्याने शाळकरी मुलीचा मृत्यू

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

मंगळवारी सायंकाळी विजेचा कडकडाट आणि अवकाळी पाऊस पडल्यानंतर शहरातील जुना एम्प्लॉयमेंट चौकातील कोनापुरे चाळीत विजेच्या धक्क्याने शाळकरी मुलीचा मृत्यू झाला. ही घटना रात्री ९ वाजता उघडकीस आली.



राजनंदिनी अणय कांबळे असे मरण पावलेल्या मुलीचे नाव आहे. शहर परिसरात सायंकाळी साडेसहा नंतर विजेच्या कडकडाटासह पडलेल्या अवकाळी पावसावेळी शहरातील ब-याच भागातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. यादरम्यान सुटलेल्या जोराच्या वा-यामुळे विजेच्या तारासुध्दा हलू लागल्या होत्या. अशाच एका हलत्या तारेचा स्पर्श कोनापुरे चाळीत राहत असलेल्या राजनंदिनी कांबळे या विद्यार्थिनीच्या घराच्या लोखंडी जिन्याला झाला. यातून विद्युत पुरवठा उतरला आणि राजनंदिनी हिचा स्पर्श त्या जिन्याला झाला. यानंतर तिला विजेचा जोरदार धक्का बसला आणि ती जागीच कोसळली. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी तातडीने तिला खासगी रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीचस ती मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याचे सांगण्यात आले.

# पणन संचालकांनी दिलेला निर्णय एकतर्फी

## सुनावणीत प्रतिवादींचे म्हणणे ऐकले नाही : तक्रारदार मिलिंद मुळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये आर्थिक दुर्बल घटकांमधून माजी आमदार दिलीप माने, माजी उपसभापती श्रीशैल नरोळे, सुरेश हसापुरे यांच्यासह १६ जणांविरूध्द आज पणन संचालक यांच्याकडे सुनावणी घेण्यात आली. सदरची सुनावणी घेताना तक्रारदार मिलिंद मुळे व इतर अपीलकर्त्यांचे म्हणणेच ऐकून न घेता एकतर्फी निर्णय दिला आहे. वास्तविक पाहता वादी आणि प्रतिवादी यांचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतरच, निर्णय देणे अपेक्षित होते. परंतु तसे न होता. केवळ एकतर्फी निर्णय घेऊन सदरचा निर्णय आम्हावर थोपला आहे. हा निर्णय आम्हला मान्य नसून, या निर्णयाविरोधात आम्ही उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे तक्रारदार मिलिंद मुळे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक लागली आहे. अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची छाननी करतेवेळी, तक्रारदार मिलिंद मुळे यांनी केलेल्या अपिलात शासनाने आर्थिक दुर्बल घटकांसाठी जी सवलत दिली आहे. त्यामध्ये



केवळ शिक्षण आणि नौकरीमध्ये ई.डबल्यू.एस लागू केले आहे. मग निवडणुक लढविण्यासाठी आर्थिक दुर्बल घटक हा मतदारसंघच बेकायदेशीर असल्याचे सांगत मतदारसंघ रद्द करण्यासाठी मिलिंद मुळे हे अपीलात गेले आहेत. आर्थिक दुर्बल घटकांमध्ये उमेश मळेवाडी, बसवण्णा श्वंटे, गुवराज कापले, सुनिल कळके, नागेश चांगले, इंदुमती परमानंद अलगोंडा, यतीश शहा, श्रीकांत बनशेट्टी,चांद पठाण, राहुल बनसोडे, दिपक राजमाने आर्दीच्या विरोधात अपील करण्यात आले आहे. या मतदार संघासाठी ज्यांचे उत्पन्न आठ लाखाच्या आत असणे अपेक्षित आहे. पाच एकर शेत आणि शिवाय एक हजार स्वेवअर फुटाची जागा असणे, देखील आवश्यक आहे. असा असताना अनेक उमेदवारांचे उत्पन आठ लाखांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे बाजार समितीचे थकबाकी आणि आठ लाखाच्या वरील उत्पत्र असणारे आर्थिक दुर्बल घटकांत बसतातच कसे? असा सवाल यावेळी मुळे यांनी उपस्थित केला आहे.

पुणे येथील पणन संचालक कार्यालयात पणन संचालक रसाळ आणि उप संचालक निंबाळकर यांच्या सामोर यासंबंधी सुनावणी घेण्यात आली. यावेळी दोन्ही बाजूचे वकील उपस्थित होते. माजी सभापती दिलीप माने,सुरेश हसापुरे यांच्या वकिलांनी आपली बाजू मांडली. त्यानंतर नियमाने अपीलकर्त्यांचे बाजू मांडण्यासाठी वेळ न देताच सुनावणी पूर्ण करण्यात आली. सदरची सुनावणी देताना आपली बाजू समजून न घेता एक बाजू निर्णय देण्यात आला आहे. सदरची सुनावणी अमान्य असून सुनावणीची प्रत घेऊन त्वरित उच्च न्यायालयात अपील करण्यात येणार आहे. असे मुळे यांनी यावेळी सांगितले.

### एक दिवसानंतर सुनावणी घेण्याचे आश्वासन

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये निवडणूक लढू इच्छित असणाऱ्या उमेदवारांनी अनधिकृत रित्या ई डब्ल्यू एस संवर्गाचा वापर केला आहे. आर्थिक दुर्बल घटकांतर्गत अर्ज दाखल केले आहेत. परंतु केवळ शैक्षणिक आणि नोकरीसाठी आर्थिक दुर्बल घटक लागू होतो. निवडणुकीसाठी ई डब्ल्यू एस लागू होत नाही. राज्य शासनाने तसा जीआर काढलेला आहे. तरी देखील निवडणूक निर्णय अधिकारी तसेच निवडणूक अधिकाऱ्याने संबंधित उमेदवारांचे अर्ज बाद केले नाहीत. या विरोधात अपील केले आहे. परंतु सुनावणीवेळी कोणतेही युक्तीवाद ऐकून न घेता निर्णय दिल्याने, उच्च न्यायालयात जाणार असल्याचे सांगितल्यानंतर एक दिवसानंतर सुनावणी घेऊ असे आश्वासन पणन संचालक रसाळ यांनी दिले आहे. त्यानंतर उच्च न्यायालयात अपील करायचे किंवा नाही हे ठरवू.

**- मिलिंद मुळे, तक्रारदार**

# कॉलेज कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणे धुलाई भत्ता द्या

● कॉलेज कर्मचारी युनियनची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ८ एप्रिल -**

राज्यातील सर्व महाविद्यालयीन व विद्यापीठातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना २५० रुपये प्रमाणे धुलाई भत्ता मिळत होता. तो विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयाने अचानक बंद करून ५०रुपये केला आहे. तो पूर्वीप्रमाणे मिळावा, अशी मागणी कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, खजिनदार राहूल कराडे, उपाध्यक्ष आनंद व्हटकर व सिनेट सदस्य ए.बी. संगवे यांनी केली आहे.

ऑक्टोंबर २०२४ पासून दरमहा वेतनात या कर्मचाऱ्यांना ५० रुपयेवरून २५० रुपये धुलाई भत्ता मिळत होता. परंतु मार्च २०२५ पासून तो बंद करण्याचा फतवा येथील विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयाने काढला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मार्च २०२५च्या वेतनासही विलंब झाला आहे. याबाबत विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयास संपर्क साधला असता हा निर्णय फक्त शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असल्यामुळे तो बंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

### युनियन आंदोलन छेडणार : दत्ता भोसले



शासनाच्या सर्व विभागातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना २५० रुपये धुलाई भत्ता मिळतो. मग महाविद्यालय व विद्यापीठ कर्मचाऱ्यावर अन्याय का? हा भत्ता पूर्ववत न झाल्यास याविरुद्ध आंदोलन छेडण्यात येईल, असा ईशारा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले यांनी दिला आहे.

# वाढत्या महागाईच्या निषेधार्थ शासनाच्या विरोधात संभाजी ब्रिगेडचे निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल -**

नरेंद्र मोदी आणि भाजप सरकारने अच्छे दिनचे स्वप्न दाखवून सत्ता काबीज केली. पण गरिबांना दिवसेंदिवस महागाईचा सामना करावा लागत आहे. पेट्रोल डिझेलनंतर नुकतीच गॅसच्या दरात वाढ केल्यामुळे जनता महागाईत होरपळून निघत आहे त्यामुळे संभाजी ब्रिगेडच्या वतीने चार हुतात्मा चौकामध्ये महागाईच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी अच्छे दिन अच्छी महंगाई या सरकारचे करायचे काय खाली मुंडी वर पाय. वा रे मोदी तेरा खेल, सस्ती दारू महंगा तेल. अशा घोषणा देण्यात आल्या.




पेट्रोल डिझेल गॅस सोबतच सर्व जीवनाशक वस्तूंची किमती वाढल्या आहेत सामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. सर्वसामान्यांचे स्वयंपाक घरातील बजेट यामुळे बिघडणार आहे परिणामी महिलांमध्ये सरकार विरोधात पुन्हा एकदा नाराजी निर्माण झाली असून लाडक्या बहिणी दुखावल्या आहेत.

एकीकडे सरकार श्रीमंत आमदार खासदारांचे २५ टक्के पगार वाढ करते आणि गोरगरिबांना महागाईच्या खाईत लोटत आहे एकिकडे आणि आदणी अंबानी सारख्या उद्योगपतींचे लाखो कोटीचे कर्ज सरकार माफ करून सर्वसामान्य जनतेकडून वाढीव कर लावून जनतेची लुट करीत आहेत असा आरोप संभाजी ब्रिगेड च्या वतीने करण्यात आला.यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, शहराध्यक्ष मोनाली धुमाळ, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, शहर कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख, शहर सचिव सिद्धाराम साबळे, शहर उपाध्यक्ष रमेश भंडारे, शहर उपाध्यक्ष संतोष सुरवसे, प्रसिद्धी प्रमुख सिद्धार्थ राजगुरू, शहर उपप्रमुख फिरोज सय्यद, वकील आघाडीचे जिल्हाप्रमुख गणेश कदम, दिलीप निंबाळकर, अभिषेक जहागीरदार, राजनंदनी धुमाळ, शहर कार्याध्यक्ष जयश्री जाधव, शहर उपाध्यक्ष मनीषा कोळी आदी उपस्थित होते.



# भाजपा धोरणांस अनुसरून चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराचं काम : काळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

आपुलकीचं नातं आणि सामाजिक बांधिलकी जपत अनेक समाजपयोगी कार्य चन्नवीर चिट्टे मित्र परिवार करत असतो याचा खूप आनंद आहे. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी न चुकतां भाजपा स्थापना दिनी पाणपोई सुरू करण्याची परंपरा याहीवर्षी जपली. भाजपाला लोकसेवेचा वारसा आहे आणि तोच वारसा चन्नवीर चिट्टे मित्र परिवार चालवत आहे, असे उद्गार भाजपाचे शहर अध्यक्ष नरेन्द्र काळे यांनी काढले.

चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने भाजपा स्थापना दिनी सुरू करण्यात आलेल्या पाणपोईच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यात्मिक गुरू मा. अण्णाराव महाराज होते. यावेळी भाजयुमो प्रदेश सचिव अक्षय अंजिखाने, शहर उपाध्यक्ष अनिल कंदलगी, ओबीसी आघाडी शहर अध्यक्ष राम वाकसे, सागर अतनुरे, विजय कटके, हॉटेल व्यावसायिक नितीन शेजूळ, व्यापारी श्रीनिवास कणकी, अमित बोगा, सतीश कंटीकर, नागेश जोगधंकर, मयुर लंगोटे, अंबादास चिरलंची यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कल्याण करजगी, पप्पू क्षीरसागर, श्रीनिवास दासरी, गुरूनाथ कोळी, किरण वल्लाल, सद्दाम कोसगीकर, महेश हलसगी, रवि शहापूरकर, रेवणसिद्ध बिराजदार, ओम जमादार, राहुल गंगशेट्टी, सोमनाथ कलशेट्टी यांनी परिश्रम घेतले.



# सिंहगड अभियांत्रिकीमध्ये आरोग्य दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

आरोग्याबाबत जागरुक राहूया, निरोगी आणि स्वस्थ जीवनाचा निर्धार करूया या उद्देशातून केगाव येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात माफक दरात दोन दिवसीय रक्त तपासणीसह विविध तपासण्या करुन आरोग्य दिन साजरा केला. जागतिक अरोग्य दिनाच्या अनुषंगाने सिंहगड महाविद्यालयात कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या संकल्पनेतून प्राचार्य डॉ. शंकर नवले आणि राष्ट्रीय सेवा योजनाचे प्रा. एम. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्त तपासणी शिबीर घेण्यात आले.

शिबिराचे आयोजन प्रीझम क्लिनिकल लॅब सोलापूरचे चालक महेश गंभिरे आणि लुपिन डायग्नोसिस यांच्या सहकार्याने करण्यात आले. शिबिराद्वारे कर्मचाऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना रक्त तपासणीवर ४० टक्के सवलत देण्यात आली. शिबिराचे प्रमुख उद्दीष्ट कर्मचाऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या आरोग्याचे मापदंड जाणून घेण्याची संधी देणे होते. या शिबिराच्या माध्यमातून किमान खर्चात व्यक्तींचे आरोग्य तपासता येते. ज्यामुळे ते भविष्यातील आरोग्याच्या समस्यांवर योग्य वेळी उपाययोजना करू शकतात. शिबिरास प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी मार्गदर्शन केले. शिबिराचे समन्वयक, प्रा. एम.टी. शिंदे आणि चेतन महेत्रे यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आपल्या मेहनतीने योगदान दिले. यावेळी एनएसएस स्वयंसेवकांनी शिबिराला उत्स्फूर्तपणे मदत केली. फास्टिंग ब्लड शुगर, कॅल्शियम, सीबीसी, थॉयराड, व्हिटॅमिन डी, बी १२ तपासणीसह विविध माफक दरात तपासणी केल्या.

# गाडी लावण्याच्या कारणावरून वाद; सात जणांवर गुन्हा


**बार्शी, दि. ८ एप्रिल-**

येथील मंगळवार पेठ टेकडी भागात एक विचलित करणारी घटना समोर आली आहे. लॉन्ड्री व्यवसाय करणारे राजू दत्तात्रय वाघमारे (वय ५२, रा.येडाई विहीरीजवळ, ताडसौंदणे रोड, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सातजणांविरुद्ध धमकी, मारहाण आणि दुकानाचे नुकसान केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

दि. ३० मार्च २०२५ रोजी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास वाघमारे आपल्या लॉन्ड्री दुकानात काम करत असताना रहेमान गनी सौदागर यांनी त्यांची मोटारसायकल दुकानासमोर लावली होती. वाघमारे यांनी गाडी बाजूला लावण्याची विनंती केल्यावर, सौदागर यांनी अर्वाच्च भाषेत बोलून वाद घालण्यास सुरुवात केली. यानंतर त्यांच्या सोबत आलेल्या सहाजणांनी मिळून वाघमारे यांना धमकी दिली व त्यांच्या दुकानात घुसून कपडे अस्ताव्यस्त फेकून नुकसान केले. झटापटीत वाघमारे यांच्या खिशातील ४००० रुपये गहाळ झाले असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी प्रथम वाघमारे यांनी घाबरलेल्या अवस्थेत चार जणांविरुद्ध तक्रार दाखल केली होती. मात्र, मानसिक धक्क्यातून सावरल्यानंतर त्यांनी एकूण सात आरोपींची नावे पुन्हा स्पष्ट केली असून यामध्ये रहेमान गनी सौदागर, राजु मुनाफ सौदागर, समीर उस्मान सौदागर, फरान राजु सौदागर, जुनेद अब्दुल रजाक, जमील उस्मान सौदागर तसेच रहेमानचा मुलगा यांचा समावेश आहे.

# मडकी वस्ती येथे उड्डाणपुलाचे काम सुरु करण्याचे टार्गेट

● सर्व्हिस रोडचे काम झाले सुरू; महामार्ग प्राधिकरणाची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

सोलापूर शहराच्या नजीक असलेल्या बाळे जवळील मडकी वस्ती येथे नवीन उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम वर्षभरात पूर्ण करण्याचे लक्ष असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिली आहे.

पुलामुळे दोन्ही बाजूला सर्विस रोड करण्यात येत आहे सर्विस रोड नसल्याने वारंवार अपघात होत आहेत. त्यामुळे ही बाब लक्षात घेऊन सर्व्हिस रोड बनवण्यात येत आहेत. दरम्यान प्राधिकरणाच्या सर्वेत अपघाताची बाब समोर आल्याने येथे सर्विस रोड तयार करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. बाळेकडे जाण्यास जुना पुणे नाकापासून सर्विस रोड उपलब्ध होणार आहे. या रस्त्याचा फायदा बाळे शिवाजीनगर बार्शी रोड आहिल्यादेवी होळकर विद्यापीठ कडे जाणाऱ्या वाहनधारकांना फायदेशीर ठरणार आहे. येथे रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी पूल करण्यात आला आहे. मात्र त्याचा फारसा वापर होत नाही. याशिवाय तेथे मुख्य रस्ता आहे. सर्विस रोड नसल्याने किरकोळ अपघात होत होते. त्यामुळे यावर उपाययोजना म्हणून सर्विस रोड तयार करण्याचे प्राधिकरणाने ठरवले आहे. त्यानुसार त्याचे कामकाज सुरू करण्यात आले आहे.

एका बाजूस ७.५ व दुसऱ्या बाजूस ७.५ असे १५ मीटर रुंद अस दोन्ही बाजूस एक लेन सर्विस रोड तयार होईल. हे काम पुढील वर्षापर्यंत पूर्ण होणार आहे. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज चौका जवळील पुलाजवळ काम सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्विस रोड पूर्णपणे वापरात येऊन परिणामी अपघात कमी होणार आहे.

### या कामाचे सर्वेक्षण करण्यात आले होते

बाळे या सर्विस रोडचे सर्वेक्षण झाले होते. त्याचा अहवाल देखील देण्यात आला होता त्यानुसार कोणाचे काम करण्यात येत आहे मुख्य कार्यालयामार्फत याबाबत प्रक्रिया राबवण्यात आली आहे. लवकरच उड्डाणपुलाचे काम हाती घेण्यात येईल.

**- राकेश जवादे,** सहाय्यक संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण.

# हलगट चित्रपट १८ एप्रिलला प्रदर्शित

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

मराठी चित्रपटसृष्टीत वेगळ्या धाटणीच्या कथांची उणीव असताना एक वेगळी, थरारक आणि हटके कथा घेऊन कर्नन फिल्म्स प्रोडक्शनचा नवा चित्रपट हलगट १८ एप्रिल २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. हा चित्रपट गावाबाहेरच्या एका धोकादायक समुदायाची कथा उलगडतो.


या टोळीचा क्रूर प्रमुख आणि त्याच्या विरोधात उभा राहणारा बंडखोर या संघर्षाच्या छायेत एक नाजूक प्रेमकथा फुलते. लुटीचा खेळ, विश्वासघात, आणि सुटकेच्या प्रयत्नात सगळं काही बदलत जातं. शेवटी जे घडतं ते धक्का देणारं असतं, पण ते खरंच शेवट असतो का, की फक्त एका नव्या प्रवासाची सुरुवात? उत्तर अनुत्तरित राहतं... हलगटची कथा जितकी जोरदार आहे, तितकंच त्याचं संगीतही प्रेक्षकांच्या मनाला भिडणारं आहे. चित्रपटात वेगवेगळ्या भावनांना उजाळा देणाऱ्या गाण्यांची मालिका आहे.

# पूर्व वैमनस्यातून पती-पत्नीवर गोळीबार

▶▶ मोहोळ तालुक्यातील येवती-रोपळे रस्त्यावरील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.८ एप्रिल-**

पूर्व वैमनस्यातून जीवे मारण्याच्या उद्देश्याने पती-पत्नीवर गोळीबार केल्याची घटना येवती (ता.मोहोळ ) येथे मंगळवार ता ८ एप्रिल रोजी अंदाजे दुपारी १२ वाजता येवती- रोपळे रस्त्यावर घडली.





शिवाजी कुंडलीक जाधव (वय ६५ ) व सुरेखा शिवाजी जाधव अशी गोळीबारात जखमी झालेल्या पती पत्नीची नावे आहेत. दरम्यान त्यांना उपचारासाठी पंढरपूर येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले असून, श्रीमती सुरेखा जाधव यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. दरम्यान गोळीबार करणारा दशरथ केराप्पा गायकवाड हा संशयित ३०७ च्या गुन्हयातील फरार आरोपी असून त्याच्या शोधासाठी एक अधिकारी व १० कर्मचाऱ्यांचे पथक रवाना करण्यात आले असल्याचे मोहोळचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी सांगितले.

घटना स्थळाला जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी भेट देऊन तपासा बाबत काही महत्त्वाच्या सूचना दिल्या असल्याचे माहिती मोहोळचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी दिली. पोलिसां कडून मिळालेल्या माहिती नुसार, शिवाजी कुंडलीक जाधव व सुरेखा जाधव हे पती-पत्नी मंगळवारी एकादशी निमित्त पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी गेले होते. ते दर्शन आटोपून येवती कडे येत असताना येवती- रोपळे रस्त्यावर ते आले असता दशरथ गायकवाड याने त्या पती-पत्नीवर गोळ्या झाडल्या. त्यात ते दोघेही जखमी झाले. त्यांना तातडीने पंढरपूर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून सुरेखा गायकवाड यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. गोळीबार होताच येवती रोपळे रस्त्यावर जागोजागी जिवंत काडतुसे व दोन मॅक्झिन पोलिसांना मिळून आल्या. दरम्यान घटना स्थळावर ठसे तज्ञ तसेच श्वान पथकालां पोलिसांनी पाचारण केले होते. घटना स्थळावर पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे, एलसीबी चे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, पंढरपूरचे पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर मोहोळ व पंढरपूर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे अधिकारी, पोलीस कर्मचारी उपस्थित होते. उशिरा पर्यंत फिर्याद घेण्याचे काम सुरू होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## टाकळी ते सोलापूर जलवाहिनीला गळती

### शहराचा पाणीपुरवठा आजपासून एका रोटेशनसाठी पाच दिवसाआड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल -**

टाकळी ते सोलापूर दरम्यानची मुख्य पंपिंग लाईन टाकळी पंपहाऊस जवळ जलवाहिनीला लागलेली गळती दुरुस्ती कामामुळे शहराचा पाणी पुरवठा दि. ९ एप्रिल २०२५ पासून एक रोटेशनसाठी चार दिवसाआड ऐवजी पाच दिवसाआड करण्यात येणार आहे. सोलापूर शहरासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या टाकळी ते सोलापूर दरम्यानची मुख्य पंपिंग लाईन टाकळी पंपहाऊस जवळ नादुरुस्त होऊन पाण्याची गळती होत असल्याने दुरुस्तीचे काम सोलापूर महानगरपालिका मार्फत दि. ८ एप्रिल २०२५ रोजी हाती घेण्यात आले आहे.

दुरुस्तीच्या कामास बराच कालावधी लागणार असल्याने तसेच बुधवार दि. ९ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य महावितरण मंडळाकडून त्यांच्याकडील देखभाल दुरुस्तीच्या कामाकरीता शटडाऊन घेण्यात येणार असल्याचे कळविले आहे. त्यामुळे शहरातील विविध ठिकाणच्या पंपिंग स्टेशनला विद्युत पुरवठा होणार नाही. या कारणांमुळे सोलापूर शहराचा पाणी पुरवठा दि. ९ एप्रिल २०२५ पासून एक रोटेशनसाठी चार दिवसाआड ऐवजी पाच दिवसाआड करण्यात येणार आहे. सोलापूर शहराचा पाणीपुरवठा उशिरा, कमी वेळ व कमी दाबाने होईल. तरी नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी केले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

**महत्वाचे...**

### पाणी भरण्याच्या कारणावरून मुलाकडून आईला मारहाण

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

पाणी भरण्याच्या कारणावरून मुलाकडून आईला मारहाण करण्यात आली. महादेवी रेवणसिध्द पुजारी (वय ६०, रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. ८ एप्रिल रोजी सकाळी आठच्या सुमारास राहत्या घरी पाणी भरण्याच्या कारणावरून मुलगा श्रीशैल पुजारी याने महादेवी पुजारी यांना बुटाने व हाताने मारहाण करून जखमी केले. त्यामुळे महादेवी यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### कुत्रा आडवा आल्याने पडून दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

कुत्रा आडवा आल्याने पडून दुचाकीस्वार जखमी झाला. माईन महिबूब बेलिफ (वय ४३, रा. भिमाशंकर नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ६ एप्रिल रोजी रात्री साडेआकराच्या सुमारास माईन बेलिफ हे पाथरूट चौक येथून राहत्या घरी दुचाकीवरून जात होते. त्यावेळी नई जिंदगी येथील सितारा चौकात दुचाकीसमोर कुत्रा आडवा आल्याने त्यात दुचाकी स्लीप होऊन खाली पडल्याने बेलिफ यांच्या डोक्यास मार लागला. त्यामुळे बेलिफ यांना ८ एप्रिल रोजी सकाळी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### तरूणास चाकू व लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

बहिणीला का छेडला असे विचारले असता ६ ते ७ जणांनी मिळून तरूणास चाकू व लोखंडी रॉडने मारहाण केली.अजित विजय माने (वय २०, रा. होटगी स्टेशन, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ८ एप्रिल रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास होटगी स्टेशन शिवारातील सलगर वस्ती जवळ असताना अजित माने याने बहिणीला का छेडता असे विचारले असता अभिषेक बनसोडे, अमोल वाघमारे व इतर ६ ते ७ जणांनी मिळून चाकूने व लोखंडी रॉडने अजित यास मारहाण केली. यामध्ये अजित याच्या पाठीला, कपाळाला मार लागल्याने त्यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# एआय तंत्राची पंढरपुरात चाचणी


- वारीतील गर्दीचे होणार व्यवस्थापन
- प्रत्येक सोहळ्यात एआयचा वापर होणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.८ एप्रिल -**



महाराष्ट्राचे आराध्यदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येतात. आषाढी, कार्तिकी, चैत्री, माघी या चार प्रमुख यात्रेला तर लाखो भाविक पंढरीत दाखल होतात. या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार असून या एआय तंत्रज्ञान वापराबाबतची चाचणी मंगळवारी दि.८ एप्रिल रोजी चैत्री एकादशी दिवशी पंढरपूर बसस्थानक येथून घेण्यात आली.

यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात प्रामुख्याने चंद्रभागा वाळवंट, नदीपात्र , भक्ती सागर परिसर, मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रदक्षिणा मार्ग या भागात वारकरी- भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. वारीत या गर्दीच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या एआय तंत्रज्ञानाची चाचणी आज पंढरपूर येथील बसस्थानक येथून घेण्यात आली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय.पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या




दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपूरात एक कोटीहून अधिक भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानांच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात. यात्रा काळात भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे, कुठेही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी प्रशासनाकडून एक महिना अगोदरच तयारी केली जाते.

आता प्रत्येक वर्षी होणाऱ्या सोहळ्यात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ए.आय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार आहे. एआय या तंत्रज्ञानाव्दारे गर्दीचे प्रमाण, गर्दीची घनता मोजता येणार आहे. चेहऱ्याच्या ओळखीद्वारे हरवलेली अथवा मदतीची गरज असलेले लोकांची माहिती, ऑब्जेक्ट शोधणे त्यांच्या हालचालींचे विश्लेषण देखील करता येईल. गर्दीची वाढलेली घनता लक्षात येताच तत्काळ सूचना मिळेल व त्या ठिकाणी सुरक्षेबाबत उपाययोजना राबवता येतील अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी दिली.

वारी कालावधीतील गर्दीच्या व्यवस्थापना बाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या एक वर्षापासून प्रशासनातील अधिकारी एआय तंत्रज्ञानाच्या वापराबाबत संशोधन करीत होते. त्याबाबतची चाचणी आज घेण्यात आली.एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार असून, एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने गर्दी मोजणे, व्यवस्थापन करणे सोपे होणार असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी सांगितले.

## मुलींना पैशाचे आमिष दाखवून लैंगिक छळ

- वृध्दाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल -**

शाळकरी मुलींना पैशाचे आमिष दाखवून त्यांचा लैंगिक छळ करणाऱ्या वृध्दाविरुध्द पोक्सो कायद्यानुसार सोलापुरातील जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यलप्पा कुंचीकोरवे (वय ६८, रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे आरोपीचे नाव आहे. शहरातील एका प्रसिध्द शाळेतील तीन मुलींना ७ एप्रिल रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास यल्लप्पा कुंचीकोरवे याने शाळे समोरील एका बोळात बोलावून त्यांना पैशाचे आमिष दाखवून घरी येण्यास सांगितले. त्यावेळी कुंचोकोरवे याने त्या मुलींसमोर त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. म्हणून याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

## शहर व जिल्ह्यात घडल्या तीन आत्महत्या करण्याच्या घटना

- दोघाने गळफास, एकाने विषारी औषध प्राशन केले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

शहर व जिल्ह्यात तीन आत्महत्या करण्याच्या घटना घडल्या आहेत. शहरातील अक्कलकोट रोडवरील कल्पना नगर येथे तरूणाने दुसऱ्या घटनेत जुळे सोलापुरातील अंबर हॉटेलजवळ एकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. तिसऱ्या घटनेत बाबळगाव (ता. पंढरपूर) येथे पत्नीसोबत वाद झाल्याने पतीने आत्महत्येचा प्रयत्न केला आहे.

**कल्पना नगर :** शहरातील अक्कलकोट रोडवरील कल्पना नगर येथे तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. अंबालाल अंबादास हकीम (वय ३८) असे आत्म हत्या केलेल्याचे नाव आहे. ८ एप्रिल रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास राहत्या घरी घराच्या पत्र्याच्या वाशाला साडीच्या सहाय्याने अंबालाल याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्याने नातेवाईकांनी अंबालाल यांस खाली उतरवून एमआयडीसी पोलिस ठाण्यातील हवालदार डी जी नवले यांनी बेशुध्दावस्थेत हकी यांस उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतिक माने यांनी हकीम यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

**जुळे सोलापूर :** जुळे सोलापुरातील अंबर हॉटेलजवळ एकाने गळफास घेऊन आत्महत्या केली.उदयसिंह माधोसिंह (वय ४२, रा. उमरेठा, आग्रा, उत्तर प्रदेश सध्या रा. जुळे सोलापूर, अंबर हॉटेलजवळ, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. ८ एप्रिल रोजी सकाळी साडेआकराच्यासुमारास उदयसिंह याने अज्ञात कारणावरून राहत्या घरी पत्र्याच्या लोखंडी पाईपला मंडपाच्या कपड्याच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी उदयसिंह यांस खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतिक माने यांनी उदयसिंह यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

**पत्नीसोबत वाद झाल्याने पतीचा आत्महत्येचा प्रयत्न**

पत्नीसोबत वाद झाल्याने पतीने आत्म हत्येचा प्रयत्न केला.अंबादास बबन पाटोळे (वय ३१, रा. बाबळगाव, ता. पंढरपूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. ७ एप्रिल रोजी सायंकाळी अंबादास पाटोळे हे म्हैसगाव येथे त्यांच्या बायकोला आणण्यासाठी त्यांच्या घरी गेले होते. त्यावेळी तिथे बायकोसोबत त्यांचा वाद झाल्याने त्या रागाच्या भरात त्यांनी विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे अंबादास यांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## विद्यापीठाच्या नवीन इमारतीकडे जाणारा रस्ता १५ मेपर्यंत पूर्ण करा

- विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**



विद्यापीठ क्षेत्राच्या चारही बाजूस वनविभागाचे आरक्षण असल्याने येण्या-जाण्यासाठी रस्ता बांधण्यासंदर्भात अडचणी निर्माण झाल्या आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी येत्या आठ दिवसात वनविभाग, महसूल आणि विद्यापीठ अधिकारी यांच्याशी समन्वयातून कार्यअहवाल तयार करावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळा निर्मितीचे कार्य कोणत्याही परिस्थितीत १५ मे २०२५ पर्यंत पूर्ण व्हावे तसेच ८०/२० सूत्रानुसार विद्यापीठातील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, असे निर्देश सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संदर्भातील प्रश्नांसंदर्भात मंगळवारी मुंबईत महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थित उच्चस्तरीय बैठक विधान भवन मुंबई येथे होऊन त्यात हे महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३००वी जयंती ३१ मे रोजी आहे. या संदर्भातील उपक्रम आणि कामे वेळेत पूर्ण व्हावीत असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.




**असे झाले निर्णय; १५ मेपर्यंत मुदत**

विद्यापीठाच्या नवीन इमारतीकडे जाणारा रस्ता पुर्ण करा. विद्यापीठातील रिक्त पदेही तातडीने भरण्याचा प्रस्ताव सादर करा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे काम आणि विद्यापीठ इमारत पूर्ण करा.

जन्म त्रिशताब्दी निमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण होणे अपेक्षित आहे. या बैठकीत याबाबत चर्चा झाली. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी रस्त्याचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टिने वनविभागाच्या अटी - शर्ती नुसार पुढील एक महिन्याच्या आत कार्यवाही पूर्ण व्हावी तसेच अपेक्षित कार्यवाहीच्या दृष्टिने जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधित घटकांशी चर्चा-समन्वय करुन आठ दिवसाच्या आत प्रस्ताव सादर करावा आणि पुढील कार्यवाही पूर्ण करावी, असे यावेळी सभापती प्रा. शिंदे आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री पाटील यांनी आदेशीत केले. बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, वनविभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कुलगुरु प्रा.प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे, दूरदृष्यप्रणालीद्वारे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्यासह तीनही विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## उत्तर प्रदेशचा हाय प्रोफाईल घरफोड्याचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

### विमानाने फिरून करायचा घरफोड्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल -**





उत्तर प्रदेशमधून सोलापुरात येऊन दिवसा घरफोडया करणारा, विमानाने प्रवास करणारा, हाय प्रोफाईल घरफोड्या करणारा आरोपी अनिलकुमार राजभर याचा जामीन अर्ज न्यायदंडाधिकारी श्रीमती मर्डेकर यांनी फेटाळला.

अनिलकुमार मिस्त्रीलाल राजभर (वय ३८, रा. बोदरी, ता. केराकत, जि. जौनपूर, उत्तरप्रदेश) असे जामीन अर्ज फेटाळलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. याबाबत कादर राजूमियाँ शेख (वय ५०, रा. फ्लॅट नं. ६०२, सेंटर पार्क अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

११ मार्च रोजी कादर शेख यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने १० तोळ्याचे सोन्याचे दागिने, १० तोळे चांदीचे दागिने व रोख रक्कम असा २ लाख ७१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. या गुन्ह्याचा तपास करताना शहर गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर यांनी तांत्रिक बाबींचा अभ्यास करून दिवसा घरफोडी करणार रेकॉर्डवरील सराईत हायप्रोफाईल गुन्हेगार अनिलकुमार राजभर यास अटक केली. त्याच्याकडून पोलिसांनी ११० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ११३ ग्रॅम चांदीचे दागिने असा ३ लाख १९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

गुन्ह्याच्या तपासकामी न्यायालयाने राजभर यास पोलिस कोठडी सुनावल्यानंतर पोलिसांनी तपास केला असता अनिल राजभर याच्यावर महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात राज्यात यापूर्वी दाखल असलेल्या ३५ गुन्ह्यांची माहिती संकलित केली. तसेच मुंबई व नवी मुंबई येथील न्यायालयाने राजभर यास ७ गुन्ह्यांमध्ये दिलेल्या शिक्षेबाबतची माहिती संकलित करून न्यायालयात सादर केली. राजभर याने जामीनासाठी केलेल्या अर्जाच्या सुनावणीवेळी ही सर्व माहिती न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिल्या. त्यामुळे न्यायदंडाधिकारी श्रीमती मर्डेकर यांनी राजभर याचा जामीन अर्ज फेटाळला.

न्यायालयीन कामकाजात सरकारी वकिल श्रीमती अनघा लिंबाळे, ॲड. श्रीमती मुनजरीन जेलर, पोलिस अमंलदार संदीप जावळ, मल्लिनाथ रूपनर, हनुमंत नलवडे यांनी सहकार्य केले.

## बुबणे चाळीत पाणीपुरवठा विस्कळीत; आठ दिवसांनी टँकरद्धारे पाणीपुरवठा

- नागरिक हवालदिल; शहरात पसरली पाणीबाणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

शहराच्या प्रमुख भागात पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने मोठ्या प्रमाणात पाणीबाणी निर्माण झाली आहे. शहराच्या हद्दवाढ भागात नेहमीच पाण्याची बोंबाबोंब असते. मात्र शहरातील स्टेशन परिसरातील बुबणे चाळीत पाण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून बोंबाबोंब सुरू आहे. येथे नळाला पाणीच येत नसल्याने नागरिक हवालदील झाले आहेत. वैतागलेल्या नागरिकांनी आयुक्तांच्या दालनासमोर ठिय्या मांडला. त्यानंतर टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला.

यंदाचा उन्हाळा चटका लावून जाणारा ठरत आहे. तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिक अगोदरच हैराण झालेले आहेत. अशा स्थितीत शहराचा पाणीपुरवठा गेल्या अनेक दिवसांपासून विस्कळीत झाला आहे विस्कळीत झालेल्या




सोलापूर : पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने चिमुकल्यांसह आबालवृद्धांनी पाणी भरण्यासाठी एकच धावपळ केल्याचे दिसून आले.

पाणीपुरवठ्यामुळे नागरिक परेशान झाले आहेत. शहरातील मुख्य परिसरातच पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांच्या घशाला कोरड पडली आहे. शहरातील एसटी स्टँड परिसर, शिंदे चौक, स्टेशन परिसर, मोदी, बुमणे चाळ, जुनी मिल चाळ येथे पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाला आहे. गेल्या सात दिवसांपासून पाण्याचा पत्ता नाही. सात दिवसानंतर पाणी आले ते देखील कमी दाबाने व पिवळसर पाणी आल्याने, नागरिकांनी तात्काळ महापालिका गाठली अन् आयुक्तांच्या दालनासमोर आपल्या व्यथा मांडल्या. त्यानंतर येथे पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले आहेत.

गेल्या आठवड्याभरापासून घरात पाण्याचा थेंब नसल्याने पाणी भरण्यासाठी नागरिकांनी टँकर समोर एकच गर्दी केली. टँकरला गराडा घातला. आम्ही शहरात राहतो की खेडेगावात राहतो? गेल्या आठ दिवसांपासून पाणी येत नाही. असा प्रश्न आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. महापालिकेला पाणीपट्टी वर्षभराची भरली जाते. परंतु पाणी त्या मोबदल्यात कमी प्रमाणात मिळते. महापालिकेचे अधिकारी कर्मचारी तसेच लोकप्रतिनिधी याकडे कानाडोळा करतात. त्यामुळेच वैतागून आम्ही आयुक्तांसमोर आमचे प्रश्न मांडले. अशी माहिती येथील नागरिकांनी दिली.

**पाण्यासाठी वणवण**



पिण्याचे पाणी संपत आले आहे. जारद्वारे पाणी मागून पाणी पिले जाते. परंतु वापरण्यासाठी काहीच पाणी शिल्लक नाही. काय सांगावे काय नाही अशी आमची परिस्थिती आहे. शहरात राहून देखील अशी अवस्था आहे. महापालिका प्रशासन केवळ बघायची भूमिका घेत आहे. ऐन उन्हाळ्यामध्ये पाणीपुरवठ्यात नियोजन शून्य असल्याचे दिसून येत आहे. याकडे महापालिका प्रशासनाने गंभीर्याने पाहावे.

**- सुरेखा चव्हाण, स्थानिक नागरिक**

**आठ दिवसांपासून घरात पाणी नाही**



गेल्या आठ दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत आहे. पाणी येऊन देखील घरातील सर्व ड्रम घागरी रिकामे आहेत. कमी दाबाने पाणी येत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्यांनी जार मागून तहान भागवली. परंतु आमच्यासारख्या गरीब माणसांकडे प्रत्येक वेळी पैसे मोजणे होत नाही. पाणी आणण्यासाठी लांब जाणे होत नाही. गुडघे दुखतात. अशा अवस्थेत पाणी कुठून आणायचे हा प्रश्न सतावत आहे.

**- लता माने, स्थानिक नागरिक**

# ज्ञानामृत आनंदलहरी - १०८१

**उत्तम अधम कर्मे घडती। जाणतां नेणतां पदरी पडती।**
**तेचि संचित होऊनि जाती। पुढे भोग द्यावया।।**

पर्यावरणाचा असंतुलीतपणा वाढला म्हणून वृक्षाचे महत्व वाढले, असे नाही तर मुळातच वृक्षाचे महत्व आहे. वृक्षाची सर्वांगीण महती विचारात घेऊन भारतीय संस्कृतीत पूर्वीपासून वृक्षांस महत्व दिल्याचे दिसून येते. वड, उंबर, नींब, पिंपळ अशी काही वृक्ष पवित्र मानून मंदीरासमोर लावली जातात. यांस तोडणे पाप मानले जाते. वृक्षाच्या पावित्र्याला संतांनी छान जोड दिली आहे. श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या, नगरेची रचावी। जलाशये निर्मावी। महावने लावावी। नानाविधे।।, संत नामदेवांच्या,जे वृक्ष लावीती सर्वकाळ। तयांची शास्त्रांचे झळाळ।।. संत तुकाराम महाराजांच्या, वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरें। पक्षीही सुस्वरें आळविती।। या वचनांकडे पाहिले म्हणजे संतांचा वृक्षांबद्दलचा दृष्टीकोण लक्षात येतो. असे असले तरीही अलिकडच्या काळात वृक्षांची मोठ्या प्रमाणात तोड झाली आहे व होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा असमतोल होऊन अनेक प्रश्न तयार झाले आणि होत आहेत. या विपरीत परिस्थितीला तोंड देण्यासाठी शासन, सामाजीक संघटना, सुजान नागरिक आदि वृक्ष लागवड व त्याचे संवर्धन यावर भर देत आहेत. वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे, हे पुण्याचे काम आहे, हे सत्कर्म आहे, अशा विविध कारणास्तव अनेक नागरिक स्वच्छेने हे काम करीत आहेत. अशा वृक्षप्रेमींकडून वृक्षतोड होण्याचा प्रश्न नाही. मात्र जे वृक्षाचे महत्व जाणत नाहीत, त्यांचेकडून शब्द आणि कृती यात फरक पडू शकतो. आम्ही २० वर्षांपुर्वी जालना येथे असतांना वृक्ष लागवडीला भावनात्मक व कर्तव्यात्मक जोड न देणाऱ्या एकाने झाडे लावा, ती अशी जगवा, तशी जगवा, असे अनेक वेळा ऐकवले आणि स्वत: मात्र त्यांच्या घराजवळील कांही जुनी वृक्ष तोडली. आम्ही त्यांना, आपण झाडे का तोडली असे विचारले असता, ती झाडे जुनी झाली होती, ती योग्य नव्हती, अशी झाडे आवारात नसावीत, अशी काहीतरी चुकीची उत्तरे त्यांनी दिली. अशा इतरांना झाडे लावा असे सांगणाऱ्या आणि स्वत:च त्याविरूध्द वागणाऱ्यांच्या शब्दाला वजन येणार कसे ? असो, आधी केले मग सांगीतले, असे वागणे अत्यंत महत्वाचे आहे. संत निळोबा महाराजांच्या,

उत्तम अधम कर्मे घडती। जाणतां नेणतां पदरी पडती।
तेचि संचित होऊनि जाती। पुढे भोग द्यावया।।

या वचनाप्रमाणे वृक्षतोड केलेल्या त्या महाशयांना कालांतराने का होईना वेगळ्याने भोग भोगावा लागला हे खरे आहे. आपल्याकडून चुकीचे कर्म घडले तर त्याचे भोग कधी ना कधी तरी भोगावेच लागतात हे निश्चित. असो, चुकीचे वागणाऱ्यांच्या शब्दांत भाव, आपुलकी, जोर नसतो. ज्यांच्या शब्दांत भाव, आपुलकी, विश्वास, जोर नसतो त्यांच्या शब्दांचा योग्य परिणाम होत नाही. अशा लोकांची विपरीत वृत्ती सामाजीक नुकसान करते. सामाजीक नुकसान करण्याचा अधिकार कोणालाही नाही, हे ध्यानात ठेवून वागले पाहिजे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**



# सुप्रभात

## आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - |
| दि. ९ एप्रिल २०२५ | चांगला दिवस, |
| विक्रम संवत् २०८१ | शुभ दिवस |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वादशी (२२.५५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मघा (०९.५६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - गंड (१८.२४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१०.००) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

## राशीभविष्य

**मेष :** विकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ :** विचारविनिमय करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्यात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन :** काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्यात वाढ होण्याची शक्यता. विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**कर्क :** स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह :** लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या :** चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या कामात खुशी राहील.

**तूळ :** मोठी हानी होण्याची शक्यता. शारीरिक स्वास्थ्याचे लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक :** राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु :** आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय होईल. प्रवास घडेल. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर :** जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ :** आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन:** योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामामुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षे करू नका. महिलांना आनंदी दिवस राहील.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवात नियमांचे पालन करावे : पोलीस आयुक्त

## जयंतीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तालयात बैठक




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवात व मिरवणुकीत मंडळांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी केले.

पोलीस आयुक्तालयात डॉ. आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती सदस्य, आंबेडकर जयंती महामंडळाचे पदाधिकारी व सार्वजनिक मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. त्यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार हे बोलत होते. यावेळ व्यासपीठावर पोलीस उपायुक्त डॉ. अजित बोऱ्हाडे, डॉ. दीपाली काळे, विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त सुधीर खिरडकर, राजन माने, यशवंत गवारी यांची उपस्थिती होती.

पोलीस आयुक्त पुढे म्हणाले, उत्सव साजरा करताना बर्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परिसरातील बेकायदेशीर बाबींची माहिती पोलिसांना दिली पाहिजे. मिरवणुकीमध्ये अफवा पसरवू नये, नियमांचे पालन करावे, शासनाने नेमून दिलेल्या सूचना पाळल्या पाहिजेत. तसेच योग्य तो बंदोबस्त नेमू असे सांगून डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शुभेच्छा देवून बैठकीला उपस्थितांचे आभार मानले. तसेच उपस्थितांनी मांडलेल्या अडी-अडचणींचे निरसन केले.

प्रास्तविक करताना पोलीस उपायुक्त डॉ. काळे म्हणाल्या, उत्सव काळात सर्व मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेर्‍यांची व्यवस्था करावी, मंडपासाठी सार्वजनिक रस्त्याचा २/३ भाग मोकळा सोडावा. मोकाट जनावरांपासून मूर्ती, फोटोस धोका होणार नाही याची खबरदारी घ्यावी. देखावे चित्र, आक्षेपार्ह नसावेत, उत्सवाचे पावित्र्य राखावे, मंडळांकडून आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंदी द्यावी. तसेच स्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षारोपण, साक्षरता, सायबर गुन्हेगारी यंत्रणाबाबत जनजागृती करावी. सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनीप्रदूषण अनुषंगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, मिरवणुक संवेदनशिल ठिकाणी जास्त वेळ रेंगाळत ठेवू नये. सोशल मीडियावरुन काही आक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, पोस्ट व्हायरल होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत त्वरीत पोलीस यंत्रणेस कळवावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव-२०२५ मंडळांनी ऑनलाईन, ऑफलाईन पध्दतीने परवानगी घेणे बंधनकारक आहे. या बैठकीस राजाभाऊ सरवदे, अॅड. संजीव सदाफुले, अरुण भालेराव, आनंद चंदनशिवे, युवराज पवार यांच्यासह शांतता समिती व मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये निर्मलाताई ठोकळ प्रशालेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

भाजपा पदवीधर प्रकोष्ठ सेल, सोलापूर आणि स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजि यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये श्रीमती निर्मला ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाने यश संपादन केले.

स्पर्धेत ८६ शाळांनी सहभाग नोंदवून आपले प्रकल्प सादर केले होते. त्या प्रकल्पापैकी इलेक्ट्रिसिटी जनरेशन फ्रॉम मॅग्नेटिक फिल्ड हे प्रकल्प उत्कृष्टपणे चिरंजीव वैभव समाधान धुमाळ याने सादर केले होते. त्या प्रकल्पाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्याबद्दल ट्रॉफी व रोख रक्कम रुपये २००० तसेच श्रावणी पुजारी हिच्याही प्रकल्पस तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

त्याबद्दल तील ट्रॉफी आणि रोख रक्कम रुपये १००० हे बक्षीस मिळाले हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रा रोहित मंजन होटकर यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांच्यासह कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गाजरे डी.डी. व पालक यांनी अभिनंदन केले.

# बोधीवृक्ष फाऊंडेशनतर्फे विविध कार्यक्रम

## ● वारांगनांच्या ३६ मुलांना आज शैक्षणिक साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

बोधीवृक्ष फाऊंडेशनच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने दि. ७ ते १४ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष अजयकुमार भालेराव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आवारात एकूण २ हजार वृक्षांचे रोपण करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ ७ एप्रिल रोजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, कुलसचिव डॉ. योगिनी घारे, एनएसएस प्रमुख डॉ. राजेंद्र वडजे आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. बुधवार दि. ९ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता समाज कल्याण केंद्र येथे वारांगनाच्या इयत्ता दहावी मध्ये शिकत असलेल्या ३६ मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येणार आहे. त्यांची परीक्षा फीही संस्थेच्या वतीने देण्यात येणार आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे अभियंता राजेश जगताप, संभव फाऊंडेशनचे अध्यक्ष आतिश कविता लक्ष्मण आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सोमवार दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता भंते सुमेध नागसेन यांच्या मंगल उपस्थितीत अजयकुमार भालेराव यांच्या निवासस्थानी असलेल्या भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास मानवंदना देण्यात येणार आहे. संस्थेच्या वतीने बोधिवृक्ष ग्रीन बँक उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सोमवार दि. १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथे फाऊंडेशनच्या १४ सदस्यांचे मरणोत्तर नेत्रदान संकल्पपत्र भरण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. रेखा ओव्हाळ, उमाकांत राजगुरू, आशा क्षीरसागर, डॉ. अंजना गायकवाड, सुनीता गायकवाड, सुचित्रा थोरे, डॉ. कुंडलेकशा गायकवाड आदी उपस्थित होते.



# कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे कॅम्पस मुलाखतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन व नारायणा ई-टेक्नो स्कूल, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे, प्रमुख पाहुणे नारायणा ई- टेक्नो स्कूलच्या प्राचार्या परवीन जमादार, पूजा वर्मा, श्रीमती कल्पना दासरी, करण दारा यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक कॅम्पस ड्राईव्ह विभाग प्रमुख डॉ. रत्नेश गोसावी यांनी केले. प्राचार्य श्रीमती परवीन जमादार यांनी नारायणा ई-टेक्नो स्कूलविषयी माहिती सांगितली. तसेच शिक्षकांना विविध प्रशिक्षण, सुविधा, उपक्रम व संधी देण्याचे आश्वासन दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील ३२ विद्यार्थ्यांनी मुलाखतीमध्ये सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन गीता केथले यांनी केले. आभार अभिजित यलगोंडे यांनी मानले.

# जैन संघटनेच्या राज्य कार्यकारिणीवर श्याम पाटील

## ●विभागावर अभिनंदन विभूते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

देशात नैसर्गिक आपत्ती प्रसंगी प्रथम मदतीचा हात देणारे सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारी भारतीय जैन संघटनेच्या राज्य कार्यकारिणीवर श्याम पाटील तर मराठवाडा विभागीय उपाध्यक्षपदी अभिनंदन विभुते यांची निवड करण्यात आली.


श्याम पाटील


अभिनंदन विभुते

भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शांतीलालजी मुथ्था यांच्या आदेशावरून राज्याध्यक्ष केतनभाई शहा यांनी ही निवड केली. श्याम पाटील हे गेल्या २५ वर्षापासून भारतीय जैनसंघटनेचे कार्य करीत असून ते कुमठे येथील चंद्रप्रभ जैन मंदिराचे अध्यक्ष आहेत. होटगी रोड सोशल फाऊंडेशन, डीएम ग्रुप, सक्षम सामाजिक संस्था, पशुधन बचाव समिती आदी संघटनेवर कार्यरत असून ते शतकवीर रक्तदाते आहेत. त्यांनी संमती सेवा मंडळ, इंग्लिश टीचर्स असोसिएशन, जैन वधू-वर परिचय संमेलन, महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिती, महाराष्ट्र राज्य नशाबंदी मंडळ, सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच, अशा विविध संस्थेच्या माध्यमातून गेल्या पंचवीस वर्षापासून सामाजोपयोगी कार्य करत आहेत.

# श्री भगवान परशुराम जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

## २९ एप्रिल रोजी शोभायात्रा; ब्रह्मगर्जना प्रतिष्ठानच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

ब्रह्मगर्जना प्रतिष्ठान सोलापूरच्या वतीने भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त जुळे सोलापुरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी शोभायात्रा काढण्यात येणार आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गुरुवार दिनांक १० एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते भंडारी स्पोर्ट्स क्लब जुळे सोलापूर या मैदानावर क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. दि. १० ते १४ एप्रिल दरम्यान ही क्रिकेट स्पर्धा आयोजित केली आहे. या क्रिकेट स्पर्धेत पुरुषांचे दहा, महिलांचे चार तर पुरुष पौरोहित्य दोन संघ सहभागी होणार आहेत. सोमवार दि. १४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता लोकमान्य टिळक यांचे वारसदार रोहित टिळक (पुणे) यांच्या हस्ते या क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.



मंगळवार दिनांक २९ एप्रिल रोजी श्री भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त सकाळी ८ वाजता घनपाठी ब्राह्मणांकडून पावमान यज्ञ व लघु रुद्र अभिषेक करण्यात येणार आहे. याचे यजमान श्री व सौ दैदीप्यमान वडापूरकर यांच्यासह पाच दांपत्य राहणार आहेत. दुपारी ५ ते ९ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता जुळे सोलापुरातील केलई हायस्कूल येथून पारंपरिक पद्धतीने वाजत गाजत श्री भगवान परशुराम महाराज मूर्तीचे भव्य स्वागत आणि प्रतिष्ठापना होणार आहे. त्यानंतर प्रसाद वाटप करण्यात येणार आहे. केलई हायस्कूल येथून सायंकाळी ५.३० वाजता शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या यात्रेत लेझीम ताफा, विविध खेळ, भजनी मंडळ यासह विविध पथके सहभागी होणार आहेत. पारंपरिक वेशभूषेत महिला व पुरुष मंडळी सहभागी होत आहेत. या पत्रकार परिषदेस मनोज कुलकर्णी, निखिल देशपांडे, अनिता कुलकर्णी, शर्वरी रानडे, विक्रम ढोनसळे, अनिता कुलकर्णी, सुप्रिया जोशी आदी उपस्थित होते.



# वक्तृत्व स्पर्धेमध्ये निक्षिता येलेरी द्वितीय

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

हरिभाई देवकरण प्रशालेच्या 'सुवर्ण महोत्सवी' वर्षानिमित्त आयोजित, जिल्हास्तरीय 'वक्तृत्व व वादविवाद' स्पर्धेत, वालचंद कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील निक्षिता अविनाश येलरी हिने, 'कनिष्ठ' महाविद्यालय गटातून 'द्वितीय' क्रमांकाचे १५००/- रुपयाचे पारितोषिक तर संस्कृती किरण कांबळे हिने 'रांगोळी' स्पर्धेत 'द्वितीय' क्रमांकाचे ७००/- रुपये पारितोषिक व प्रमाणपत्र तसेच नम्रता हरिदास पवार हिने बनवलेल्या विज्ञान प्रदर्शनात 'इमर्जन्सी ऑटोमॅटिक एक्सीडेंट डिटेक्टर अलार्म, या मॉडेलला 'तृतीय ' क्रमांकाचे ११०० पारितोषिक व प्रमाणपत्र मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधीश पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते स्वीकारले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ.कोटी एस.व्ही. उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना निलेश भिडे, चंद्रशेखर कस्तुरे व चेतन तुपकर यांनी मार्गदर्शन केले.

# सोलापूरात अत्याधुनिक सुविधेचे भव्य उद्घाटन

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

कापड उद्योगातील एक अग्रणी कंपनी, मफतलाल इंडस्ट्रिज लिमिटेड,भारतातील सोलापूर येथे त्यांच्या नवीन ऑफिस-कम-वेअरहाऊस सुविधेच्या शानदार लॉन्चसह १२० वर्षांच्या विश्वास, नावीन्य आणि उत्कृष्टतेचे स्मरण करताना आनंदित आहे! हा स्मारकीय टप्पा कंपनीच्या वारसातील एक रोमांचक नवीन अध्याय आहे, जो प्रतिष्ठित मफतलाल ब्रँड अंतर्गत प्रीमियम रेडीमेड स्कूल आणि कॉर्पोरेट गणवेशांच्या निर्मितीमध्ये आघाडीवर असलेल्या कंपनीचे स्थान आणखी मजबूत करतो.

सोलापूर एमआयडीसीच्या अक्कलकोट रोडवरील नेताजी ऑडियोगिक सोसायटीच्या प्लॉट क्रमांक सी-१०/२/१३ येथील नवीन सुविधेत भव्य उद्घाटन झाले. ज्यामध्ये महाव्यवस्थापक राजेश जैन आणि मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेडचे मुख्य व्यवस्थापक वरुण गिरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.या अविस्मरणीय नवीन सुविधेच्या उद्घाटनासह आमचा १२० वा वर्धापन दिन साजरा करण्यास आम्हाला खूप आनंद होत आहे असे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेडचे सीईओ एम.बी.रघुनाथ म्हणाले.

# कार्डिनल

माझ्या सध्याच्या अमेरिकी दौऱ्यात काल न्यू जर्सीत सकाळी सकाळी कार्डिनल पक्षी बघितला. अत्यंत सुंदर , सौष्ठवपूर्ण पक्षी लाल लांबरुंद शेपटी झोकदार तुरा, सहज मनात आले. कार्डिनल हा शब्द पक्षाचे नाव आहे आणि कार्डिनल हा शब्द कायदा संस्कृतीचे विशेषणही आहे. गंमत म्हणजे पक्षी हा रसिकतेचा विषय आहे. तर कायदा हा रूक्षतेचा विषय आहे. आणि तरीही कायद्याचे किंवा कायदा संस्कृतीचे विशेषण हे पक्षाच्या नावावरून आले आहे.

आणि मग मंद् नावाचा वाईट अवयव ( तो डोक्यात आहे की गुडघ्यात हा प्रश्न अलाहिदा ) मनाला सांगायला लागला की Cardinal हा शब्द मूळ लॅटिन शब्द उरीवे या शब्दावरून आला आहे.

उरीवे या शब्दाचा अर्थ आहे To Hinge लटकणे किंवा टांगून राहणे. वेगळ्या अर्थाने घ्यायचे तर अवलंबून असणे. मूळ तत्त्वावर आधारीत व्यवस्था असे म्हणताना ती व्यवस्था ज्या मूळ पायावर अवलंबून आहे , लटकून आहे , त्यावर स्वत:ला टांगून घेतले आहे अशा मूलभूत गोष्टींना उरीवळपरश्न म्हणतात असे शब्दकोश सांगतात. Cardinal शब्दाचा खरा अर्थ अधिष्ठान. अधिष्ठान असल्याशिवाय कोणतीही गोष्ट योग्य तऱ्हेने होत नाही. जसे कार्डिनल पक्षाचे अधिष्ठान आहे डौल Grace अशा अर्थाने कायद्याचे अधिष्ठान आहे सामाजिक - आर्थिक - राजकीय न्याय. कार्डिनल या पक्ष्याचा रंग आहे लाल. कायद्याच्या भयाचा रंग आहे लाल. कार्डिनल पक्षाची शेपटी लांबरूंद कायद्याचे हात लांबरंद . दोघांचीही जणू काही कानून के हाथ कार्डिनल पक्षाचा तुरा झोकदार. कायद्याचा डौल..कार्डिनल..

**- चंद्रशेखर टिळक,**
**७ एप्रिल २०२५**

# संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्या समोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघुकथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; सम जायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्व प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

## अलकः (१०२) संघसमर्थक

त्रेतायुगात श्रीराम- द्वापार युगात श्रीकृष्ण तसेच कलियुगात संघटित सजग समाजच भगवंताचे रूप आहे. संघशक्ति कलियुगे संपूर्ण हिंदुस्थान म्हणजे १४० करोडच्या प्रजेनी संघटित होणे, पुनश्च येणाऱ्या गुलाम गिरीतून हिंदुस्थानला / भारतमातेला वाचवण्यासाठी आवश्यक गरज आहे. आज पर्यंतचे सर्वच प्रमुख सरसंघचालक कित्येकदा मुसलमानांना खास भेटत होते. राष्ट्रीय स्वाहा। इदं न मम् ।। अशी धार्मिक शिकवण तुम्ही पण मुसलमानांना द्या. ही आपल्या राष्ट्राची गरज आहे असे सांगत होते. यावर राष्ट्रपती डॉक्टर झाकीर हुसेन म्हणायचे परस्परप्रेम-सौहार्द - संघटनेची देशहितासाठी केलेली वैचारिक बांधणी- कशी असावी हे मुसलमानाने संघाकडून शिकावे राष्ट्र सर्वोपरी ह्या संघाच्या शिकवणीचे मी समर्थन करतो. महात्मा गांधी म्हणायचे RSS च्या सामाजिक कार्यात राष्ट्र हे सर्वोपरी असते असा मला अनुभव येत आहे. नेताजी सुभाषचंद्र म्हणायचे समाज को संघटित करनेमे संघ का बताया हुआ मार्ग सही है। मदन मोहन मालवीयजी तर अभिमानाने व कौतुकाने संघासाठी निधी गोळा करण्यात नेहमीच तत्परतेनी साथ देत असत. डॉक्टर भीमरावजी आंबेडकर म्हणायचे संघ स्वयंसेवकांचा बंधुभाव जातपात विरहित आहे. असा अनुभव मी संघाच्या शिबिरात प्रत्यक्ष उपस्थित राहून घेतला आहे. दलाई लामा म्हणतात मी संघाचा समर्थक आहे अनुशासन देशभक्ती आणि समाजसेवा ही त्यांची शिकवण समर्थनीय आहे. अशा अनेक महापुरुषांनी संघाबद्दल आपले मत मांडले आहे. हरकत नाही. पण जर कार्कुना अलक लिहीण्यास काही अडचण नसेला येत तर 'जोपर्यंत होतय तोपर्यंत चालु ठेवावे ' असा विचार केल्यास बरे होईल असे वाटते मला काय कारण अलक असल्याने ते वाचले जाताय. अर्थात हे माझे वैयक्तिक मत आहे. मी ज्यांना पाठवतोय त्यांचाही विचार घेउन आपणास कळवतो.

**- क्रमशः**

# 'दक्षिण'मध्ये गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह योजनेअंतर्गत ९३ लाख अनुदान वाटप

## तहसील व कृषी कार्यालयाकडून शेतकरी कूटुंबाच्या मदतीसाठी पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनवअंतर्गत दक्षिण सोलापूर तालुक्यातून दोन वर्षात ६८ प्रस्तावांपैकी ४७ शेतकऱ्यांच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असूस ९३ लाख रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांच्या वारसदारांना देण्यात आल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांनी दिली.

कागदपत्र अपूर्ण असणाऱ्या २० लाभार्थ्यांना कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून समितीच्या पुढील बैठकीत त्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात येणार आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना ही शेतकरी व कुटुंबातील सदस्यांसाठी आहे. अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसदारांना सानुग्रह अनुदान देण्यात येत . तहसीलदार अध्यक्ष व तालुका कृषी अधिकारी सचिव असलेल्या समितीमध्ये या प्रस्तावांना मंजूरी देऊन अनुदानासाठी शासनाकडे पाठविण्यात येते. या योजनेअंतर्गत हात, पाय, डोळा अवयव गेल्यास एक लाख रुपये व अपघाती मृत्यू झाल्यास दोन लाख रुपयापर्यंत तरतूद करण्यात आली आहे. अपघातात मृत्यू झालेल्या ४६ शेतकऱ्यांच्या वारसदारांना ९२ लाख तर अपघातात जखमींना एक लाख रूपये अनुदान देण्यात आले आहे. तालुक्यातून २०२३-२४ मध्ये २९ प्रस्ताव आले होते. त्यापैकी २७ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. तर दोन प्रस्तावांमध्ये कागदपत्रे अपूर्ण असल्याने त्रुटी पूर्तता करण्यास सांगण्यात आले. २०२४-२५ मध्ये ३९ प्रस्ताव सादर झाले. त्यापैकी २० प्रस्ताव मंजूर झाले. तर १८ प्रस्तावांमध्ये त्रुटी असून एक प्रस्ताव नामंजूर करण्यात आला आहे. २०२३ ते २०२५ या कालावधीत एकूण ६८ शेतकऱ्यांपैकी ४७ शेतकऱ्यांना अनुदान मंजूर करण्यात आले असून वीस प्रस्तावात कागदपत्र अपूर्ण असल्यामुळे त्रुटी पूर्ततेसाठी पाठवण्यात आले आहे.

### बाळंतपणात मृत्यू झाल्यास अनुदान

शेतकऱ्याच्या पत्नीचे बाळंतपण होत असताना अति रक्तस्राव व इतर कारणांनी मृत्यू झाल्यास त्या शेतकर्यांना गोपीनाथ मुंडे सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत अनुदान देण्यात येते. दोन वर्षापासून शेतकरी कुटुंबातील बाळंतपण महिलांसाठी नवीन नियमावली तयार करण्यात आले आहे.

### वारसदारांना अनुदान मिळवून दिल्याचे समाधान



विविध अपघातात मृत्यू झालेल्या व वीज पडून, साप, विंचू चावल्याने मृत्यूमुखी पडलेल्या शेतकर्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत ४७ शेतकरी विरसदारांना अनुदान मिळवून दिला आहे. अनुदानामुळे शेतकरी कुटुंबातील विधवा पत्नी, मुलांना अनुदान मिळाल्याने त्यांची शैक्षणिक, विवाह,व इतर गरजा पूर्ण होण्यासाठी हातभार लागते.

**-अवधूत मुळे,**
तालुका कृषी अधिकारी, दक्षिण सोलापूर

### शेतकऱ्यांनी प्रस्ताव सादर करावे



गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह योजना मृत शेतकरी कुटुंबातील सदस्यांसाठी आहे. कुटुंबप्रमुखाचे मृत्यू झाल्यानंतर सरकारचे उत्तरदायित्व म्हणून वारसदारांना दोन लाख रूपये आर्थिक मदत मिळत असल्याने कुटुंबाचे उदरनिर्वाह व इतर गरजांसाठी हातभार लागते. शेतकरी कुटुंबातील सदस्यांनी अपघातात मृत्यू पावलेल्या शेतकर्याची माहिती त्वरीत तहसील व कृषी कार्यालयाला कळविणे गरजेचे आहे.

**- किरण जमदाडे,** तहसीलदार, दक्षिण सोलापूर

## महत्वाचे...



## आमदार राजू खरे यांनी सीतामातेच्या मूर्तीसाठी दिली एक लाखाची देणगी

**मोहोळ, दि. ८ एप्रिल-**

येथील चाटी गल्लीच्या मंदिरात रामनवमीनिमित्त सीतामातेच्या नवीन मूर्तीसाठी आमदार राजू खरे यांच्यावतीने एक लाख रुपये देणगी देण्यात आली. आमदार राजू खरे रामनवमी निमित्त प्रथमच दर्शनासाठी आले होते. यावेळी श्रीराम मित्र मंडळाच्या सदस्यांनी सितामातेची मूर्ती बदलणार असून यासाठी एक लाख रुपयाचा खर्च येणार असल्याचे सांगितले आमदार खरे यांनी स्वखर्चातून मूर्तीसाठी एक लाख रुपये देण्याचे मान्य केले व लगेच दिलेही. यावेळी मोहोळचे माजी व प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, शिवसेनेचे शहरप्रमुख विक्रम देशमुख, शिंदे गटाच्या शिवसेनेचे अजय कुर्डे, सर्फराज सय्यद, श्रीराम मित्र मंडळाचे हरिभाऊ गोटे, उमेश गोटे, समीर गोटे, राहुल तावस्कर, दिनेश मोहोळकर, सोमनाथ पुराणिक, श्रीशैल निस्ताने, अभिजीत मोहोळकर, विजय मोहोळकर, शशिकांत गोटे, उदय पुराणिक, शिवाजी निस्ताने, सोमा निस्ताने, महेश गवळी उपस्थित होते.



## सतिश सपकाळ यांच्या हस्ते मोफत पाणपोईचे उद्घाटन

**नातेपुते, दि. ८ एप्रिल-**

शिखर शिंगणापूर शंभू महादेव यात्रेनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच शिवसेना नेते माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुक्यातील मौजे पिंपरी येथील उमर देवस्थान व शिखर शिंगणापूर घाट या ठिकाणी तालुका उपप्रमुख हनुमंत कर्चे यांच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या मोफत पाणपोई चे उद्घाटन माळशिरस शिवसेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुका उपप्रमुख हनुमंत कर्चे, सरपंच दादासो कर्चे, सरपंच अविनाश कर्चे, नातेपुते शहर प्रमुख पै.निखिल पलंगे. हनुमंत शिंदे भाजप सरचिटणीस हनुमंत कर्चे, त्याातासाहेब कर्चे, सागर कर्चे, रवींद्र झेंडे, शंकर कर्चे, संजय कर्चे, कृष्णा कर्चे, विशाल कर्चे उपस्थित होते.



## रायगावच्या नेहरू विद्यालयातील विद्यार्थ्यांनी केली पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय

**करमाळा, दि. ८ एप्रिल-**

रायगाव (ता. करमाळा) येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. मागील दहा ते पंधरा दिवसापूर्वी गावच्या वेशीत तसेच झाडावर, अंगणात दररोज सकाळी नित्यनियमाने पक्ष्यांचा किलबीलाट मोठ्या प्रमाणात ऐकु येत होता. परंतु वातावरण अचानक झालेल्या बदलामुळे करमाळा तालुक्यात मागील आठ ते दहा दिवसांपासून उष्णतेचा पारा पस्तीशी पार गेल्याने विविध प्रकारच्या पक्ष्यांचा किलबीलाट कमी झाल्याचे दिसून येत आहे. एकीकडे पिण्याच्या पाण्याची टंचाई अचानक उष्णता वाढल्याने या पक्ष्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे अशातच शाळेतील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक श्री विजय कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली टाकाऊ वस्तूंपासून बनविलेल्या प्लास्टिकच्या बाटलीचा खालचा भाग कापून कल्पक बुद्धीने दोऱ्या बांधल्या आणि झाडांच्या मध्यभागी बांधून या भटकत्या चिमण्या, कावळे आदी पक्ष्यांच्या पाण्याची सोय करून भर उन्हात होणारी पक्ष्यांची भटकंती थांबविली. यावेळी पक्ष्यांविषयी असलेला जिव्हाळा वृद्धिंगत व्हावा आणि त्याचे अस्तित्व टिकून राहावे, असा निर्धार विद्यार्थ्यांनी केला. या उपक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## प्रांत मंत्रीपदी पवन श्रीमाळ यांची निवड

**बार्शी, दि. ८ एप्रिल-**



बार्शी येथील शुभम उर्फ पवन श्रीश्रीमाळ यांची श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स युवा शाखा, चतुर्थ झोन (नवी दिल्ली) या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेच्या महाराष्ट्र राज्य प्रांत मंत्रीपदी दोन वर्षासाठी निवड झाली आहे. नियुक्तीचे पत्र राष्ट्रीय युवा अध्यक्ष विपुल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य प्रांतीय युवा अध्यक्ष हितेश कांकरिया यांच्या हस्ते देण्यात आले.

## कासेगाव ओढ्यावरील पुलाच्या कामाची मागणी

**तभा वृत्तसेव,**
**कासेगाव, दि.८ एप्रिल-**

कासेगाव ता.दक्षिण सोलापूर येथील ओढ्यावरील पुलाची दुरीस्ती लवकरात लवकर करण्याची मागमी ग३ामस्थातून होत आहे.

कासेगाव उले रस्त्यावर ओढ्यावरील पुलाचे काम अर्धवट असून येथे अनेक दुर्घटना घडल्या आहेत. काही म हिन्यापूर्वीच येथे एका तरूणाचा वाहून जाऊन मृत्यू झाला होता. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी येथील काम होणे गरजेचे आहे. आता उन्हाळा आहे तोपर्यंत काम पूर्ण करण्याची मागणी ग्रामस्थातून होत आहे.

# श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रा महोत्सव

## जगद्गुरुंचा लाभणार आशीर्वाद; दि. ११ ते १५ एप्रिल दरम्यान आयोजन







**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. ८ एप्रिल-**

मंद्रूप येथील ग्रामदैवत श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रा म होत्सव यंदाही पारंपरिक उत्साह, भक्तिभाव व आध्यात्मिकतेने साजरा होणार आहे. दि. ११ एप्रिल ते १५ एप्रिल कालावधीत हा महोत्सव प.पू.लिं.श्री.ष.ब्र. रेणुक शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या कृपाशीर्वादाने आणि श्री निरंजन देवरु यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे.

११ एप्रिल रोजी श्रींची कावड व नंदीध्वजासह देवालयात प्रवेश होणार असून त्यानंतर गावातील सर्व देवतांचे तैलाभिषेक विधी पार पडतील. दि. १२ एप्रिल रोजी रात्री श्री वीरभद्र भजनी संघ (मंद्रूप) आणि श्री गेनसिद्ध भजनी संघ (कुंभारी) यांच्या सहभागाने भजनाचा जागर होणार आहे. दि.१३ एप्रिल रोजी पहाटे श्रींचा रुद्राभिषेक होईल. त्यानंतर नंदीध्वज व पालखी यांची गावात मदलसी पद्धतीने मिरवणूक निघेल.

रात्री श्री दानम्मा देवी नाट्य संघ, उंबराणी (ता. जत, जि. सांगली) यांचे गुड्डापूर दानम्मा हे कन्नड धार्मिक नाटक सादर होणार आहे. दि. १४ एप्रिल रोजी ढोलगीत स्पर्धा व त्यानंतर मैदानी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. अंतिम कुस्ती विजेत्यास श्री मल्लिकार्जुन केसरी पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. दि. १५ एप्रिल रोजी सर्वोत्कृष्ट जनावरांच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. संध्याकाळी श्रींची कावड व नंदीध्वज मानकऱ्यांच्या घरी वाजतगाजत पदार्पण करतील. दि. ११ ते १५ एप्रिल दरम्यान जनावरांचे प्रदर्शन व बाजार भरविण्यात येणार असून दररोज महाप्रसादाचे आयोजन केले जाईल. दि. १२ एप्रिल रोजी भोलेका दिवाना हा भक्तीमय सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे.

### जगद्गुरुंच्या उपस्थितीत कल्याणमहोत्सव

१२ एप्रिल रोजी दुपारी श्रीश्रीश्री १००८ जगद्गुरु डॉ. सिद्धलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी (उज्जैनी) आणि श्रीश्रीश्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी (काशी) यांचे आगमन होणार आहे. त्यांच्या उपस्थितीत श्रींची पालखी, नंदीध्वज व नागफणी (सदरबाशिंग) यांची गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात येईल. यानंतर भ्रमरांबा मल्लिकार्जुन कल्याणम होत्सव व धर्मसभा पार पडणार आहे.

# युनियन बँक ऑफ इंडिया चिखलठाण शाखेतर्फे दोन लाखांचा धनादेश वितरित

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ८ एप्रिल-**

युनियन बँक ऑफ इंडिया चिखलठाण शाखेमध्ये दिवंगत श्री विकी जयसिंग डिगे यांचे बचत खाते होते. फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या दुर्दैवी अपघातात विकी यांचे निधन झाले. विकी हा त्यांच्या कुटुंबाचा एकुलता एक मुलगा होता, आणि त्याच्या निधनाने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.


दिवंगत विकी यांच्या नावावर प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना सुरू होती. या योजनेअंतर्गत देय लाभ म्हणून दोन लाख रुपयांचा धनादेश आज त्यांच्या वडिलांना, श्री जयसिंग डिगे यांना, प्रदान करण्यात आला. हा धनादेश चिकलठाण शाखेचे शाखा अधिकारी श्री मोहन कोरडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी चिकलठाण शाखेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



डिगे कुटुंबाने या प्रसंगी चिकलठाण शाखेच्या तत्परतेचे कौतुक केले आणि शाखा अधिकारी मोहन कोरडे यांचे आभार मानले. कठीण प्रसंगी दाखवलेल्या संवेदनशीलतेमुळे आणि वेगाने केलेल्या मदतीमुळे कुटुंबाला तातडीचा आर्थिक दिलासा मिळाला. दिवंगत विकी यांच्या कुटुंबाला या योजनेचा लाभ मिळाल्याने त्यांच्या दुःखात काहीसा दिलासा मिळाला आहे. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना ही समाजातील दुर्बल व गरीब घटकांसाठी आधारस्तंभ ठरत असून, अशा अनपेक्षित प्रसंगांमध्ये आर्थिक संरक्षण पुरवते. युनियन बँक ऑफ इंडियाच्या चिकलठाण शाखेने ग्राहकसेवा आणि सामाजिक बांधिलकी यामध्ये आपले नेतृत्व सिद्ध केले आहे. मोहन कोरडे यांची तत्परता आणि संवेदनशीलता ही या शाखेची विशिष्ट ओळख बनली आहे, ज्यामुळे डिगे कुटुंबाला दिलासा मिळाला.

# अक्कलकोट येथील मल्लिकार्जुन यात्रेस प्रारंभ

## पाच दिवस चालणार उत्सव



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ एप्रिल-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देवस्थानच्या वतीने देण्यात आली आहे. हा उत्सव पाच दिवस चालणार आहे. यानिमित्य मंगळवारी ८ एप्रिल रोजी दुपारी नंदीध्वज काठ्यांच्या संवाद्य मिरवणुकीने यात्रा उत्सवाला मोठया उत्साहात प्रारंभ झाला. सलग पाच दिवस नंदीध्वजाचे मानकरी पाटील, रोडगे, लिंबीतोटे, नंदिकोले, आडवीतोटे या पाच मानकरांच्या घरासमोरून नंदीध्वजाची विधीवत पूजा करून नंदीध्वज काट्यांची सवाद्य मिरवणूक शहराच्या प्रमुख मार्गावरून निघून स्थापना झाली.

८ ते १२ एप्रिलपर्यंत पहाटे सहा वाजता श्री मल्लिकार्जुन रुद्राभिषेक विधी होणार आहे. १२ एप्रिल रोजी सायंकाळी ६. ३५ मिनिटांनी रथोत्सवाचा कार्यक्रम होणार आहे, हजारो भक्त रथ ओढतात. शहर व तालुक्यातील श्री मल्लिकार्जुन भक्तांनी दर्शन व प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

### मोफत सामुदायिक विवाह

यात्रा उत्सवानिमित्त ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवस्थान ट्रस्ट संचलित जगत ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त अक्षय तृतीयाच्या दिवशी बुधवार, ३० एप्रिल रोजी वीरशैव लिंगायत सामुदायिक विवाह सोहळा श्री मल्लिकार्जुन मंगल कार्यालय येथे होणार आहे. तरी या सामुदायिक विवाह सोहळ्यात वधू-वर १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या विवाह इच्छुकांनी २० एप्रिल रोजीपर्यंत राजशेखर उंबराणीकर (मो.७०२०३३९९१३) यांच्याशी संपर्क साधून विवाह नोंदणी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिखलठाण-कुगाव रस्त्याचे डांबरीकरण करा

## कोटलिंग यात्रा; ग्रामस्थांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.८ एप्रिल**

करमाळा तालुक्यातील प्रसिद्ध कोटलींग मंदीराकडे जाणाऱ्या चिखलठाण-कुगाव रस्त्याचे डांबरीकरण येथील कोटलींग यात्रेपूर्वी करण्याची मागणी चिखलठाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच अक्षय सरडे यांच्यासह या परिसरातील लोकांमधून केली जात आहे

सोलापूरसह पुणे, सातारा, धाराशिव अहिल्यानगर जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या चिखलठाण येथील कोटलिंग देवाची यात्रा २१ एप्रिल रोजी संपन्न होत आहे या यात्रेसाठी महाराष्ट्रभरातून लाखो लोक येत असतात या मंदिराकडे एकमेव जाण्यासाठी एकमेव असणारा चिखलठाण-कुगाव रस्त्याचे खडीकरण कच्चे डांबरीकरण



होऊन अनेक दिवस झाले तरी यावर पक्के डांबरीकरण करण्यात आलेले नसल्याने ठिकठिकाणी रस्त्यावर खड्डे पडले असून त्या रस्त्याने वाहने चालवणे अवघड झाले आहे सध्याचे या मंदिराकडे जाणाऱ्या या रस्त्यावर वाहने चालवण्यासाठी लोकांची कसरत होत असून यात्रेपूर्वी या रस्त्याचे पक्के डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे.

दोन वर्षांपूर्वीच या रस्त्याचे खडीकरण व कच्चे डांबरीकरण झाले होते परंतु हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची तक्रार कुगाव व चिखलठाण नंबर दोन येथील काही ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली होती योग्य दर्जाचे काम करण्यासाठी ग्रामस्थांनी उपोषण केले होते तातडीने रस्त्याचे पक्के डांबरीकरण करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते परंतु अद्याप पर्यंत या रस्त्याचे डांबरीकरण झालेले नाही.

**- अक्षय सरडे, उपसरपंच चिखलठाण**

करमाळा तालुक्यातील प्रसिद्ध कोटलिंग मंदिराकडे जाणार आहात रस्ता ठिकठिकाणी खड्डे पडल्याने खराब झाला असून याचे यात्रेपुर्वी तातडीने डांबरीकरण करण्यात यावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल.

**- राहुल गोळे, तालुका उपाध्यक्ष भाजपा**



# तलाठीपदी निवडीबद्दल ऋतुजा चिवटे-हिंगमिरे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ८ एप्रिल-**

ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) म्हणून निवड झाल्याबद्दल ऋतुजा चिवटे (हिंगमिरे) यांचा करमाळा तालुका डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेच्या वतीने सुवर्णा मडके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी काँग्रेसचे माजी जिल्हा उपाध्यक्ष विजयराव पवार, पत्रकार संघटनेचे तालुका अध्यक्ष दिनेश मडके, सचिव नरेंद्रसिंह ठाकुर, उद्योजक शिवकुमार चिवटे, उपस्थित होते. ऋतुजा चिवटे (हिंगमिरे) यांनी मिळवलेले यश युवा पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत श्री. मडके यांनी व्यक्त केले.

त्यांच्या या यशामध्ये पती शिवकुमार चिवटे, सासू, सासरे, आई, वडील तसेच दीर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे कक्षप्रमुख मंगेश चिवटे, सोलापूर शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख महेश चिवटे व भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांचे सहकार्य लाभले असून चिवटे कुटुंबाचे योगदान लाभले आहे. प्रास्ताविक सूत्रसंचालन नरेंद्रसिंह ठाकुर यांनी केले. सिद्धेश्वर ढास यांनी आभार मानले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्रीराम प्रतिष्ठानतर्फे हनुमान व रामजनमोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ८ एप्रिल -**

प्रतीवर्षाप्रमाणे येथील श्रीराम प्रतिष्ठानच्यावतीने श्रीराम जन्मोत्सव मोठ्या धुमधडाक्यात व भक्तीभावाने युवकांच्या सहभागाने साजरा करण्यात येत आहे. त्यास अणदूर ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

यानिमित्त रामनवमी दिवशी भव्य मिरवणुकीने श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना येथील आण्णा चौकात करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, रक्तदान शिबिर आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. शनिवार दिनांक १२ एप्रील रोजी सायंकाळी ४ वाजता आण्णा चौकातून श्रीरामाची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. उत्सव काळात हनुमान जयंती, भगवान महावीर जयंती, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची त्रिषताब्दी जयंती आदी महत्वाचे सण सुध्दा प्रतिष्ठानतर्फे साजरे केले जाणार आहेत. या कार्यक्रमात परिसरातील नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन श्रीराम प्रतिष्ठानचे राजकुमार गाढवे, अंकुश चिनकारे, आकाश आळंगे, संकेत चव्हाण यांनी केले आहे



## महत्वाचे...



### आदिनाथ कारखाना प्रचारार्थ उमरड येथे सभा संपन्न

**करमाळा दि.८ एप्रिल**

आदिनाथ कारखाना संजिवनी पॅनल'च्या प्रचारार्थ उमरड येथे सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी छगन वलटे होते तर व्यासपीठावर माजी संचालक धुळाभाऊ कोकरे, डॉ प्रा संजय चौधरी,चिखलठाणचे सरपंच विकास गलांडे, तात्यासाहेब सरडे, दादासाहेब कोकरे, राहूल गोडगे, अध्यापक दरगुडे, शशीकांत नरूटे, सर्जेरावनाना रिटे, गणेश चौधरी (माजी उपसरपंच), साहेबराव मारकड , हणुमंत चौधरी, चंद्रशेखर पाटील, रसूल शेख, विलास (आण्णा) चौधरी, चांगदेव चौधरी, पंकज बदे, शंकर कोंडलकर, हणुमंत मारकड, इरफान शेख, राहुल गोडगे,भाग्यवंत बंडगर, औदुंबर बदे ,सोमनाथ पठाडे, श्रीकांत मारकड आदि उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार नारायण आबा पाटील म्हणाले की तुम्ही मला आमदार म्हणुन निवडुन दिले. मी तुमच्या विश्वासास पात्र राहुन काम केले व करत राहीन. माझ्या ताब्यात एकदा आदिनाथ कारखाना द्या, मी या कारखान्यास उर्जीत अवस्थेत आणुन दाखवतो. सभासदांना विचारात घेऊनच हे सहकाराच मंदिर टिकून राहीले पाहिजे असेही आमदार पाटील यांनी बोलून दाखवले. प्रास्ताविक प्रवक्ते सुनील तळेकर यांनी केले तर आभार उमेदवार श्रीमान चौधरी व राजाभाऊ कदम यांनी मानले. सुत्रसंचलन भाग्यवंत बंडगर यांनी केले. संगोबा, कुंभेज व पोफळज नंतर श्री आदिनाथ संजिवनी पॅनल'ची हि दिवसभरातील चौथी प्रचार सभा होती.



### अणदूरच्या शाळेत जागतिक आरोग्य दिन उत्साहात

**अणदूर, दि.८ एप्रिल**

जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा अणदूर येथे जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये विविध योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज मुळे, उपाध्यक्ष चैताली सूर्यवंशी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य बालाजी राजपूत, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुनीता देशमुख व सर्व शिक्षक, आशा कार्यकर्ते व माता पालकवर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रसंगी योगशिक्षिका सुषमा संदीप सोनवणे बोलताना म्हणाल्या की आपले आरोग्य निरोगी कसे राहील या करिता प्रत्येकाने योगा केला च पाहिजे विशेषतः महिलांनी आपल्या आरोग्याच्या बाबतीत सतर्क रहावे असे आवाहन केले, या प्रसंगी सर्व मुलींना योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखवले.व योगासनाचे महत्त्व पटवून दिले याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना घोडके यांनी तर आभार केंद्रप्रमुख परशुराम कानडे यांनी मानले.



### बार्शीत भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस उत्साहात साजरा

**बार्शी, दि.८ एप्रिल**

येथे शहरातील ब्राह्मण गल्ली येथील कुलकर्णी यांच्या निवासस्थानी भारतीय जनता पार्टी स्थापना दिवस पंचायत राज ग्रामविकास भाजपा यांच्यावतीने हेमंत रातंजनकर विधानसभा संयोजक यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष स्थापना दिवस व राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी तालुका विधानसभा प्रमुख हेमंत रातंजनकर यांनी पक्ष स्थापनेबद्दलची संपूर्ण माहिती दिली. कार्यकर्ता हाच खरा पक्षाचा पाया आहे. कार्यकर्ता टिकला तरच पक्ष टिकू शकतो याचा ज्वलंत उदाहरण त्यांनी दिले. आज पक्षाचा वटवृक्ष झालेला आहे, असे सांगितले. यावेळी सदस्य नोंदणी अभियानात ज्या सदस्यांनी नोंदणी केली त्या सर्वांचे सत्कार ही पक्ष स्थापना दिवसानिमित्त सदस्य नोंदणी अभियानात भाग घेऊन अडीचशे ते एक हजारपर्यंत नोंदणी केलेल्या सदस्यांचा व विभागातील सदस्यांचा सत्कार करण्यात आला. रामनवमी उत्सव साजरा करुन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. यावेळी बार्शी शहराध्यक्ष शिल्पाताई कांबळे, तालुका अध्यक्ष दशरथ उकिरडे, तालुका उपाध्यक्ष वर्षाताई अंधारे, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष सोनिया गुप्ता, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रफुल्ल भालशंकर, बार्शी शहर उपाध्यक्ष लक्ष्मीकांत कुलकर्णी, प्रणव रणदिवे, नामदेव लावंड, विवेक कुलकर्णी, तालुका गणप्रमुख प्रवीण ढाकणे भारतीय जनता पार्टीचे सदस्य विशाल गाढवे रवींद्र सांगोळे, दिलीप खंदाड, शशिकांत कुलकर्णी, सुधीर टांकसाळे आदी उपस्थित होते.

# चैत्री एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीची नित्यपूजा

### ● महाराष्ट्रासह अन्य राज्यातील भाविकांनी घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ एप्रिल-**

चैत्री शुद्ध कामदा एकादशी निमित्त आज मंदिर समितीच्यावतीने श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची नित्यपूजा संपन्न झाली. श्री विठ्ठलाची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य शिवाजीराव मोरे व श्री रुक्मिणी मातेची नित्यपूजा लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली.

यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, ॲड. माधवी निगडे, हभप प्रकाश जवंजाळ, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले व नित्य उपचार विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे उपस्थित होते. दरम्यान चैत्री यात्रेसाठी महाराष्ट्रासह अन्य राज्यातील भाविकही मोठ्या प्रमाणात पंढरपुरात दाखल झाले होते. दर्शनासाठी येणा-या भाविकांसाठी मंदिर समितीच्या वतीने विमा काढण्यात आला आहे. या यात्रेला येणा-या भाविकांना पुरेशा व



अत्याधुनिक सोईसुविधा देणे, उष्णतेच्या दाहकतेमुळे भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य ती दक्षता मंदिर समितीमार्फत घेण्यात आली असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

दिवसेंदिवस उष्णतेची वाढणारी दहाकता लक्षात घेता, दर्शनरांगेत कुलर, थंड पिण्याचे पाणी, सरबत, मठ्ठा वाटप करण्यात आले. याशिवाय, पत्राशेड व दर्शनमंडप येथे आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध केली होती. मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रूग्णवाहिका ठेवण्यात आल्या आहेत. गतवर्षीप्रमाणे पत्रा शेड येथे दशमी, एकादशी व द्वादशी दिवशी अन्नछत्र सुरू करण्यात आले असून, भाविकांना पूर्ण वेळ साबुदाणा आणि तांदळाची खिचडी वाटप करण्यात येत आहे. दर्शन रांगेतील एकही भाविक उपाशी राहू नये या दृष्टीने सारडा भवन येथे देखील खिचडी वाटप करण्यात येत आहे. श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथे चौकशी कक्ष उभारण्यात आला आहे. त्यामध्ये मराठी, इंग्रजी, हिंदी, कन्नड व तेलगू भाषा अवगत असलेले कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, भाविकांना ध्वनिक्षेपकाद्वारे वेळोवेळी सूचना देण्यात येत आहेत. चंद्रभागा वाळवंट येथे महिला भाविकांच्या सोईसाठी चेंजिंग रूम व दर्शनरांगेत हिरकणी कक्ष उभारण्यात आला आहे. पंढरीत दाखल झालेल्या भाविकांनी सध्या विठुरायाच्या दर्शनरांगेत मोठी गर्दी केली आहे. दर्शन रांगेत हजारो भाविक उभे आहेत, या वारकरी भाविकांना सोई सुविधा उपलब्ध करून देण्यास मंदिर प्रशासन सज्ज असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

### मंदिर समितीच्यावतीने आवश्यक उपाययोजना

चैत्री एकादशीला भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीच्या वतीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मंदिर समितीच्या वतीने दर्शनरांगेत व दर्शन मंडपात, स्वच्छ पिण्याचे पाणी, शौचालये, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दर्शनरांग, दर्शनमंडप, मंदिर व मंदिर परिसर या ठिकाणची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे.

## मानाच्या कावडी शिंगणापूरकडे; जंगले व जावळेबुवांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर. दि.८ एप्रिल -**

माळशिरस शहरातील रकमाजी जंगले यांच्या सर्वात उंच व अवजड तसेच चाकोरे येथील जावळेबुवांच्या मानाच्या कावडीचे शिंगणापूरकडे प्रस्थान झाले,

माळशिरस येथील जंगले यांची कावड सर्वात उंच व अवजड म्हणून ओळखले जाते . कावडीचे शिड ५५ फुट उंच असून हि कावड उचलण्यासाठी १० कावडी व दोरी धरण्यासाठी चार कावडी लागतात. या कावडीला शिंगणापूरला मान आहे. शिंगणापूरच्या तळयाच्या ठिकाणी मानाची तेल्या भुतोजी यांच्या कावडीची भेट होती. जंगले



यांची कावड वाहनाने शिंगणापूर येथे नेली जाते. चाकोरे येथील जावळे बुवा कावडीलाही शिंगणापूरला मोठा मान असून . जावळे बुवा कावड व तेल्या भुतो जी यांची भेट मानाच्या पारावर होते. हि कावड चाकोरे तिरवंडी. मेडद पुरंदावडे सदाशिवनगर. मांडवे लोणंद . लोंढे मोहितेवाडी फडतरी गुप्तलिंग मार्गे शिंगणापूरला जाते.

## सांगोला वनविभागाकडून टँकरने पाण्याची व्यवस्था

### ▸▸ वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.८ एप्रिल-**

सोलापूर वन विभागातील सांगोला वनपरिक्षेत्रामध्ये वनविभागाकडून सात नियत क्षेत्रात वन्य प्राण्यांसाठी व पक्षांसाठी अठ्ठेचाळीस पान स्थळांमध्ये टँकरने पाण्याची व्यवस्था केली असल्याची माहिती सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर यांनी दिली.

सांगोला वनपरिक्षेत्रामध्ये सात नियत क्षेत्र आहेत. सात नियत क्षेत्रात वनक्षेत्र गावात अठ्ठेचाळीस पान स्थळ केलेली आहेत. जानेवारी २०२५ पासून आपण वनक्षेत्रात पाणी पान स्थळांमध्ये टँकरने पाणी सोडत आहोत. तसेच एप्रिल ते जून २०२५ पर्यंत पाणी सोडण्याचे नियोजन आहे. वन परिमंडळ सांगोला मध्ये आचकदानी, कटफळ, चिकमहुद,



सांगोला अशी चार तसेच वन परिमंडळ जुनानी मध्ये हटकर मंगेवाडी व घेरडी असे दोन व वन परिमंडळ कोळा येथे कोळा एक वन क्षेत्र आहे. यामधील वनक्षेत्र गावात वनक्षेत्रात पान स्थळात टँकरने पाणी सोडण्याचे काम सुरू आहे अशी माहिती तुकाराम जाधवर यांनी दिली.

## नातेपुते बस स्टॅन्डवर महिला चोरांच्या टोळीवर नातेपुते पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते दि.८ एप्रिल -**

शिखर शिंगणापूर यात्रेनिमित्त शंभू महादेवाच्या दर्शनासाठी भाविक भक्त शिंगणापूरच्या दिशेने जातात.नातेपुते व परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी आलेल्या भाविक भक्ताच्या गर्दीचा फायदा घेऊन महिलांचे दागिने व पाकिटे पर्स चोरी करणारे अट्टल महिलांची टोळी नातेपुते परिसरात फिरत आहे. ही माहिती नातेपुते पोलीस पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सपोनी महारुद्र परजणे यांना मिळाल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विक्रांत दिघे व पोलीस अमलदार देविदास धोत्रे, पोलीस नाईक राकेश लोहार, बोंद्रे, नितीन पनासे, रणजीत मदने, असलम शेख, नवनाथ चव्हाण, राहुल वाघमोडे यांच्या पथकाने मोठ्या शिताफिने नातेपुते बस स्टॅन्ड व परिसरात फिरत असलेले एकूण नऊ महिलांच्या टोळीस ताब्यात घेतले. त्यांची



नाव गाव पत्ता असे - विद्या सोनू कांबळे (वय २१) रेणुका अरुण कांबळे (वय ६६) संगीता अविनाश कांबळे (वय २५), पूनम जिंतू कांबळे (वय ३४) ,चांदणी शक्ती कांबळे (वय २८) गंगा नामदेव कांबळे (वय ३५), अनुसया युवराज कांबळे (वय ३६) सर्व रा. फुलेनगर तळशे गल्ली उदगीर तर दीपमाला संतोष संकट (वय ३०) व अंजू कृष्णा उपाध्याय (वय २४) दोघे रा. बिदर (कर्नाटक) असे अशी आहेत. सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १२८ प्रमाणे खटला तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार माळशिरस यांच्याकडे पाठवून त्यांच्यावर प्रतिबंध कारवाई करण्यात आली आहे.ही कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजने व त्यांच्या टीमने केले

## डॉ. माधवी निगडे यांच्या हस्ते तिर्थक्षेत्र विकास आराखड्यातील सुलभ शौचालय संकुलाचे उद्घाटन

### सुलभ शौचालय संकुलसाठी मंदिर समितीमार्फत भाडे तत्वावर जागा व शासन निधीतून बांधकाम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.८ एप्रिल -**

श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पंढरपूर रेल्वे स्टेशनची जागा भाडे तत्वावर घेऊन तिर्थक्षेत्र विकास आराखड्यातून सुलभ शौचालय संकुल बांधकाम करण्यात आले आहे. या संकुलाचे चैत्री एकादशीच्या मुहूर्तावर मंदिर समितीच्या सदस्या ॲड.माधवी निगडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, सुलभ प्रोजेक्ट मॅनेजर मुकेश झा, के. डी. ओझा व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.



सदर संकुलासाठी रेल्वे स्टेशन, पंढरपूर यांची जागा मंदिर समितीने ३५ वर्षे मुदतीवर भाडे तत्वावर घेतली आहे व त्यावर शासन निधीतून तिर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत सुलभ शौचालय इमारत बांधकाम करण्यात आली आहे. यामध्ये दोन इमारत असून, एक इमारत रेल्वेच्या विश्रामगृहाशेजारी आहे व त्यामध्ये महिलांसाठी बाथरूम सह २० शौचालये, पुरूषांसाठी बाथरूम सह २० शौचालये असे एकूण ४० तसेच इतर ४८ शौचालये व अपंगासाठी १ शौचालय आहे. याशिवाय, रेल्वे टिकीट काऊंटर शेजारील इमारतीमध्ये महिला व पुरूषांसाठी प्रत्येकी ३० प्रमाणे एकूण ६० शौचालये व ९ बाथरूमची सुविधा उपलब्ध आहे. या सुलभ शौचालय संकुलाची देखभाल दुरूस्ती सुलभ इंटरनॅशनल लि. मुंबई यांचेकडे राहणार आहे. श्री क्षेत्र पंढरपूरला येणा-या प्रत्येक वारकरी भाविकांपर्यंत सेवा पोहोचविण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहणार आहे.पंढरपूरच्या वारीला शेकडो वर्षाची परंपरा असून, वारी स्वच्छ, निर्मल व सुंदर व्हावी तसेच इतर सोयी सुविधांबरोबरच स्वच्छतेला अधिक महत्व आहे. त्यासाठी मंदिर समिती कार्य करीत आहे. येणा-या सर्व वारकरी भाविकांनी स्वच्छतागृहाचा वापर करावा असे आवाहन यावेळी ड.माधवी निगडे यांनी केले.


## पाण्याबाबत हलगर्जीपणा केल्यास कारवाई करणार : नगराध्यक्ष देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**सदाशिवनगर, दि.८ एप्रिल -**

शहरात ठरवून दिलेल्या वेळेनुसार पाणी पुरवठा झाला पाहिजे यामध्ये पाणी पुरवठा विभागातील कोणी हलगर्जीपणा केला व नागरिकांना पाणी मिळाले नाही तर कारवाई करणार असल्याची ताकीद नगराध्यक्ष विजय देशमुख यांनी दिली.

माळशिरस शहरातील सिद्धार्थनगर, लोहारगल्ली आदी भागातील नागरिकांना महाबळेश्वर विहीरीवरून पाणी पुरवठा केला जातो. तर श्रीनाथ नगर, कोर्ट परिसर या भागाला म्हस्कोबा येथील पाण्याच्या टाकीतून पुरवठा केला जातो. शहा धारसी प्लॉट, मेन रोड, कुंभार गल्ली, अकलूज रोड या भागाला





शहा धारसी प्लॉट मधील पाण्याच्या टाकी मधून पाणी पुरवठा केला जातो. म्हस्कोबा व शहा धारसी प्लॉट मधील पाण्याच्या टाक्या फुलेनगर येथील तळ्यामधील पाण्याने भरल्या जातात. या टाक्या भरणे, पाणी सोडणे यासाठी स्वतंत्र कर्मचारी नेमण्यात आले आहेत. उन्हाची तीव्रता असल्याने नागरिकाकडे असलेल्या विंधन विहिरीचे पाणी कमी झाले आहे, महाबळेश्वर येथील पाणी पुरवठा विहिरीचे पाणी कमी झाले आहे. फुलेनगर येथील तळ्यात नगराध्यक्ष विजय देशमुख यांच्या प्रयत्नातून निरा कालव्याचे पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्याची अडचण येणार नाही. पाणी उपलब्द्ध असताना कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणा मुळे नागरिकांना पाणी मिळाले नाही तर हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करणार असल्याचे नगराध्यक्ष देशमुख यांनी सांगितले. काही भागात पाणी पुरवठा करण्यास अडचण आली तर या भागात नगरपंचायतीच्या टँकरने पाणी पुरवठा करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पाण्याबाबत काही अडचण असल्यास संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले.

नीरा कालव्याला पाणी असून देखील नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा तळ्यातील पाणी संपले तरी देखील पाणी न सोडल्यामुळे दोन दिवस पाणीपुरवठा झाला नाही याची दखल घेत नगराध्यक्ष विजय देशमुख यांनी तातडीने पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची संपर्क करून पाणी सुरू केले. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठा सुरळीत झाला. नगराध्यक्ष विजय देशमुख यांनी पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन हलगर्जीपणा केल्यास कारवाई करणार असल्याची ताकीद दिली.